
ISSN 0973-8452
मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।



भारतीय सौर अश्विन-मार्गशीर्ष १९३७
ऑक्टोबर-डिसेंबर २०१५ / खंड ३९ अंक ३

रशियातले संक्रमण
विदेशी गुंतवणुकीचा परिणाम
महाराष्ट्राचे जलव्यवस्थापन
सहस्त्रक विकासाचे ध्येय व प्रगती
महाराष्ट्रातील पाणलोट क्षेत्र विकास
कांदाबीज निर्यातीतून आर्थिक विकास
विशेष आर्थिक क्षेत्र आणि निर्यात वृध्दी
कृषी विज्ञान केंद्र: शेतीसाठी वरदान.
नियोजन आयोगाची भूमिका
महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा विकास
आधुनिक किटकनाशके: आर्थिक परिणाम
भारतातील भूमिहीन शेतमजुरांचे अध्ययन
केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची भूमिका
सुधारीत राष्ट्रीय कृषी विमा योजना

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित:।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

ऑक्टोबर-डिसेंबर २०१५ / खंड ३९ अंक ३

International Research Journal

ISSN 0973-8452

Reg. No. 31918/77

मनुष्याणाम् वृत्तीरर्थ:।

www.marthpari.org

प्रमुख संपादक

अविनाश रामलाल निकम

सहाय्यक संपादक

शंकर सुदामराव पवार

सल्लागार मंडळ

(२०१५-१८)

तेजस्विनी मुडेकर

अरूण पिसे

राजेंद्र गव्हाळे

विजय भोपाळे

संपादकीय पत्रव्यवहार

डॉ.अविनाश निकम

मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,

परिमल कॉलनी,

यशवंत क्लासेसच्या मागे,

शहादा-४२५४०९

जिल्हा नंदुरबार.

मोबा: ९८२२६६५१४१

लेखातील मते लेखकांचीच

अनुक्रमणिका

अविनाश निकम, शहादा
संपादकीय संवाद:सिरियन निर्वासितांचा आर्थिक प्रश्न..२२५
अशोक मोडक, मुंबई
रशियातले संक्रमण: उध्वस्त समाजवादाकडून अज्ञात - भांडवलशाहीकडे....................................२२७
भिमा सापनर, नाशिक
विदेशी गुंतवणुकीचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम.......२४१
रामहरी किसन दातीर, नाशिक
महाराष्ट्राचे जलव्यवस्थापन: धोरण आणि उपाय.......२४९
नंदकुमार मेटे, यवतमाळ
सहस्त्रक विकासाचे ध्येय व भारताची प्रगती...........२५४
अनिलकुमार वावरे, सातारा
महाराष्ट्रातील पाणलोट क्षेत्र विकास....................२६३
कृष्णा शहाणे, नाशिक
कांदाबीज निर्यातीतून आर्थिक विकास.................२७०
सुनिल मेढे, जाफ्राबाद
विशेष आर्थिक क्षेत्र आणि निर्यात वृध्दी...............२७५
नागेश सूर्यवंशी, मुंबई
कृषी विज्ञान केंद्र: शाश्वत शेतीविकासासाठी वरदान...२८१
अरुण तवार, परभणी
नियोजन आयोगाची अर्थव्यवस्थेतील भूमिका.........२८६
हिरालाल चव्हाण, जळगाव
महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा विकास...............२९२
दिलीप जगताप, नंदुरबार
आधुनिक किटकनाशके: आर्थिक-सामाजिक परिणाम.२९९
चंद्रकांत कोकाटे,शिवशंकर लेकुरवाळे,औरंगाबाद
भारतातील भूमिहीन शेतमजुरांचे अध्ययन..............३०३
कु.धनश्री अंबेकर, पुणे
आदिवासींच्या विकासात केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची भूमिका ...............................................३११
बापुसाहेब शिंगाडे, संगमनेर
सुधारीत राष्ट्रीय कृषी विमा योजना-एक वरदान.........३१७
मंजुषा मुसमाडे, पुणे
ग्रंथ परीक्षण..............................................३२४
ज.फा.पाटील,कोल्हापूर,
अर्थ शब्दांची वाट पाहे: प्रदेश-प्रवेश..................३२७

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**कार्यकारी मंडळ २०१५-१६**

**अध्यक्ष**

सुहास धोंडिबा आव्हाड (संगमनेर)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

आर. बी. भांडवलकर (यवतमाळ)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

मुक्ता जहागिरदार (अमरावती)
अर्जुन महाडिक (कोल्हापूर)
विनायक भिसे (औरंगाबाद)

**सदस्य**

राहुल म्होपरे (कोल्हापूर)
संजय तुपे (नाशिक)
बालाजी सुरवसे (फोंडा)
अशोक खाचणे (जळगाव)
राजेंद्र शिंदे (धुळे)
महादेव पाटील (मिरज)
हनुमंत नत्रवरे (अकलुज)
सुभाष गुर्जर (वरवट-बकाल)
संजय धनवटे (कारंजा)
पांडुरंग कल्याणकर (फुलंब्री)
तुकाराम मुंडे (मानवत)
दिलीप पाटील (नंदुरबार)
आर. के. दातीर (नाशिक)
रामभाऊ खाडे (बारामती)

**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: आर. बी.भांडवलकर
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगावरोड,
यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६

**अर्थसंवाद वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांच्याकडून रु.१,५०,०००/- रक्कम २०१४-१५ या वर्षासाठी मिळाली.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

**अक्षर रचना-** सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.

**मुद्रणालय-** सातपुडा ऑफसेट, जळगाव.

## संपादकीय संवाद...

### सिरियन निर्वासितांचा आर्थिक प्रश्न.....

सिरियातील सुमारे दहा लाख लोकसंख्येचं रक्वा शहर. येथील अल् अमसी चौकाजवळील गार्डनमध्ये पूर्वी तरूण जोडपी प्रेमगुंजन करताना दिसत असत. ते दृश्य कधीच लुप्त झालं आहे. तिथं आता दिसतात इसीसचे काळे झेंडे. रक्वा शहरावर इसीस संघटनेनं आपली पकड मजबूत केली आहे. धार्मिक बंधनाच्या नावाखाली सिरियातील नागरिकांची आतल्या आत घुसमट सुरू आहे. सिरिया अन् इराक हे देश ज्वालामुखीच्या तोंडावर आहेत असं म्हटलं जातं. त्याचं कारण एकच् आहे. ते म्हणजे इसीस (इस्लामिक स्टेट ऑफ इराक ॲण्ड सिरिया) ही दहशतवादी संघटना. सिरियात गेल्या १५ वर्षांपासून बसर हफीज अल् असाद हे राष्ट्राध्यक्षपदी आहेत. त्यांची राजवट अमेरिका व युरोपीय देशांना पसंत नाही. असाद यांच्याविरोधात इसीसनं रक्तरंजीत संघर्ष चालवला आहे. सिरियन राजधानी दमास्कसमध्ये असाद यांचे सैन्य व दहशतवाद्यांमध्ये चकमकी घडत असतात. साऱ्या देशात दहशत आहे. असाद यांना राष्ट्राध्यक्षपदावरून हटवून राष्ट्राची सत्ता हाती घेण्याचे इसीसचे प्रयत्न आहेत. कुणीही कुणावर वरचढ ठरला तरी तोवर सिरिया जळतच राहणार आहे. कुठलीही दहशतवादी संघटना केवळ दहशतीच्या नव्हे तर आर्थिक बळावर उभी राहते. इसीसला प्रारंभी अल्-कायदाचे आर्थिक सहाय्य मिळाले, असा दावा केला जातो. इसीसची एकूण उलाढाल तब्बल दोन अब्ज डॉलरच्या जवळपास असल्याचे थॉमसन रॉयटर्सच्या २०१४ मधील अहवालात म्हटले आहे. भारतीय रुपयात त्याचे मूल्य आज १३२ अब्ज रुपये इतके आहे. या वर्षाची उलाढाल जवळपास ३ अब्ज डॉलर्स म्हणजे १९८ अब्ज रुपये एवढी असल्याचा अंदाज व्यक्त केला जातो. हे उत्पन्न येतं तरी कुठून?.... पहिला महत्त्वाचा मार्ग म्हणजे तेलविहिरी. इराक व सिरियामध्ये जो भाग इसीसच्या ताब्यात आला आहे तेथे ९ ते१० तेलविहिरी आहेत. या विहिरींतून दररोज हजारो बॅरल तेल उत्पादन केले जाते. या व्यवहारातून रोज हजारो डॉलर्स मिळतात. यासह ज्या ज्या भागात इसीसनं आपलं साम्राज्य निर्माण केलं आहे. त्या भागात सर्व व्यापारी उद्योजकांना हप्ता द्यावा लागतो. इसीसच्या ताब्यात असलेल्या भागात व्यावसायिकांना १० ते १५ टक्के कर लादला जातो. ज्यांना इसीसच्या भागातून प्रवास करावा लागतो त्यांना टोल द्यावाच लागतो, ही रक्कम कोट्यवधीच्या घरात जाते. शिवाय इसीसच्या साम्राज्यातील संपूर्ण शेती इसीसच्याच ताब्यात आहे. त्यातून मिळणारं उत्पन्नही इसीसच्या संपत्तीत भर घालतं. इसीसनं अल्पावधीत जगात दहशत निर्माण केली. सर्व घटना २०१५ या वर्षातील आहेत. २६ जून रोजी ट्युनिशियात ३८ पर्यटकांची हत्या, ६ ऑक्टोबर रोजी येमेनमध्ये आत्मघातकी बॉम्बहल्ल्यात ६ ठार, पश्चिम सौदीत आत्मघातकी हल्ला होऊन १५ ठार, ३१ ऑक्टोबर रोजी इजिप्तच्या सिनाई बेटावरील डोंगराळ भागात इसीसने पाडलेले रशियन विमान कोसळल्याने सुमारे २२४ प्रवासी ठार, १३ नोव्हेंबरच्या पॅरीसवरील हल्ल्यात १२९ जण ठार, १३ नोव्हेंबरलाच बैरुतमध्ये दुहेरी बॉम्बस्फोटात ४३ ठार. या सर्व घटनांमागे इसीस होतं असा आरोप केला जात आहे.

सिरीयन जनता प्रचंड त्रस्त आहे. तेथील सामान्य माणसाला आता आर्थिक प्रश्न भेडसावत आहेत. कधीकाळी ऐश्वर्य अनुभवलेल्या अनेकांना दोन वेळेच्या अन्नाची भ्रांत पडली आहे. पेटलेल्या वातावरणामुळे अन्य सुखसोयींची तिथं वानवा आहे. सर्वाधिक परवड होतेय ती तेथील महिला व लहान मुलांची. याचं चित्रण लिस्ट डॉसेट यांनी सिरीयावर बनविलेल्या लघुपटात अचुकपणानं केलं आहे. तेथील बालकांचं बालपण हिंसाचारानं करपलं गेलं आहे. बालकांना पाठ्यपुस्तकातील कथाकवितांपेक्षा दहशतवाद्यांच्या हातात असलेल्या शस्त्रांची नावे

तोंडपाठ आहेत. तेथील कीफाह हा आठव्या वर्गात शिकणारा मुलगा लघुपटात एकच वाक्य पुन्हा-पुन्हा सांगतो ते म्हणजे - आम्हाला खायला पोटभर अन्न मिळत नाही.

स्थलांतरितांच्या घुसखोरीचा प्रकार फक्त आपल्याकडेच होतोय असं नाही. युरोपमध्ये सध्या घुसखोरी प्रश्नानं मोठं रूप धारण केलं आहे. सिरिया, इराक, येमेनमधून येणाऱ्या निर्वासितांना कसं सामावून घ्यावं या समस्येनं युरोपला ग्रासलं आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासाकडे लक्ष देणारी ही राष्ट्रं निर्वासितांकडे एका आपत्तीच्या नजरेनं पहात आहेत. सिरिया-इराकमध्ये निर्माण झालेल्या युध्दजन्य स्थितीतून आपल्या बचावासाठी तेथील जनता भूमध्य सागरामार्गेयुरोपचा किनारा गाठत आहे. आपली संपत्ती, आपला व्यवसाय, आपला देश हे सगळं सोडून जाणं सोपं नाही. जवळ विदेशी चलन नाही. प्रवास साधनांची शाश्वती नाही. मिळेल त्या साधनानं, ज्यात जागा मिळेल अशा खचाखच भरणाऱ्या जहाजानं तेथील जनसामान्य देश सोडताना दिसताहेत. दरम्यान ग्रीसमध्ये समुद्रमार्गाने घुसताना बोटीतल्या एका तरूणाच्या हातातून त्याचे अलान कुर्दी नावाचे लहान मूल निसटून पाण्यात पडले. त्याचा मृतदेह काही तासानंतर तरंगत ग्रीसच्या किनाऱ्यास लागला. त्याची सचित्र हृदयद्रावक कहाणी अनेक आंतरराष्ट्रीय चॅनल्स्नी प्रदर्शित केली. २८ ऑक्टोबर रोजी ग्रीस द्वीपसमुहावर घडलेल्या अपघातामध्ये ११ विस्थापितांचा मृत्यू झाला. एक मोठी लाकडी नौका बुडल्यानंतरही २४२ विस्थापितांचे प्राण वाचवण्यात ग्रीसच्या तटरक्षक दलाला यश आलं. खराब हवामानाचा सामना करत हजारो लोक तुर्कीच्या नौकांमधून ग्रीस द्वीपसमुहाकडे जात आहेत. हंगेरीने आपल्या रेल्वेचे दरवाजे निर्वासितांसाठी बंद केले आहेत. ज्यांच्याकडे तिकीट आहे त्यांनादेखील रेल्वेत घेतले जात नाही. युरोपात आश्रयास येणारे हे आर्थिक कारणासाठी तेथे जात आहेत. तिथं त्यांना रोजगाराची अपेक्षा आहे. या निर्वासितांची झळ प्रथम ग्रीस व इटलीला जाणवली. ग्रीस आर्थिक संकटातून जात असताना निर्वासितांचा लोंढा पेलवणं या देशाला आर्थिकदृष्ट्या अवघड आहे. त्याच वेळी युरोपातील फ्रान्स, जर्मनीसारखी श्रीमंत राष्ट्रे निर्वासितांपासून आपल्या सीमा सुरक्षित करत आहेत. युरोपात जिथं निर्वासित आश्रयाला आहेत तिथं त्यांचं जीवन सुखाचं मुळीच नाही. पैसा-साधनांचं दुर्भीक्ष्य असलेल्या निर्वासितांना दारिद्र्याशी दोन हात करावेच लागणार आहेत. त्यांना दिली जाणारी मदत तात्पुरती राहणार आहे. शिवाय हे देश सुरक्षिततेच्या कसोटीतून पहातील त्यावेळी परिस्थिती अधिक बिकट होईल. युरोपीयन राष्ट्रांना हे माहीत आहे की, निर्वासितांना रोखणे हे या समस्येचे उत्तर नाही. तर खरी उपाय योजना ही त्या भौगोलिक क्षेत्रात होणं गरजेचं आहे, जिथं या समस्येचा उगम होत आहे. युध्दजन्य स्थिती किती काळ टिकेल याचं उत्तर कुणाकडेच नाही. पण एवढं मात्र नक्की की, विदेशी छावण्यात राहणारी सर्वसामान्य जनता आर्थिक, सामाजिक, सुरक्षाविषयक असंख्य प्रश्नांच्या जाळात होरपळत आहे.

**यशस्वी अधिवेशन:** मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९वे राष्ट्रीय अधिवेशन दि.१६ ते १८ नोव्हेंबर २०१५ दरम्यान अनेकान्त एज्यु. सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथे डॉ.सुहास आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. हे अधिवेशन यशस्वी ठरले. कारण मोठ्या संख्येनं चर्चासत्रात शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. आयोजक महाविद्यालयाने सभागृह व्यवस्था, रहिवास व्यवस्था व आदरातिथ्य उत्तम पध्दतीने केले. परिषदेचे कार्याध्यक्ष चारुदत्त गोखले, कार्यवाह डॉ.राजेंद्र भांडवलकर, महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक कार्याध्यक्ष डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य डॉ.एम.के.कोकटे, स्थानिक कार्यवाह प्रा.रामभाऊ खाडे यांनी यशस्वितेसाठी प्रयत्न केले. या अंकात जाहिरात देण्याबाबत प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य डॉ.एम.के.कोकटे, स्थानिक कार्यवाह प्रा.रामभाऊ खाडे यांनी सहकार्य केले. या अंकासाठी प्रा.मो.स.भावे यांचे सहकार्य लाभले. अर्थसंवादच्या या अंकास शोधनिबंध पाठविलेल्या सर्व लेखकांचे आभार मानतो. या अंकास वाचक स्वीकारतील अशी अपेक्षा आहे.

**अविनाश रामलाल निकम, प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'**

# रशियातले संक्रमण : उध्वस्त समाजवादाकडून अज्ञात भांडवलशाहीकडे

**अशोक मोडक, मुंबई,**
माजी आमदार, विधान परिषद.
भ्रमणध्वनी: ९८१९११५५५६

*(मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९वे राष्ट्रीय अधिवेशन दि.१६ ते १८ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत बारामती येथे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात संपन्न झाले. या अधिवेशनात १६ नोव्हेंबर २०१५ रोजी नी.वि. सोवनी व्याख्यानमालेत अर्थतज्ज्ञ डॉ.अशोक मोडक यांचे रशियातले संक्रमण या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. या व्याख्यानात त्यांनी प्रभावीपणानं व्यक्त केलेले विचार लेखस्वरुपात प्रकाशित करत आहोत.*

*- प्रमुख संपादक)*

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या या एकोणचाळीसाव्या अधिवेशनात 'रशियातले संक्रमण' या विषयावर भाषण देण्यासाठी मी उभा आहे. आपल्यासारख्या विद्वत्जनांसमोर एका महत्त्वाच्या विषयावर प्रकट चिंतन करण्याचे भाग्य मला लाभले आहे व याबद्दल संयोजकांना मी भाषणाच्या प्रारंभीच मनापासून धन्यवाद देतो. पण मित्रांनो तीन कारणांमुळे माझ्या मनावर दडपण आहे हे कृपया समजून घ्या. एकतर कै.नी.वि.सोवनी यांच्या पुण्यस्मरणार्थ प्रतिवर्षी होणाऱ्या व्याख्यानमालेतले हे एक पुष्प आहे. माननीय सोवनी यांनी अर्थशास्त्राचे अध्यापन व लेखन करतांना असामान्य गृहपाठ करण्याची प्रथा सुदृढ केली; ही प्रथा रुजावी या सद्हेतूनेच त्यांनी आणखी काही कर्तृत्वसंपन्न सहकाऱ्यांना बरोबर घेऊन मराठी अर्थशास्त्र परिषदेची स्थापना केली. अशा एका अलौकिक अर्थशास्त्रज्ञाची आज पुण्यस्मृती जागविली जात आहे. माझ्याकडून भाषणाच्या ओघात कोणताही प्रमाद घडू नये हीच इच्छा आहे, पण काही त्रुटी अथवा उणीवा राहतील का हा प्रश्न माझ्या मनात उद्भवतो व त्यामुळेच मनावर दडपण येते. दुसरे म्हणजे व्यासपीठावर आणि सभागृहात विद्वत्जन बसले आहेत. आपणां सर्वांनी आतापर्यंत अनेक थोरामोठ्यांची भाषणे ऐकली आहेत व आजही याच

उंचीने भाषण व्हावे अशी आपण अपेक्षा करीत आहात. मी या अपेक्षांची पूर्ती करू शकेन का? माझ्या मनावर याही कारणासाठी दडपण आहे. जो विषय आपणासमोर मांडावा अशी विनंती संयोजकानी केली आहे तो विषय खूप जटिल आहे, बहुआयामी आहे व या कारणामुळे देखील माझ्या मनावर दडपण आहे. आपण याची नोंद घ्यावी व माझ्या धृष्ठतेबद्दल क्षमा करावी ही विनंती सुरुवातीलाच करीत आहे.

**विषयाचे औचित्य:**

मुळात हाच विषय मी भाषणासाठी कां नक्की केला याचेही विवेचन आता करणे औचित्याचे व अगत्याचे आहे. सन १९९१ च्या डिसेंबर महिन्यात सोव्हिएत संघाला ग्रहण लागले, सोव्हिएत संघ कोसळला आणि इतर चौदा राष्ट्रांप्रमाणे रशियाही स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र म्हणून जगासमोर आला. म्हणजे सोव्हिएत विध्वंसाला व रशियाच्या निर्मितीला यंदा चोवीस वर्षे पूर्ण होत आहेत, परन्तु रशियाच्या ग्रहणाचे वेध सन १९९० च्या सप्टेंबरमधेच लागले हे लक्षात घेतले व रिचर्ड साकवा या जाणकार विचारवंताचे विवेचन समजून घेतले तर रशियाचे उध्वस्त समाजवादाकडून अज्ञात भांडवलशाहीकडे जे संक्रमण सुरु झाले ते सन १९९० मधेच जगाला कळून चुकले हे लक्षात येईल व या दृष्टीने रशियन संक्रमणाला यंदा पंचवीस वर्षे पूर्ण झाली आहेत हा निष्कर्ष निष्पन्न होईल. रिचर्ड साकवा काय म्हणताहेत ते आता उद्धृत करतो:- "शॅतॅलिन्, याव्लिन्स्की आणि गैदर या तीन रशियन अर्थशास्त्रज्ञानी सप्टेंबर १९९० मध्ये 'पाचशे दिवसात रशियाचे बाजारीकरण' या शीर्षकाची एक कार्यक्रम पत्रिका तत्कालीन सोव्हिएत अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांना सादर केली होती. पण रुढिमार्तण्डांच्या विरोधामुळे गोर्बाचेव्ह यांना ही कार्यक्रम पत्रिका अमलात आणतां आली नाही. तेव्हाच जगाला कळून चुकले की सोव्हिएत संघ आवर्तात सापडला आहे, तो नव्या दिशेला जाऊं शकत नाही, त्याचप्रमाणे मूळच्या उद्दिष्टांनाही पूर्ण करूं शकत नाही... सोव्हिएत संघ संपुष्टात आला आहे, पण यातून काय निर्माण होणार हे अनाकलनीय आहे हेच खरे." [पहा: Richard Sakwa, Russian Politics and Society (New York, 2008), P.21]

सारांश, रशियाच्या संक्रमणाला प्रारंभ झाल्यानंतर पंचवीस वर्षे लोटली आहेत व म्हणूनच या संक्रमणाविषयी विश्लेषणात्मक विवेचन करणे प्रसंगोचित आहे. दुसरे कारण सध्याचे रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्या विद्यमान कारकीर्दीशी निगडीत आहे. पुतिन महाशय सन २०१२ मध्ये अध्यक्ष म्हणून तिसऱ्यांदा निवडून आले. सन २००८ ते सन २०१२ या चार वर्षात व्लादिमिर पुतिन रशियाचे पंतप्रधान होते आणि तत्पूर्वी सन २००० पासून ते सन २००८ पर्यंत ते अध्यक्षपदी बसले होते. रशियन संविधानानुसार कोणीही व्यक्ती जास्तीत जास्त दोन वेळाच सलग अध्यक्षपद भूषवूं शकते, म्हणूनच सन २००८ मध्ये पुतिन अध्यक्षपदावरून पायउतार झाले व त्यांच्या जागी दिमित्री मिद्वेदेव्ह अध्यक्षस्थानी विराजमान झाले. त्यानंतर चार वर्षे लोटल्यावर नियतीने संकेत दिले आणि मिदवेदेव्ह पंतप्रधान तर पुतिन अध्यक्ष असा खांदेपालट झाला. सन २०१२ मध्ये अध्यक्ष म्हणून पुतिन यांची कारकीर्द सुरु झाली. मग पुतिन यांनी रशियन संविधानात एक दुरुस्ती केली, या दुरुस्तीप्रमाणे

रशियन अध्यक्षांची कारकीर्द चार वर्षांच्या ऐवजी सहा वर्षांची झाली. याचाच अर्थ असा की आतां पुतिन महोदय सन २०१२ पासून सन २०१८ पर्यंत अध्यक्षपद भूषवतील आणि सलग दुसऱ्यांदा अध्यक्ष म्हणून निवडून येणे अनुज्ञेय असल्याने त्यानंतरची सहा वर्षेही अध्यक्षपदावर मांड ठोकून बसतील. सन २००० मध्ये पुतिन रशियाचे कर्णधार बनले. सन २००८ ते २०१२ अशी चार वर्षे भले पुतिन महाशय पंतप्रधान होते, पण पडद्याआड राहून सूत्रे हलविण्याची करामत करीतच होते व आता तर आणखी सन २०२४ पर्यंत ते रशियाचे अध्यक्ष म्हणून मखरात बसणार आहेत. स्टालीन पंचवीस वर्षे रशियाचे सूत्रधार राहिले होते... स्टालीन नंतर चोवीस वर्षे रशियाचे भाग्यविधाते हे बिरूद पुतिन यांच्याच भाळी झळकणार आहे. सन २०१२ मध्ये पुतिन यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीला प्रारंभ झाला... सन २०१८ मध्ये वर्तमान कारकीर्द पूर्ण होईल... पण २०१५ मध्ये तीन वर्षे पूर्ण होत आहेत म्हणजेच पुतिन यांच्या वर्तमान कारकीर्दीचे मध्यावधी मूल्यांकन करण्यासाठी नामी संधी चालून आली आहे. रशियाच्या सध्याच्या संक्रमणात बोरीस येल्त्सिन यांच्याप्रमाणेच व्लादिमिर पुतिन यांचाही मोलाचा हिस्सा आहे तेव्हा याही दृष्टीने रशियन संक्रमणाविषयी आताच प्रकट चिन्तन करणे प्रसंगोचित आहे या अभिप्रायाशी आपण सहमत व्हाल असे वाटते.

### संक्रमण विवेचनाची पार्श्वभूमी:

पुतिन यांनी रशियाला दलदलीतून खेचून वर आणले असे काहीशा अलंकारिक भाषेत म्हणता येईल. सन २००८ च्या ऑगस्टमध्ये त्यांनी जॉर्जियात लष्करी हस्तक्षेप करण्याचा निर्णय घेतला, हा हस्तक्षेप यशस्वीरीत्या पार पाडल्यानंतर त्यांनी दक्षिण ओसेनिया व अब्रवासिया हे प्रांत जॉर्जियापासून विलग करण्यात यश मिळविले. नंतर युक्रेनशी तंटाबखेडा सुरु करणाऱ्या पुतिन यांनी युक्रेनच्या क्रिमिया प्रांताला युक्रेनपासून विलग करण्यात सफलता मिळविली. पाठोपाठ पुतिन यांच्या आदेशावरुन मध्यपूर्वेतल्या सीरिया देशात रशियाने कुरघोडी केली. तिथले अध्यक्ष बशर अल् असद यांची भक्कम पाठराखण करणाऱ्या पुतिन महोदयांनी यासंदर्भात अमेरिका व सौदी अरेबिया सारख्या सुन्नी राष्ट्रांशीच टक्कर खेळण्याचे धोरण श्रेयस्कर मानले. अमेरिका, सौदी अरेबिया या राष्ट्रांना बशर अल् असद यांच्या सत्तेला सुरुंग लावायचा आहे, तर पुतिन यांनी इराणसारख्या शिया पंथीय राष्ट्रा साथ दिली व बशर अल् असद सत्तेवरून पा ार होणार नाहीत, बाह्यशक्तींच्या दबावाला ळी पडणार नाहीत अशी साहसी घोषणा क पुढाकार घेतला. जॉर्जिया, युक्रेन व सिरि या तिन्ही राष्ट्रांच्या धोरणांना रशिया स्वतःच्या मर्जीप्रमाणे आकार देईल ही पुतिन यांची भूमिका अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, सौदीअरेबिया इत्यादी राष्ट्रांना अमान्य आहे व म्हणूनच रशियावर जटिल प्रतिबन्ध लादले गेले आहेत. 'दुष्काळात तेरावा महिना', या म्हणीची आठवण रशियाला व्हावी अशा पद्धतीने खनिज तेलाच्या किंमती गडगडत आहेत. म्हणजे सन २००८ पासून रशियाला दुष्ट चक्राला तोंड द्यावे लागत आहे. रशियन संक्रमणाचे विवेचन या पृष्ठभूमीवर करणे अत्यंत प्रासंगिक आहे असे मी म्हटले तर त्यात काही गैर आहे कां ?

### ऐतिहासिक अभूतपूर्व परिवर्तन:

### रशियन संक्रमणाची वैशिष्ट्ये

ज्या रशियन संक्रमणाचे विवेचन मी करणे अपेक्षित आहे ते खूपच आगळेवेगळे, वैशिष्ट्यपूर्ण आहे. एकतर हे संक्रमण ऐतिहासिक व अभूतपूर्व आहे. दुसरे म्हणजे हे संक्रमण शांततेत पार पडले आहे आणि तिसरे म्हणजे या संक्रमणाची एकूण फलनिष्पत्तीही असामान्य आहे.

कुठल्या अर्थाने सध्याचे रशियन संक्रमण ऐतिहासिक व अभूतपूर्व आहे? झारच्या काळाचा विचार केला किंवा सन १९१७ नंतर उलगडत गेलेल्या सोव्हिएत कालखंडाचा विचार केला तर यापूर्वी कधीही रशियाने भांडवलशाही व लोकशाही आपल्या भूप्रदेशात रुजावी म्हणून वाटचाली केली नव्हती असे लक्षात येईल. झारच्या काळात Slavophilism विरुद्ध Westernism असा वादविवाद रंगला होता. काही जण रशियाच्या मूळच्या स्लाव्ह संस्कृतीचे पुनरूज्जीवन करायचे या इच्छेने झपाटले होते, तर त्याच काळात त्यांचे प्रतिस्पर्धी रशियाने पश्चिमी देशांचे अनुकरण करावे हा धोशा लावत होते हे कळून चुकेल. पण भांडवलशाही व लोकशाही यांचे निर्भेळ कौतुक तेव्हां वाजत गाजत नव्हते. त्यानंतर जन्माला आलेल्या सोव्हिएत संघात तर मार्क्सवाद रुजविण्याचीच खटपट झाली, हा मार्क्सवादच अवघ्या जगाला तारील; भांडवलशाही, लोकशाही वगैरे विचारधारांना व आयुध्यप्रणालींना गाडून टाकील; एक नवा 'आदर्श' माणूस मार्क्सवादाच्या झेंड्याखाली उभा राहील असा आत्मविश्वास तेव्हा जागविला गेला. प्रत्यक्षात मार्क्सवादाची कार्यवाही करणारा प्रयोगच धराशायी झाला. मार्क्सवादाच्या दवंड्या व घोषणा निरर्थक ठरल्या ही शोकान्तिका आहे. सुमन्त बॅनर्जी नामक एका वामपंथीय विचारवंताने या संदर्भात वेगळीच मीमांसा केली आहे. बॅनर्जी म्हणतात की महाभारतात अष्टावक्राने आईच्या गर्भात असतांना बापाशी वाद घातला तेव्हा बापाने शाप दिला की जन्मदात्याशी वाद घालणाऱ्या तुला आठ ठिकाणी वाकडे तिकडे शरीर धारण करूनच जन्म घ्यावा लागेल... सोव्हिएत संघ म्हणजे या अष्टवक्राची विसाव्या शतकातली आवृत्ती असेच म्हटले पाहिजे. मार्क्सने सांगितले आहे की सरंजामशाहीनंतर भांडवलशाही आणि भांडवलशाहीनंतर समाजवाद हा नियतीचा क्रम आहे. पण सोव्हिएत संघाने हा क्रम मोडला, सरंजामशाहीनंतर एकदम समाजवाद जन्माला घालण्याची वृथा खटपट केली. मग आठ ठिकाणी वाकडेतिकडे असे शरीर धारण करून सोव्हिएत संघ जन्माला आला. जन्मत:च लुळापांगळा असलेला हा देश शेवटी अमृतमहोत्सवापूर्वीच मृत झाला. एक नक्की; भांडवलशाही व लोकशाही या दिशांकडे कदापि जायचे नाही, या दिशा निषिद्ध मानायच्या हाच निर्धार सोव्हिएत संघात नांदत होता. सन १९९१ नंतर मात्र रशियाने नेमक्या या दिशांकडेच जाण्याची भूमिका स्वीकारली. या अर्थाने हे संक्रमण ऐतिहासिक व अभूतपूर्व म्हटले पाहिजे.

### शांततापूर्ण बदल:

रशियात झालेले संक्रमण तुलनेने शांततेत पार पडले हे या संक्रमणाचे दुसरे वैशिष्ट्य आहे. सोव्हिएत युनियन म्हणजे जणू साम्राज्य होते. ब्रिटिश साम्राज्य अथवा डच साम्राज्य कोसळले व त्यानंतर अनुक्रमे भारतात व इंडोनेशियात जी संक्रमणे झाली ती किती

कटकटींनी, ताण-तणावांनी व हिंसाचारांनी सुरु होती हे विचारात घेतल्यास सोव्हिएत संघाचा विध्वंस आणि त्यानंतर रशियात व इतर सोव्हिएत गणतंत्रात जी संक्रमणे झाली ती मात्र सर्वसाधारणपणे शांततेत झाली हे विसरुन चालणार नाही व म्हणूनच 'तुलनेने' हे क्रियाविशेषण इथे उपयोजिले आहे. सन १९९३ मध्ये म्हणजे रशिया स्वतंत्र झाल्यावर केवळ दोन वर्षे उलटल्यावर बोरीस येल्त्सिन (रशियाचे अध्यक्ष) व रुस्लान खस्बुलातोव्ह (रशियन संसदेचे सभापती) यांच्यातला वादविवाद संघर्षात परिणत झाला, तेव्हा अध्यक्षांच्या कार्यकारी मंडळाने (executive) खसबुलातोव्ह यांच्या विधिमंडळावर (legislative) चक्क सैनिकी हल्ला केला. एकूण १४६ माणसे मरण पावली. तथापि, उपरोल्लेखित इतर साम्राज्यांचा विध्वंस व नंतरची संक्रमणे यापेक्षा कैक पटींनी अधिक हिंसक होती म्हणून १४६ जणांचे मृत्यू विचारात घेतल्यानंतरही हे संक्रमण तुलनेने शांततापूर्ण ठरते हे अधोरेखित केले पाहिजे. सोव्हिएत संघ कोसळला या घटनेचा रशियन माणसाला विषाद वाटतो, कारण सुमारे पाचशे वर्षे रशियाचा सतत विस्तार झाला आहे. सन १९९१ मधे रशियाचा संकोच झाला याचे शल्य साहजिकच आहे महान पीटरने रशियाचा विस्तार बाल्टिक सागरापर्यंत पसरविला, महान कॅथरिन राणीने रशियाची सरहद्द काळ्या सागरला भिडविली, तर जोसेफ स्टालीनने बर्लिन ही रशियाची वेस असल्याचे जगाला सांगितले...सन १९९१ मधे रशियाची मोटार 'रिव्हर्स- मधे गेली. म्हणूनच व्लादिमिर पुतिन म्हणतात:- ''केवळ हृदयशून्य माणूसच 'सोव्हिएत विध्वंसाबद्दल-जल्लोष साजरा करील.'' पण यानंतर पुतिन जी तळटीप जोडतात तीही उल्लेखनीय आहे.:- ''केवळ अक्कलशून्य माणूसच सोव्हिएत संघाच्या पुनरुज्जीवनासाठी प्रयत्नशील राहील.'' [पहा:- The Economist (London) 10 December 2011,P.28] तात्पर्य, रशियाच्या संक्रमणाची गंगा आता उलटी फिरविता येणार नाही, हे नक्की!

**आगळी फलनिष्पती:**

रशियाच्या संक्रमणाची आगळीवेगळी फलनिष्पत्ती हे या संक्रमणाचे तिसरे वैशिष्ट्य! आर्थिक अंगाचा विचार केला तर जिथे हुकूमशाही-नियोजन होते, तिथे सन १९९१ नंतर लोकशाहीबाजारीकरण झाले आहे. राजकीय अंगावर लक्ष केन्द्रित केले तर एकपक्षीय राजवटीऐवजी तिथे बहुपक्षीय राजवट उदय पावली आहे. वैचारिक अंगाचा विचार केल्यास रशियात मार्क्सवादाची एकेकाळी चलती होती, वर्तमानात कोणत्याही तत्त्वज्ञानाची जाहिरात नाही, तिथे deideologisation झाले आहे. भौगोलिक अंगाचा काहीशा तपशीलाने ऊहापोह करतां येईल. सध्याचा रशिया म्हणजे सोव्हिएत संघाचा ७६% भूभाग आहे, रशियाचे स्थूल राष्ट्रीय उत्पादन सोव्हिएत उत्पादनाशी तुलना करता ६१ टक्के आहे, तर रशियाची लोकसंख्या सोव्हिएत लोकसंख्येच्या ५१ टक्के घसरली आहे. असे असूनही रशियाची वर्तमान लोकसंख्या १४ कोटी २० लक्ष आहे, वर्तमानात रशियन भूभागात १२८ राष्ट्रके अथवा वंशसमूह आहेत. सोव्हिएत संघ कोसळल्यानंतर रशियासकट १५ सार्वभौम स्वतंत्र राज्ये जन्मास आली. रशियन नागरिक या सर्व राज्यांमध्ये विखुरलेले आहेत. रशियात १४ कोटी २० लाख तर इतर १४ राज्यांमध्ये २ कोटी ५० लाख रशियन निर्वासित अशी विभागणी झाली आहे. रशिया

पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत ९ हजार किलोमीटर्स पसरलेला आहे. पृथ्वीच्या एक अष्टमांश हिश्यावर रशियाचा हक्क आहे पण १४ राज्ये आतां परकी झाली, Near Abroad झाली, जवळ असूनही दुरावली, अमेरिकेसारख्या देशांना या भूभागातून धुडगूस घालण्याची संधी प्राप्त झाली. पूर्व युरोपीय राष्ट्रे आणि बाल्टिक राष्ट्रे तर युरोपियन युनियनमध्ये सहभागी झाली. हे असे संक्रमण ''न भूतो न भविष्यति'' याच शब्दप्रयोगाद्वारे कागदावर उतरवितां येईल. संक्रमणाची ही फलनिष्पत्ती धक्कादायक आहे.

**येल्त्सिन आणि पुतिन व्यक्तीमत्त्व धारणा आणि कार्यशैली:**

रशियातल्या संक्रमणाचे श्रेय प्रामुख्याने दोन नेत्यांना देतां येईल. बोरीस येल्त्सिन आणि व्लादिमिर पुतिन हेच दोन आसामी या संक्रमणपर्वाचे शिल्पकार आहेत व म्हणून एकेका नेत्याच्या कारकिर्दीत जे संक्रमण झाले त्याचा तपशीलवार आढावा या लेखात घेतलाच पाहिजे. प्रथम या नेत्यांच्या गुणावगुणांचे तौलनिक विवेचन करणे इष्ट ठरेल, कारण या गुणावगुणांमुळे संक्रमणाचा पोत बदलला आहे हे वाचकांच्या लक्षात येईल. बोरीस येल्त्सिन काहीसे धसमुसळे व चंचल तर व्लादिमिर पुतिन तुलनेने शांत, खंबीर व निर्णयाला पक्के असे सहजपणे जाणवते. येल्त्सिन अमेरिकेच्या आहारी गेले, किमान सन १९९२ ते सन १९९३ अशी पहिली काही वर्षे तर हे गृहस्थ बाजारीकरण, लोकशाही, पश्चिमी सभ्यता वगैरे संकल्पनांमुळे जणू झपाटले होते, संपूर्ण सोव्हिएट कालखंडावर बोळा फिरवावा, मार्क्सवाद, साम्यवाद, वर्गसंघर्ष इत्यादी गोष्टी पुसून टाकाव्यात हा अभिनिवेशच येल्त्सिन यांच्या मनावर स्वार झाला होता... पण अमेरिका, ब्रिटन, जर्मनी वगैरे पश्चिमी देशांकडून अनुकूल प्रतिसाद मिळत नाही, उलटपक्षी रशियाच्या हितसंबंधांना या देशांकडून सुरुंगच लावला जातो हे लक्षात आल्याबरोबर येल्त्सिन साहेबाने घुमजाव केले हे वास्तव आहे. रशियाने येल्त्सिन यांच्या नेतृत्वाखाली बाजारीकरण, खाजगीकरण, वैश्वीकरण या त्रिसूत्रीची कार्यवाही सुरु केली, तेव्हा रशियातल्या धनदांडग्यांनी या कार्यवाहीचा पुरेपूर फायदा उठविला आणि येल्त्सिन यांनीही या थैलीवाल्यांसमोर शरणागती पत्करली, साटेलोटे केले व आपले आसन त्या आधारावर अधिक मजबूत केले. व्लादिमिर पुतिन यांनी मात्र धनदांडग्यांना आव्हान दिले, प्रसंगी त्यांना तुरुंगात टाकले, शासनाची पकड पक्की केली व धनदांडग्यांना आणि स्वतंत्र संस्थाने निर्माण करु इच्छिणाऱ्यांना जरब बसविली. राज्यशासन प्रभावी बनल्यावर या संस्थानिकांना अनुशासन मानावे लागले, इस्लामिक दहशतवाद्यांनाही वठणीवर आणण्यात पुतिन महाशय यशस्वी झाले. येल्त्सिन यांनी व्यक्तिनिरपेक्ष प्रशासकीय यंत्रणा रुजविण्याकडे लक्ष दिले नाही. मनोऱ्याच्या अत्युच्च शिखरावर स्वत:च मांड ठोकून बसायचे आणि स्वत:च्या मर्जीतले अधिकारी जागोजागी नेमायचे अशी व्यक्तिसापेक्ष प्रशासकीय यंत्रणा येल्त्सिन काळात उभी राहिली ती येल्त्सिन यांच्या अशा शैलीमुळेच. पुतिन यांनी मात्र प्रशासनाचे Institutionalisation म्हणजे संस्थीकरण व्हावे म्हणून पावले टाकली. प्रमुख कर्णधाराच्या नेतृत्वशैलीमुळे जे परिणाम झाले त्यांचीही नोंद घेतली पाहिजे. येल्त्सिन यांच्या राजवटीत Wild Capitalism ने मूळ धरले, जंगली पुंजीवाद

रशियात विकसला. पुतिन यांच्या काळात मात्र State Capitalism म्हणजे राज्यशासन प्रायोजित व पुरस्कृत पुंजीवाद रशियामध्ये रुजला.

**येल्त्सिन यांचे आर्थिक धोरण : स्वरुप व परिणति:**

बोरीस येल्त्सिन यांनी अर्थकारणाच्या संदर्भात काही विशेष उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवली. १) आर्थिक स्थैर्य गाठणे, २) किंमती शासनाच्या तावडीतून मुक्त करणे, ३) शासकीय तिजोरीतून दिली जाणारी अनुदाने (Subsidies) बंद करणे, ४) गिरण्या- कारखान्यांचे, बँकांचे खाजगीकरण करणे, ५) कररचना व बँक यंत्रणा यांचे पुनर्गठन करणे. ही उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी Shock Therapy आणि Big Bang हे धडाकेबाज उपक्रम अंमलात आणायचे हा निर्णय घेण्यात आला. कोणत्याही कारखान्यास कुठल्याही प्रकारची सब्सिडी द्यायची नाही, आणि या कारखान्यातून तयार होणाऱ्या पक्क्या मालाच्या, तसेच कारखान्यास आवश्यक असलेल्या कच्च्या मालाच्या किंमती सरकारने ठरवायच्या नाहीत असे निर्णय झाले, आणि या निर्णयांची कठोर कार्यवाही झाली तर कारखानदारांना खुल्या स्पर्धांना तोंड द्यावे लागेल, ''स्पर्धांमध्ये तरलात तर जगाल, अन्यथा बुडाल'' असा इषाराच एकेका कारखान्यांना देण्यात आला. म्हणजे साहस कराल तर नफा मिळेल, साहस करण्यात कुचराई केली, अथवा वेडे साहस केले तर जीवघेणा तोटा, जीवघेणे नुकसान सोसावे लागेल म्हणजे यशस्वी होणाऱ्यास नफ्याचे प्रलोभन तर अपयशी ठरणाऱ्यास भय या आशयाची Shock therapy व्यवहारात उतरविण्यात आली. वर्षानुवर्षे शासनावरच विसंबून व्यापार उदीम करण्यास सोकावलेल्या नागरिकांना ही Therapy अंगवळणी पडणे अशक्य होते. मुळात कोणतेही शासन Prescriptive, recommendatory आणि Constructive म्हणजे मार्गदर्शनात्मक, विधायक कामे करण्यासाठी प्रसिद्ध नसते. ते Proscriptive, Prohibitory and restrictive म्हणजे प्रतिबंधात्मक, नियंत्रणात्मक कामे करण्यातच वाकबगार असते. चालत्या गाड्याला खीळ घालणे राज्यशासनाला तुलनेने शक्य असते, रुतून बसलेल्या गाड्याला गतिमान् करणे शासनाच्या आवाक्यात नसते. या सत्याची प्रचीती रशियाला आली. म्हणतां म्हणतां रुबल स्वत:चे मूल्य गमावून बसला, रशियाची अन्नान्न दशा झाली. विषमता वाढली. दुकाने ओस पडली. ''रशियाचा विदेश व्यापार कोणत्याही अल्पविकसित देशाच्या विदेश-व्यापारा सारखा - आतबट्ट्याचा झाला. तेल, वायू वगैरे कच्च्या मालाची घाऊक प्रमाणावर अल्प किंमतीत निर्यात, तर यंत्रसामुग्रीची, पक्क्या मालाची चढेल किंमतीत आयात अशी एकूण दुर्दशा सन १९९९ मधे रशियाच्या भाळी लिहिली गेली.'' [पहा : Neil Robinson, Russia : A state of uncertainty (London,2002, P.116)] जॉन केनिथ गालब्रेथ यांनी Shock therapy च्या भवितव्याविषयी जे भय व्यक्तविले होते ते रशियाच्या दुर्दैवाने खरे ठरले.

सन १९९५ च्या आसपास रशियातले विविध समाजघटक ''आता शासनानेच पुढाकार घ्यावा व अराजक संपुष्टात आणावे'' असा धोशा लावू लागले. उद्योगपती, कारखानदार ''सरकारने आस्तेकदम उदारीकरण स्वीकारावे'' अशी शिफारस करु लागले, संसद सदस्य जनसामान्यांची गाऱ्हाणी मांडू लागले. ''तुम्ही

पुरस्कारिलेल्या खाजगीकरणामुळे बड्या मक्तेदारांचे फावले आहे, तेव्हां आतां या मक्तेदारांवर प्रतिबंधाचे अंकुश लावा.'' या मागणीने जोर धरला. एकमताने युक्तिवाद करण्यात आला की अतिरेकी जल्दबाज सुधारणावाद्यांना हटवा आणि आस्तेकदम वाटचालीची शिफारस करणाऱ्या विशेषज्ञांच्या नेमणुका करा. परंतु येल्त्सिन शासनाच्या पुढाकारामुळे खाजगीकरणाच्या दिशेने वेगवान वाटचाल सुरु झाली होती, तिला खीळ घालणेही सोपे नव्हते. सन १९९१ ते सन २००० या दशकात १ लाख ३० हजार १८० कारखान्यांचे म्हणजे ६६ टक्के कारखान्यांचे खाजगीकरण पूर्ण झाले होते deficit in governance, but surplus in corruption म्हणजे शासनयंत्रणेत तूट, तर भ्रष्टाचारात वैपुल्य अशी अनागोंदी अवस्था उद्भवली होती.

बोरीस येल्त्सिन यांच्या कारकिर्दीचे मूल्यमापन करतांना प्रथमच असे जाणवते की रशियाच्या या पहिल्या अध्यक्षांना रशियन संक्रमणाच्या संदर्भात दारुण अपयश आले व म्हणून ते विवेचन आता मी केले पाहिजे. रशियासारख्या देशात जिथे पाचशे वर्षे या ना त्या प्रकारचे हुकूमशाही शासन अस्तित्वात होते तिथे सत्तारुढ झालेल्या शासकांकडून तीन किमान अपेक्षा असतात. एक तर या शासकांनी नागरिकांसाठी अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टींप्रमाणेच विविध प्रकारची स्वातंत्र्ये उपलब्ध करून दिली पाहिजेत. दुसरी अपेक्षा स्वायत्ततेबाबत आहे, कारण संक्रमणावस्थेचा फायदा उठविण्यासाठी अनेक धनदांडगे समूह पुढे येतात व त्यांना भीक न घालण्याची, प्रसंगी त्यांना सजा ठोठावण्याची स्वायत्तता शासकांकडे असली पाहिजे. अर्थात् काही सज्जन नागरिक न्यायाच्या व माणुसकीच्या प्रस्थापनेसाठी उदात्त हेतूंनी प्रेरित होऊन शासकांना विरोध करू इच्छितात. तेव्हां अशा श्रेष्ठ अभिजनांशी वागतांना मात्र शासकांनी सभ्य असले पाहिजे म्हणजेच अत्यावश्यक गोष्टी पुरविण्याची क्षमता, धनदांडग्यांचे आव्हान यशस्वीरीत्या झेलण्याची स्वायत्तता व सज्जनांशी व्यवहार करण्याची सभ्यता ही गुणसंपदा शासकांकडे आवश्यक मानली जाते. बोरीस येल्त्सिन मात्र अशा गुणसंपदेपासून दूर राहिले व संक्रमणाच्या संदर्भात अपयशाचे धनी झाले.

येल्त्सिन ज्याप्रमाणे उपरोल्लेखित गोष्टी पुरविण्यात असमर्थ ठरले, त्याचप्रमाणे चलनवाढ, महागाई रोखण्यात, आर्थिक स्थैर्य उत्पन्न करण्यात, शासनाची पत सांभाळण्यासाठी अपयशी ठरले. सन १९९३ मध्ये रशियन राजकारण संसदीय निवडणुकीमुळे ढवळून निघाले तेव्हा येल्त्सिन यांनी आश्वासने दिली, दावे केले, ते विश्वसनीय प्रतिबद्धतेचे पुरावे ठरावेत (Credible commitments) अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात दावे फोल ठरले. परिणामतः झिरिनोव्स्की यांच्यासारखे जहाल राष्ट्रवादी आणि झ्युगानोव्ह यांच्यासारखे कडवे साम्यवादी सन १९९३ च्या संसदीय निवडणुकीत विजयी झाले. तेव्हा येल्त्सिन आणि त्यांचे सगेसोयरे सांगू लागले. ''आम्हीच रशियात खरे संक्रमण साकारु शकतो, भांडवलशाही व लोकशाही रशियात आणू शकतो, आमचे विरोधक रशियाला पुनश्च हुकूमशाहीच्या अंधारात ढकलतील.'' येल्त्सिन आणि मंडळी असा उद्घोष करून थांबली नाहीत, तर त्यांनी आपली सत्ता मजबूत बांधण्यासाठी उद्योगपती, कारखानदार वगैर धनदांडग्यांशी अभद्र

युती केली. या लखपतींना मग येल्त्सिन शासनाकडून कैक सवलती देण्यात आल्या, करांपासून सूट देण्यात आली. या शासनाला धनाची गरज होती व ही गरज पूर्ण करण्यासाठी शासनाने 'loans for shares' नावाची अफलातून योजना अमलात आणली. ''बँकांनी, सावकारांनी आमचे कर्जरोखे खरीदावेत, या माध्यमातून आम्हास कर्जे द्यावीत व या धनकोंना आम्ही मोबदला म्हणून गिरण्या-कारखान्यांचे, खाणींचे भागधारक होण्यास अनुमती देऊ.'' या आशयाचे साटेलोटे येल्त्सिन शासन आणि बँका यांच्यात आकाराला आले. थोडक्यात बँकांनी शासनाला लोन्स् द्यावीत आणि गिरण्यांचे व खाणींचे शेअर्स घ्यावेत अशी सौदेबाजी सरकारकडून आशीर्वाद पावली. सारांश, वेगवेगळ्या प्रकारचे लक्षाधीश, धनदांडगे शासनाकडून 'सन्माननीय प्रतिष्ठापात्र नागरिक' असे बिरुद मिळविण्यात यशस्वी ठरले, नेमक्या याच कुबेरांच्या पाठींब्यामुळे बोरीस येल्त्सिन यांच्या सत्तेला अभय मिळाले. या सोयीस्कर सौदेबाजीची भीषण झळ मात्र जनसामान्यांना भोगायला लागली. विषमता वाढली, दरिद्रता वाढली, रशियन अर्थव्यवस्था रसातळाला गेली. म्हणजे सोव्हिएत संघ सन १९९१ मध्ये कोसळला तेव्हां जशी विपन्नावस्था होती तशीच किंबहुना अधिक भीषण दुरावस्था सन १९९९ मध्ये रशियाच्या अनुभवास आली. रशियातली, खास करुन मॉस्को व लेनिनग्राड वगैरे शहरातील मेट्रो ट्रेन व्यवस्था एकेकाळी कार्यक्षमता, स्वच्छता व स्वस्तता या कसोट्यांवर जगात प्रशंसनीय मानली जात असे. सन १९९१ नंतर मात्र भूगर्भातली मेट्रो स्थानके उध्वस्त धर्मशाळांची आठवण जागविणारी ठरली. सोव्हिएत काळात एक श्रेष्ठ मराठी साहित्यिक अनंत काणेकर लंडनहून मॉस्कोला गेले. तेथून भारतात परतल्यावर त्यांनी या प्रवासाचे वर्णन करणारे पुस्तक प्रसिद्ध केले. ''धुक्यातून लाल ताऱ्याकडे'' या शीर्षकाचे हे पुस्तक वाचकांच्या पसंतीस उतरले. (धुके= लंडन, तर मास्को= लाल तारा) या पुस्तकात एके ठिकाणी काणेकर लिहितात, ''मास्कोतली भूगर्भामधील मेट्रो स्टेशन्स तर संगमरवरी महाल आहेत. म्हणजे भूपृष्ठावर भले भांडवलशाही देशांशी तुलना करता दुर्भिक्ष्य असेल, पण भूगर्भात मात्र सुंदर महाल आहेत. यावर कोटी करण्यासाठी मी माझ्या रशियन वाटाड्याला सांगितले, "your socialism is still underground" समजा, अनंत काणेकर नवा जन्म घेऊन सन १९९९ मध्ये मॉस्कोच्या मेट्रो प्रवासासाठी भूगर्भात एस्कलेटरने उतरले असते तर त्यांनी म्हटले असते, "Even the underground socialism has also disappeared in Russia after 1991."

येल्त्सिन महाशयांनी स्वत:ची सत्ता निरंकुश वाढावी म्हणून धनदांडग्यांच्या अल्पजनशाहीला जाणीवपूर्वक प्रोत्साहन दिले. रशियन राज्यशासनातही त्यांनी स्वत:च्या मर्जीतल्या मंडळींना निरनिराळ्या पदांच्या खिरापती वाटल्या, गव्हर्नर्स नेमले तेही येल्त्सिन यांच्याशी एकनिष्ठ राहणारे. या पद्धतीला Presidental Vertical असे नाव मिळाले. म्हणजे विधिमंडळ व न्यायमंडळ यांच्यापेक्षा कार्यकारी मंडळ वरचढ झाले, तर कार्यकारी मंडळात अध्यक्ष महाशय सर्वोच्चपदी जाऊन बसले. समजा, कुणी अध्यक्षांच्या बेलगाम वर्तणुकीस वैध मार्गांनी विरोध केला तर त्याच्या मुसक्या बांधाव्या, त्याला

शिक्षा करावी असा रिवाज अमलात आला, मग वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमे येल्त्सिनला-शरण आली. येल्त्सिन अमर्याद अधिकारांचे धनी झाले, राज्यशासन नागरिकांना अन्न, वस्त्र, निवारा पुरविण्यात असमर्थ ठरले. मूठभर श्रीमंतांसमोर नतमस्तक झाले. नागरिकांना सोव्हिएत काळाची, झारच्या काळाची आठवण झाली असेल. विडम्बन हे की येल्त्सिन यांनी सोव्हिएत राजकारण, सोव्हिएत अर्थकरण संपुष्टात आणण्यासाठी सोव्हिएत-शैलीचाच वापर केला. शासनाची तिजोरी रिकामीच राहिली, कारण बँका व उद्योगपती एका मर्यादेपलीकडे कर्जरोखे खरीदू शकले नाहीत. म्हणून येल्त्सिन यांना विदेशांकडे झोळी पसरावी लागली. सरकारवरचे कर्जाचे ओझे अशाप्रकारे वाढत गेले त्यातून रशियाचे चलन मूल्यहीन झाले. दुर्दैव म्हणजे याच वायुमंडलात चेचन्या बंडखोरांनी रशियात आतंकवादाला खतपाणी घातले. सारांश, भुकेल्या नागरिकांना जीव मुठीत धरुन रहावे लागले.

**रशियन अर्थव्यवस्थेचे पुनरुत्थान व्लादिमिर पुतिन: ऊर्जा राष्ट्रवाद:**

सन १९९९ मध्ये म्हणजे येल्त्सिन यांच्या कारकीर्दीतल्या शेवटच्या वर्षी येल्त्सिन यांनी एका मागून एक या क्रमाने सहा जणांना पंतप्रधानपदे दिली. पैकी पाच जण निष्प्रभ ठरले, सहावे व्लादिमिर पुतिन मात्र आपला जम बसविण्यात यशस्वी झाले.

पुतिन यांना नशिबाने साथ दिली हे अर्थातच मौलिक सत्य आहे. जगाच्या बाजारपेठेत खनिज तेलाच्या किमती वाढल्या, रशियाच्या दृष्टीने ही सुवर्णसंधी ठरली. तेलाच्या एका पिम्पाची किंमत १२ अमेरिकन डॉलर्सवरुन १५० डॉलर्सपर्यंत वाढली. रशियन शासन तेलाची निर्यात करुनच तिजोरीत भर घालते म्हणून पूतिन यांनी तेल उत्खननाला सर्वोच्च प्राधान्य दिले. सौदी अरेबिया हा तेल उत्पादक देश म्हणून जगात विख्यात आहे. पण सन १९९९-२००० या वर्षात रशियाने या क्षेत्रातला सौदी अरेबियाचा विक्रम मोडून काढला. त्यावर्षी सौदी अरेबियाचे तेल उत्पादन प्रतिदिन९२ लाख पिम्पांचे, तर रशियाचे उत्पादन ९५ लाख पिम्पांचे झाले. जगातल्या तेल उत्पादनापैकी २० टक्के हिस्सा, तर वायू उत्पादनापैकी ३० टक्के हिस्सा रशियात पैदा करण्यात पुतिन सफल झाले. या खनिज तेलाची व नैसर्गिक वायूची जगात निर्यात करुन विदेशी गंगाजळी मजबूत करण्यातही पुतिन यशस्वी झाले. सन २००८ मध्ये रशियन तिजोरीत विदेशी विनिमयाचा साठा ५८२ अब्ज् डॉलर्स किंमतीचा झाला. सन २००० मध्ये पुतिन रशियाचे अध्यक्ष झाले. त्यांच्या लक्षात आले की तेल आणि वायू यांच्या रुपातली जादूची कांडी चमत्कारी ठरली आहे, म्हणून त्यांनी जणू सारे लक्ष तेल व वायू यांचे उत्पादन वाढविण्यावर केन्द्रित केले. केवळ पाच वर्षात घसघशीत सुपरिणाम दिसून आले. खालील तक्ता बोलका आहे.

| सन | निर्यात (अब्ज डॉलर्स) | आयात (अब्ज डॉलर्स) |
|---|---|---|
| १९९५ | ८१ | ६५ |
| २००५ | २६८ (निर्यात तीन पटींनी वाढली) | १३० (आयात दुपटीनी वाढली) |

आर्थिक वृद्धीचा दर सरासरी ७-७॥ टक्के झाला. एक जाणकाराचे या संदर्भातले भाष्य इथे उद्धृत करण्याजोगे आहे. "In Russia, oil jack-

pot became so liquid and so huge that it crossed all the previous records."

पुतिन यांची रशियातील लोकप्रियता शुक्ल पक्षातल्या चंद्रकलेप्रमाणे तेव्हा वाढतच गेली, याचे आणखी एक कारण इथे नमूद केले पाहिजे. रशियाच्या दागिस्तान प्रांतात चेचन्या बंडखोरांनी आतंकवादाचा डोंब उभा केला होता. येल्त्सिन यांना हा डोंब संपुष्टात आणण्यात अपयश आले होते. सन १९९९ मध्ये पुतिन मात्र या विद्रोही, हिंसक बंडखोरांवर मात करु शकले. या पृष्ठभूमीवर व्लादिमिर पुतिन सन २००० मध्ये अध्यक्ष म्हणून निवडून आले व एका कर्तबगार रशियन अध्यक्षाच्या कारकीर्दीचा शुभारंभ झाला.

सन २००० मध्ये पुतिन रशियाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले व सलग दोन वेळा अध्यक्षपद भूषविणे संविधानानेच मंजूर केले असल्याने सन २००४ मध्येही ते पुन: अध्यक्षपदी विराजमान झाले या आठ वर्षात पुतिन यांनी रशियन अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करुन दिले, नागरिकांना रोजगार मिळवून दिले, रुबलला काही प्रतिष्ठा मिळवून दिली. सन १९९९ मध्ये रुबल मूल्यहीन झाला होता व त्यामुळे लोक अगतिक बनले होते. विस्मय म्हणजे या आगतिकतेतून रशियाला पुनरुत्थानाच्या दिशेने झेप घेता आली. रुबलच्या अवमूल्यनामुळे कुणाही रशियन नागरिकाला विदेशातून वस्तू व सेवा खरीदणे तसेच रुबल्स्चे डॉलर्स मध्ये रुपान्तरण करणे जवळपास अशक्य झाले होते. तेव्हा नाइलाजाने अथवा अपरिहार्यतने ''स्वदेशातल्या वस्तूंची व सेवांची खरेदी करणे'', ही निकड बनली. मागणी तसा पुरवठा या न्यायामुळे आवश्यक वस्तूंचे व सेवांचे उत्पादन करणे अटळ ठरले. यातून रशिया विकासाच्या दिशेने वाटचाल करू लागला. सन १९९९शी तुलना करता सन २००० मध्ये रशियातली उत्पादकता, गुंतवणूक व निर्यात वाढली, तर महागाई आणि आयात व बेरोजगारी घटली. व्लादिमिर पुतिन यांनी या अनुकूलतेचा पुरेपूर फायदा उठविला. सन २००८ मधे रशियाचा विदेशी चलनाचा साठा ५८२ अब्ज डॉलर्स किंमतीचा झाला हा उल्लेख वरच्या ओळींतून झाला आहेच. तात्पर्य, सन २००० मध्ये रशियाच्या पुनरुत्थानाचा प्रारंभ अगतिकतेतून झाला होता, तर सन २००८ मधला रशियाचा विकास पुतिन सरकारने आखलेल्या धोरणांमुळे घडला होता.

## शासन नियंत्रित भांडवलशाही:

पुतिन यांनी सन २००० ते सन २००८ या आठ वर्षात रशिया मधल्या धनदांडग्यांना बऱ्यापैकी वठणीवर आणले. येल्त्सिन यांनी ज्याना सवलती दिल्या, त्यांच्यावरच पुतिन यांनी वरवंटा फिरविला. ''अमक्या उद्योगपतीने करभरणा केला नाही, तमक्याने पर्यावरणीय प्रदूषण केले, तिसऱ्याने कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन दिले नाही.'' अशा वेगवेगळ्या कारणांसाठी थैलीशहांवर खटले दाखल करण्यात पुतिन यांनी पुढाकार घेतला. बेरेझोव्स्की, गुझिन्स्की, देरेपास्का, अब्रामोविच या बड्या भांडवलदारांनी रशियातून विदेशात जाण्याचे व तिथेच स्थायिक होण्याचे ठरविले. खदरकोवस्की सारखे काही उद्योगपती मात्र शासनासमोर नमले नाहीत, त्यांनी वैध कर भरण्यास, पर्यावरणाची काळजी घेण्यास नकार दिला, स्वत:जवळच्या अवैध व अवाजवी संपत्तीचे समाधानकारक स्पष्टीकरण देण्यासही त्यांनी नकार दिला, अथवा असमर्थता दर्शविली.

मग साम, दाम, भेद व दंड या उपायांपैकी शेवटचा उपाय अवलंबिण्यात पुतिन यांनी उशीर केला नाही. सन २००४ मध्ये खदरकोव्स्की या भांडवलदाराला आठ वर्षे कारावासात पाठविण्यात आले. थोडक्यात, "कायद्याचे राज्य" निर्माण करण्यात, स्थिर करण्यात पुतिन सफल झाले. 'युकोस' नावाची खदरकोव्स्कीची खाजगी कंपनी होती. या कंपनीच्या तेलखाणींचे राष्ट्रीयीकरण, विदेशी तेलकंपन्यावरही शासनाचे प्रभुत्व, निरनिराळ्या उद्योगांवर शासकीय नियमांचे पालन करण्याची सक्ती या उपायातून व्लादिमिर पुतिन यांनी State capitalism रशियात प्रस्थापित केला.

**अमेरिकेवर कुरघोडी:**

पुतिन यांनी 'ऊर्जा राष्ट्रवाद' म्हणजे Energy Nationalism रशियात रुजविला. पैकी खाजगी तेल कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण/सरकारीकरण या मार्गाचा उल्लेख वरच्या ओळीतून झाला आहेच. या मार्गामुळे विदेशातल्या शासकीय व खाजगी तेल कंपन्यांना पुतिन वेसण घालू शकले. अर्थात् खनिज तेलाचे उत्खनन जसे महत्त्वाचे असते, तसेच संस्करण (refining) आणि वितरणही प्रभाव उत्पन्न करणारे असते. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी वगैरे पश्चिमी भांडवलदार देशांनी म्हणूनच रशियात व रशियालगतच्या अन्य युरेशियन भूभागात तेल आणि नैसर्गिक वायू वाहून नेणाऱ्या वाहिन्या अथवा Pipelines बांधण्याचा घाट घातला होता. पैकी BTC पाईप लाईन तर बकू (अझरबेजानची राजधानी) तिबिलिसी (जॉर्जियाची राजधानी) या शहरांपासून सेहान (तुर्कस्तानातले बन्दर) या शहरापर्यंत प्रवास करील व मग युरोपला तेल पुरवील अशी योजना आखण्यात आली होती. या तेलवाहिनीप्रमाणेच 'नाबुको' वायूवाहिनी (NABUCO) देखील बांधण्याचा अमेरिकादि देशांचा इरादा होता. ही वायूवाहिनी मध्य आशियातला- तुर्कमेनिस्तान- देशातला नैसर्गिक वायू (रशियाला धाब्यावर बसवून) तुर्कस्तानांत पोचविणार व मग युरोअमेरिकन्स् तिथून हा वायू आपल्या उपभोगासाठी वापरणार असे हे षड्यंत्र होते. तात्पर्य, Baku-Tbilsiy-Ceyhan Oil Pipeline आणि NABUCO Gas Pipeline पूर्वीच्या सोव्हिएत भूमीतून सरळ युरोपचा प्रवास करतील, रशियाला वगळून पश्चिमी देशांना समृद्ध करतील असा हा कट होता. पुतिन यांनी हा कट उधळून लावण्यात यश मिळविले. तुर्कस्तान हा देश नाटो गटाचा सभासद आहे व म्हणूनच तुर्कस्तानच्या Ceyhan- सेहान बंदरापर्यंत BTC पाईपलाईन बांधण्याचा अमेरिकादि देशांचा इरादा होता. तेव्हां पुतिन यांच्या रशियाने इराणशी संधान बांधले. नाबुको गॅस पाईपलाईनला शह देण्यासाठी रशियाने South Stream Gas Pipeline बांधण्याची योजना आखली. या गॅस पाईप लाईनमुळे रशियाने काळ्या समुद्राच्या खालून बल्गेरिया, ग्रीस व इटली या देशांकडे मोर्चा वळविला. कॅस्पियन समुद्रावर पूर्वी केवळ सोव्हिएत संघ व इराण यांचेच अधिराज्य होते. सन १९९१ पासून रशिया, इराण या देशांप्रमाणेच अझरबेजान, कझाखस्तान आणि तुर्कमेनिस्तान अशा तिन्ही देशांचेही कॅस्पियन समुद्रावर स्वामित्व आहे. रशियाने इथे नकाराधिकाराचा वापर करुन आताच उल्लेखिलेल्या पाच देशांच्या व्यतिरिक्त अन्य कुणीही कॅस्पियन समुद्रातल्या खनिजांना हात लावायचा नाही असा दंडक रुढ केला आहे.

**अर्थव्यवस्थेची सद्यस्थिति आणि आव्हाने:**

सन २००८ च्या ऑगस्टमध्ये रशियाने जॉर्जियात लष्करी हस्तक्षेप केला, सन २०११ नंतर तर सीरियन राजकारणामधे हस्तक्षेप केला, पाठोपाठ युक्रेनपासून क्रीमिया प्रांत हिसकावून घेतला. म्हणजे काळ्या समुद्रावर वर्चस्व मिळविले. सीरियाच्या राजकारणात हस्तक्षेप करून भूमध्य समुद्रापर्यंत धडक मारण्यातही रशियाने अमेरिकेवर कुरघोडी केली हे उघड आहे.

रशियाच्या दुर्दैवाने आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या पटावर आपली प्यादी पुढे सरकावतांनाच खनिज तेलाच्या किंमती घसरत आहेत व अमेरिका-कॅनडा या देशातून तसेच व्हेनेझुएला या देशातूनही ही खनिज संपदा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहे हे रशियाच्या लक्षात आले. श्री. गिरीश कुबेर यांच्या पुस्तिकेचा आधार घेऊन आपण म्हणू शकतो की एकटा कॅनडा हा देश आगामी दोनशे वर्षांसाठी जगाची तेलाची गरज भागवू शकतो.[पहा: Girish Kuber : Story of Indian Oil (Nasik,201), P.31]

रशियाच्या ऊर्जा राष्ट्रवादासमोर गेल्या काही वर्षांमध्ये भीषण आव्हान उभे राहिले आहे यात शंका नाही. रशियाने अमेरिकेकडून युरेशियात चालू झालेल्या घुसखोरीवर अंकुश लावला, थेट सीरियातही मुसंडी मारुन भूमध्य समुद्रापर्यंत आपले वर्चस्व प्रस्थापित केले ही झाली रशियाच्या जमेची बाजू. पण खनिज तेल आणि नैसर्गिक वायू यांच्या क्षेत्रात अमेरिका, कॅनडा व व्हेनेझुएला असे ताज्या दमाचे स्पर्धक उद्भवले आहेत, तेलाच्या किंमती घसरल्या आहेत, कैक तऱ्हेचे प्रतिबन्ध लादले गेले आहेत व या सर्व घडामोडींमुळे नव्या कटकटी पैदा झाल्या आहेत ही आहे रशियाची खर्चाची बाजू. रशियाचा विकास दर गेल्या काही वर्षात चार टक्क्यांवर घसरला आहे. भरीस भर इस्लामिक आतंकवाद्यांनी व तुर्कस्ताननेही रशियाची विमाने उध्वस्त करून रशियासमोरची आव्हाने पार जटिल केली आहेत.

अर्थात् पुतिन यांनी Eurasian Union या नांवाची युरेशियन देशांची मोट बांधण्याचे ठरविले आहे. रशिया, कझाखस्तान व बेलोरुस या देशांनी एकत्र येऊन Erasian Economic union या आघाडीची मुहूर्तमेढही रोवली आहे. रशियानेच चीनबरोबर ४०० अब्ज अमेरिकन डॉलर्स किंमतीचा कराराही केला आहे. या करारानुसार रशियाकडून प्रतिवर्षी ३८ अब्ज घनमीटर वायू चीनला पुरविला जाईल म्हणजे अमेरिकादी देशांनी रशियन खनिज संपदा खरीदणे बंद केले तर "आम्ही चीनची बाजारपेठ मिळवू" असा संदेश रशियाने पश्चिमी देशांना दिला आहे पण जगामधल्या खनिज तेलाच्या किंमती सातत्याने घसरत आहेत. रशियाला तेलाचे एक पिम्प किमान १०५ अमेरिकन डॉलर्सला विकले जावे ही इच्छा आहे, ही किंमत मिळाली तरच रशियाला खर्चाचा मेळ घालता येईल, पण वर्तमानात तेलाची किंमत एका पिम्पामागे ६० अमेरिकन डॉलर्सपेक्षाही खाली गेली आहे. म्हणजे रशियाने जागतिक राजकारणात आक्रमक पवित्रा घेतला म्हणून अमेरिकादि देशांनी रशियावर लादलेले प्रतिबन्ध व जोडीला तेलाच्या किंमतीत चालू असलेली घसरण यांचा संकलित परिणाम म्हणजे रशियन अर्थव्यवस्था आवर्तात सापडली आहे. तिथला विकासाचा दर प्रतिवर्षी दोन टक्क्यांपेक्षाही कमी झाला आहे. वस्तूंची टंचाई, वाढत्या किंमती आणि निकृष्ट राहणीमान यामुळे

सर्वसामान्य रशियन नागरिकाचे जिणे मुश्किलीचे झाले आहे.

व्लादिमिर पुतिन यांनी सन २००८ मधे अध्यक्ष म्हणून आठवर्षे पूर्ण केली तेव्हा येल्त्सिन यांनी समोर ठेवलेली उद्दिष्टे गाठतां आली असे समाधान नव्या कर्णधाराला वाटले होते. नागरिकांना आवश्यक वस्तू व सेवा पुरविण्याची क्षमता, धनदांडग्यांना वठणीवर आणण्यासाठी पुरेशी स्वायत्तता ही दोन उद्दिष्टे तर पुतिन यांना निश्चितच पूर्ण करता आली. पण सन २०१२ मध्ये पुतिन तिसऱ्यांदा अध्यक्ष झाले, त्यानंतर तीन वर्षे संपली आहेत, या कारकीर्दीचे आपण मध्यावधी मूल्यमापन करण्याचे ठरविले तर आर्थिक स्थैर्य डळमळीत झाले आहे असा निष्कर्ष निष्पन्न होतो. एका स्तंभलेखकाने वर्तमान रशियन अर्थव्यवस्थेचे खालील शब्दात वर्णन केले आहे: ''समजा खुल्या समुद्रात सुकाणूं नसलेले एक जहाज लाटांवर हेलकावे खात आहे व तशांत हिमवादळात भोवऱ्यात अडकले आहे, परिणामतः या जहाजावरचे यात्रिक जीवघेण्या संकटात सापडले आहेत. आज रशियाची अर्थव्यवस्था नेमक्या या जहाजाची स्मृती जागवत आहे.'' [पहा:-Angus Roxburgh,"Crippling Russian Economy..." in Hindustan Times (Mumbai), 18 Dec. 2014, P.12]

सातआठ वर्षांपूर्वी व्लादिमिर पुतिन रशियन महानाट्याचे महानायक होते, जगाच्या प्रशंसेचे स्वामी होते, कारण त्यांनीच तेव्हा रशियन जहाजाला भर समुद्रात स्थिर केले होते व भविष्याचे आशादायी चित्रं उभे केले होते. सन २०१५ मध्ये परिस्थिती पालटली आहे. मायकेल मॅक्फॉल या अभ्यासकाने म्हणूनच पुतिन यांचा परखड पंचनामा करणारा लेख लिहिला आहे. मॅक्फॉल, रशियन अर्थकारणाचे, राजकारणाचे जाणकार अभ्यासक म्हणून जगाला परिचित आहेत व यामुळेच त्यांच्या अभिप्रायाला महत्त्व आहे. त्यांच्या लेखाचे शीर्षकच अत्यन्त अर्थगर्भ व सूचक आहे. हा घ्या पुरावा: "Why Putin is not a genius ? The Russian President is adept at short-term tactics, but not at long-term strategy." [पहा:The Indian Express (Mumbai), 24 Oct. 2015, P.13]

अल्पकालीन डावपेंच दीर्घकालीन व्यूहरचनेला सुरुंग लावतात असे समजायचे कां?

# विदेशी गुंतवणुकीचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**भिमा नामदेव सापनर, नाशिक,**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
क.का. वाघ महाविद्यालय, पिंपळगांव (ब.)
भ्रमणध्वनी:९४२२२७११०८

भारतासारख्या विकसनशील देशात अंतर्गत भांडवल गुंतवणूक कमी आहे. देशाच्या प्रगतीसाठी भांडवल गुंतवणुकीमध्ये आवश्यक त्या प्रमाणात वाढ करणे गरजेचे असते. त्याकरिता विदेशी भांडवलाची मदत घेतली जाते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने आर्थिक नियोजनाच्या सहाय्याने आपल्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीला सुरुवात केली. आतापर्यंत भारताने ११ पंचवार्षिक योजना पूर्ण केल्या असून १२ वी पंचवार्षिक योजना चालू आहे. भारताने औद्योगिकरणावर अधिक भर दिला. त्यानंतर भारताची विदेशी भांडवल गुंतवणुकीची गरज वाढत गेली. विदेशातून भारतात येणारी गुंतवणूक दोन प्रकारची असते. अ) पोर्ट फोलिओ इन्व्हेस्टमेंट ब)डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट.

अ)पोर्टफोलिओ इन्व्हेस्टमेंट म्हणजे शेअर्स बॉण्डस्, डिबेंचर्स, म्युच्युअल फंड यात केलेली गुंतवणूक होय. अशी गुंतवणूक गुंतवणुकदारांच्या मदतीने केव्हाही देशाबाहेर नेता येते. डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट म्हणजे परकियांनी आपल्या भारतातील उद्योगात केलेली थेट गुंतवणूक होय. पोर्टफोलिओ इनव्हेस्टमेंटमध्ये शेअर अस्थिरता येऊ शकते. FDI मुळे जरी उत्पादनात होणारा नफा परेदशी निघून गेला तरी निदान भारतात उत्पादन आणि नोकऱ्या तरी वाढतात. पंरतु FII मुळे तेही होत नाही. उलट शेअर बाजारातील सट्टेबाजी खूप वाढण्याची शक्यता असते आणि तो पैसा केव्हाही भुर्रकन ऊडून जाऊ शकतो. म्हणून FII पेक्षा FDI जास्त चांगली. फक्त सट्टेबाजासाठी आलेल्या डॉलर्सच्या भारतीय शेअर बाजारातल्या गुंतवणुकीमुळे भारतात तात्पुरते डॉलर्स मिळतात आणि त्यामुळे आमच्याकडे फॉरेन एक्सचेंज रिझर्वज् खूप मोठे आहेत असे आपल्याला सांगितले जाते. पण हे डॉलर्स केव्हाही पळ काढू शकतात आणि त्यामुळे शेअर बाजार तर कोसळू शकतोच पण परकिय चलनाचा साठाही आटू शकतो.

१४ जुलै २०१३ रोजी आरबीआय ने रुपयाची घसरण (१ डॉलर=६१.२१ रुपये) थांबविण्यासाठी अनेक बँकांच्या नगदी कर्जावरील व्याजदर २ टक्के वाढविला. खुल्या बाजारात १२००० कोटी रुपयाचे बॉन्ड आरबीआयकडून विक्रीला काढले. रुपयाची घसरण कमी करण्यासाठी जाहीर केलेल्या उपाययोजनांच्या दबावामुळे शेअर बाजाराने देखील मान टाकली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ४३ अंकांनी घसरला. याचा सर्वाधिक फटका बँका आणि रिॲलिटी क्षेत्राला बसला. या क्षेत्रातील कंपन्यांचे शेअर्स १० टक्क्यांनी उतरले, इंडिया बुल्स रिअल इस्टेटचे शेअर्स ९.७४ टक्के उतरले. तसेच DLF चे शेअर्स ७.७३ टक्यांनी घटला. कॅनरा बँकेचे शेअर्स ८.३४ टक्के घटले युनियन बँकेचे शेअर्स ६.६० टक्के तर कोटक महिंद्रा बँकेचे शेअर्स ५.९९ टक्के उतरले. २६ ऑगस्ट २०१३ रोजी रुपयाची घसरण (१डॉलर=६६.२४ रुपये) झाली.

अमेरिकेचे प्रोत्साहन पॅकेज बंद होणार असल्याच्या धास्तीने विदेशी गुंतवणूकदार संस्थांनी भारतीय शेअर बाजारातील आपली गुंतवणूक काढून घेत आहे. (७९२.११ कोटी रुपयांची) हे व्यवहार डॉलरमध्ये होतात. याचा परिणाम म्हणून डॉलरची मागणी वाढली आहे. अर्थातच मागणी वाढल्यामुळे डॉलरची किंमत वाढते. डॉलर महाग होणे याचा दुसरा अर्थ रुपया स्वस्त होणे होय.

पोर्टफोलिओ इन्व्हेस्टमेंटच्या बाबतीत भारतीय अर्थव्यवस्थेत पुढील बदल झालेले दिसून आले.

१) एच.डी.एफ.सी. बँकेचा निव्वळ नफा २०१३ सालच्या पहिल्या तिमाहीत ३० टक्के वाढला असून हा नफा १८४३.३६ कोटी रुपये असल्याचे बँकेने जाहीर केले. त्यानंतर या बँकेचे शेअर्स मात्र २.३६ टक्के घसरले.

२) आर्थिक अडचणीत आलेल्या म्युच्युअल फंडांना मदत करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने ऑगस्ट २०१३ पासून २५००० कोटी रुपयांची अल्पकालीन कर्ज सुविधा सुरु केली आहे. आरबीआय ने तीन दिवसांसाठी रेपो लिलावाची सोय केली असून त्या अंतर्गत बँका १०.२५ टक्के व्याजाने म्युच्युअल फंडांना २५ हजार कोटी रुपयांपर्यंत रक्कम कर्जाऊ देतील व ही सुविधा अल्पकाळासाठी असेल. नफेखोरीमुळे गेल्या काही महिन्यापासून शेअर बाजारात चढ उतार होत असून म्युच्युअल फंडांना शेअर गुंतवणूक खाती बंद पडण्याचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे हा उद्योग अडचणीत आला आहे. २०१३-१४ च्या एप्रिल ते जून या तिमाहीत म्युच्युअल फंडांनी १० लाख गुंतवणूकदार गमावले आहे.

३) एप्रिल ते जून २०१३ या तीन महिन्याच्या कालावधीत रिलायन्स कॅपिटल या कंपनीच्या संपत्तीत ७ हजार कोटी रुपयांची वाढ झाली असून ती १.८० लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. तसेच या कंपनीने म्युच्युअल फंड, पी.एम.एस. ई.पी.एफ.ओ. व पेन्शन फंड यामधील आपली एकूण १,८०,००० कोटी रुपयांवर पोहचली आहे असे स्पष्ट केले आहे.

४) एचडीएफसी कंपनीच्या एकूण उत्पन्नापैकी ८३ टक्के उत्पन्न हे केवळ पायाभूत प्रकल्पाच्या अर्थसहाय्यातून झाले. मार्च २०१३ साली संपलेल्या आर्थिक वर्षाकरिता

कंपनीने २,५६४ कोटी रुपयांच्या व्याज उत्पन्नावर १, ८३६ कोटी रु. चा निव्वळ नफा कमावला आहे.

परकीय संस्थात्मक गुंतवणुकीत Participatory Notes मार्फत करण्यात येणारी गुंतवणूक भारतीय भांडवली बाजाराला आणि सेबीला औषध आणि डोकेदुखी ठरलेली आहे. पी नोटस्‌चा अर्थ व त्यातील घसरलेली विदेशी गुंतवणूक पुढील प्रमाणे सांगता येईल.

१) परकीय संस्थात्मक गुंतवणूकदार (FII) किंवा परकीय म्युच्युअल फंडस् (ऑफशोअर फंडस्) भारतीय शेअर बाजारात गुंतवणूक करु शकतात. मात्र अशी गुंतवणूक करण्यापूर्वी परकीय गुंतवणुकदाराला सेबीकडे नोंदणी करावी लागते. या परकीय गुंतवणुकदारांना सेबीकडे नोंदणी करायची नाही परंतु तरी भारतीय शेअरबाजारात गुंतवणूक करावयाची आहे. त्यांच्यासाठी P-Notes हा मार्ग असतो.

२) अनोंदणीकृत परकीय गुंतवणूकदार नोंदणीकृत परकीय गुंतवणूकदारांमार्फत गुंतवणूक करु शकतात. अशा गुंतवणूकीचे प्रमाणपत्र म्हणून नोंदणीकृत परकीय गुंतवणूकदार अनोंदणीकृत गुंतवणूकदारास P-Notes देत असतो. अशा गुंतवणुकीचे खालील गुणधर्म आढळतात.

अ) P-Notes मधून गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणुकदाराची कुठलीही माहिती सेबीकडे नसते.

ब) जगात सध्या मोठ मोठे ऑफशोअर फंडस अस्तित्वात आहेत. त्यांना हेज फंडस (Hedge Funds) असेही म्हणता. हेज फंडस P-Notes मार्फत भारतीय शेअर बाजारात गुंतवणूक करतात. या हेज फंडस मध्ये शेअर बाजार अगदी वरच्या पातळीपर्यंत किंवा खालच्या पातळीपर्यंत नेण्याची शक्ती असते. या शक्तीवर सेबीचा कुठलाच ताबा नसतो.

क) बरेच भारतीय व्यक्ती त्यांचा काळा पैसा हवालामार्फत परदेशात पाठवितात आणि P-Notes चा वापर करुन भारतीय शेअर बाजारात गुंतवितात. नफा कमवितात. काळा पैसा, दहशतवादातून उभारला जाणारा पैसा व इतर गैरमार्गाने कमविला जाणारा पैसा अप्रत्यक्षपणे, त्याचा स्रोत कळू न देता शेअर बाजारात लावला जातो. त्याला Money Laundering असे म्हणतात.

३)समभाग रोखे आणि डेरिव्हेटिव्हज् या माध्यमातून विदेशी गुंतवणुकदार P-Notes चा मार्ग अवलंबतात. नोव्हेंबर २०१४ मध्ये ३१ अब्ज डॉलर म्हणजेच विद्यमान स्थानिक चलन रुपात २.५ लाख कोटी रुपये झाली आहे.

४)ऑक्टोबर २०१४ या माध्यमातून भांडवली बाजारातही गुंतवणूक २,६५,६७५/- कोटी रुपये अशी गेल्या सात महिन्यातील सर्वाधिक झाली होती तर नोव्हेंबर २०१४ मध्ये २,४९,२१० कोटी रुपये झाली आहे. म्हणजेच ऑक्टोबर २०१४ मध्ये ती १२.२ टक्क्यांनी वाढली असतांना नोव्हेंबर २०१४ मध्ये मात्र ती ११ टक्यांनी घसरली आहे.

२००३-०४ ते २०१२-१३ परकीय थेट गुंतवणूक सारांशाने खालील प्रमाणे सांगता येईल:

अ) भारतातील प्रत्यक्ष थेट गुंतवणूक २००३-०४ मध्ये ३१३७ अमेरिकन डॉलर होती ती २०१२-१३ मध्ये १९८१९ अमेरिकन डॉलर झाली म्हणजे त्यात वाढ झाली.

ब) भारतातील पोर्टफोलिओ (अप्रत्यक्ष) गुंतवणूक २००३-०४ मध्ये ११,३५५ अमेरिकन डॉलर होती ती २०१२-१३ मध्ये २६,८९१ अमेरिकन डॉलर झाली म्हणजे त्यात वाढ झाली.

क) भारतातील निव्वळ परकीय गुंतवणूक २००३-०४ मध्ये १४,४९२ अमेरिकन डॉलर होती ती २०१२-१३ मध्ये ४६७१० अमेरिकन डॉलर झाली म्हणजे त्यात वाढ झाली.

सन २०१५ च्या मध्यापासून भारतीय शेअर बाजारात अस्थिरता असली तरी अर्थकारणात दिसून येत असलेला सुधार आणि आगामी काळात अपेक्षित असलेल्या सुधारणांच्या पार्श्वभूमीवर २०१६ या वर्षात ३० हजाराचा टप्पा गाठेल असा विश्वास वाटतो. २००८ ते २०१३ अशा प्रदीर्घ मंदीच्या फेऱ्यानंतर सप्टेंबर २०१३ मध्ये भारतीय शेअर बाजारात तेजी परतली. यानंतर मे २०१४ मध्ये केंद्रात स्थिर सरकार विराजमान झाल्याने आणि या सरकारने (भाजप) आर्थिक सुधारणांचे आश्वासन दिल्याने भारतीय शेअर बाजारात मोठ्या प्रमाणावर तेजी दिसून आली. मे २०१४ पासून जून २०१५ या कालावधीमध्ये भारतीय शेअर बाजारात मोठ्या प्रमाणावर तेजी आली आणि सेन्सेक्सने ३० हजारांच्या उंबरठ्यावर स्पर्श केला. परंतू आर्थिक सुधारणा रखडल्याने बाजारात अस्थिरता निर्माण झाली. मात्र, पुन्हा एकदा आता सरकारने आर्थिक सुधारणांचा नारा दिल्यामुळे बाजारात चैतन्य निर्माण झाले आहे.

२०१५ या वर्षात देशातील कामगार संघटनांचा विरोध डावलून केंद्र सरकारने कर्मचारी भविष्य निर्वाह निधीतील (इपीएफओ) कोट्यवधी रूपये शेअर बाजारात गुंतवले आहेत. म्हणून २०१५ हे वर्ष शेअर बाजारासाठी अत्यंत चढ-उतारांनी भरलेले दिसून आले. इपीएफओ च्या निधीबाबत निर्णय घेणाऱ्या केंद्रीय विश्वस्त मंडळाने शेअर बाजारातील धोका लक्षात घेऊन या योजनेतील निधी तेथे गुंतवण्यास परवानगी दिली होती. ऑगष्ट २०१५ पासून सरकारने शेअर बाजारातील इटीएफ मध्ये गुंतवणूक करण्यास सुरवात केली. ३० नोव्हेंबर २०१५ पर्यंत ३१७४ कोटी रुपये इ टी एफ मध्ये गुंतवले आहेत. यंदाच्या आर्थिक वर्षात (२०१४-२०१५) इ पी एफ ओ मध्ये १.२० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. थोडक्यात शेअरमधील गुंतवणूकीस इ.पी.एफ.ओ.च जबाबदार आहे हे स्पष्ट होते.

ब)परकीय थेट गुंतवणूक (Foreign Direct Investment):

सन २०११-२०१२ च्या अर्थ संकल्पामध्ये विदेशी गुंतवणुकीचे धोरण स्पष्ट करतांना रिटेल क्षेत्रातील १०० टक्के FDI बाबत वाद निर्माण झाला. परंतु सप्टेंबर २०१२ मध्ये माजी पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांच्या सरकारने मल्टीब्रँड रिटेल क्षेत्रात (MBRS) ला ५१ टक्केच्या स्वीकृतीची घोषणा केली. मल्टीब्रँड क्षेत्रातील FDI च्या सकारात्मक व नकारात्मक बाजू पुढीलप्रमाणे सांगता येतील.

सकारात्मक बाजूने विचार करता, अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर खेळते भांडवल येईल व त्याचा लाभ कृषी क्षेत्रालाही होईल. रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होऊन मंदीसदृश वातावरण कमी होण्यास मदत होईल. पायाभूत सुविधा, माल साठवणूक केंद्रे यांच्या उभारणीत मोठा हातभार लागेल. परकीय कंपन्यांच्या

आगमनामुळे स्पर्धा असली तरी त्याचा लाभ भारतीय उद्योगांना होईल. तोट्यातील उद्योग विदेशी गुंतवणूकीमुळे आर्थिकबाजू सावरु शकतील.

नकारात्मक बाजुने विचार करता, विदेशी कंपन्यांच्या गुंतवणुकीमुळे देशातील उद्योजकांचे अस्तित्व धोक्यात येईल. देशाची अर्थव्यवस्था परकीयांच्या ताब्यात जाण्याचा धोका निर्माण होईल. रिटेल क्षेत्रातील FDI मुळे शेतकऱ्यांना विशेष फायदा झाला नसल्याचा आजवरचा इतिहास आहे. किराणा क्षेत्रात गरज नसतांनाही गुंतवणूक केली जात असल्याने FDI ला विरोध होतांना दिसतो.

भारताने परकीय थेट गुंतवणुकीस महत्व दिलेले आहे. १६ जूलै २०१३ रोजी या क्षेत्रात परकीय थेट गुंतवणुकीचे नियम शिथील केले ती क्षेत्रे व त्यासंबंधीचे निर्णय पुढील प्रमाणे-

टेलिकॉम क्षेत्र- या क्षेत्रात सध्या परकिय गुंतवणुकीसाठी असलेली कमाल मर्यादा ७४ टक्के आहे ती १०० टक्के वाढविली. टेलिकॉम कंपनीत ४९ टक्केपर्यंत भाग भांडवल खरेदी करण्यासाठी परवानगीची गरज नाही. परंतु त्यापेक्षा जास्त गुंतवणूक करावयाची असेल. तर Foreign Investment Promotion Board ची पूर्व परवानगी आवश्यक आहे.

पेट्रोल व नॅचरल गॅस - या क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणुकीची ४७ टक्केची कमाल मर्यादा कायम ठेवली परंतु त्यासाठी आता FIPB ची परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही.

संरक्षण क्षेत्र- या क्षेत्रातील २६ टक्के गुंतवणुकीचे प्रमाण सरसकट वाढविलेले नाही. परंतु संरक्षण उत्पादन कंपनीत २६ टक्के पेक्षा जास्त विदेशी गुंतवणूकीच्या प्रस्तावाला Cabinet Committee on Security ची संमती घ्यावी लागेल. त्यासाठी उत्तम दर्जाचे उत्पादन तंत्रज्ञान गुंतवणूकदार विदेशी कंपन्यांनी आणायला पाहिजे. संरक्षण मंत्रालयाचे उत्तम दर्जाचे तंत्रज्ञानाचा तपशिल ठरवायचा आहे.

विमा क्षेत्र- या क्षेत्रातील विदेशी गुंतवणूकीची सध्याची २६ टक्के मर्यादा ४९ टक्केपर्यंत वाढविण्याचे विधेयक संसदेत आहे. अशी ४९ टक्के गुंतवणूक शासनाच्या पुर्वपरवानगीविना करण्यास मान्यता दिली आहे.

किरकोळ व्यापार क्षेत्र- रिटेल क्षेत्रात ब्रँड मधील ४९% गुंतवणूकीसाठी FIPB च्या पूर्वपरवापगीची आवश्यकता रद्द केली आहे. कुरियर सेवा पुरविण्याचा कंपन्यात शासनाचा परवानगी शिवाय १०० % विदेशी गुंतवणुकीला मान्यता दिली आहे.

थोडक्यात मागील केंद्रीय मंत्रिमंडळाने दूरसंचार, संरक्षण व विमा यासह अनेक प्रमुख क्षेत्रात थेट परकीय गुंतवणुकीची (FDI) मर्यादा वाढविण्यास मंजुरी दिल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. भारतासाठी हा अत्यंत उल्लेखनीय असा धाडसी निर्णय आहे. भारताची परकीय थेट गुंतवणूक (FDI) एप्रिल २०१२ पर्यंत ३८,९१७ दशलक्ष रुपये होती ती एप्रिल २०१३ पर्यंत ४२,२९३ दशलक्ष रुपयांपर्यंत वाढली. तसेच या क्षेत्रामध्ये (FDI) ला अधिक मान्यता मिळाली त्या क्षेत्रांच्या वृध्दी दरामध्ये वेगाने वाढ झाली.

सद्यस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेला पुढील आव्हानांना (प्रश्नांना) सामोरे जावे लागते.

१) भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ५ टक्के पेक्षाही कमी आहे.
२) विदेशी खात्यात चालू खात्याची तुट (CAD)सतत व लक्षणीयरित्या वाढत आहे.

३) निर्यातीच्या दीडपट आयातीची रक्कम झाली आहे.

४) भाववाढीचा दर अनेक महिने झाले तरी दोन अंकापेक्षा कमी होत नाही.

५) देशात मंदीसदृश वातावरण असल्याने बचत व भांडवल उभारणी यावर विपरित परिणाम झालेला आहे.

६) कच्च्या तेलाचे जागतिक बाजारपेठेतील २००८-२००९ चे प्रति बॅरल भाव ४० डॉलरवरुन ११० डॉलरपर्यंत वाढले आहे. त्यामुळे देशात पेट्रोल व डिझेलचे दर सतत वेगाने वाढत आहे.

७) सोन्याची आयात व तेलाची आयात यावर आयाती पैकी फार मोठा खर्च होत आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेवर वरील आव्हाने असतांनाच जगाचा विचार करता देखील आपल्या देशाची स्थिती फार चांगली आहे असे नाही. अमेरिका फॉर्च्युन या मासिकाच्या अंका जगातल्या पाचशे मोठ्या कंपन्यांची यादी दिलेली आहे त्यानुसार-

१) या कंपनीला भारतात सर्वात मोठी कंपनी म्हटले जाते ती रिलायन्स पहिल्या शंभरामध्ये नाही (क्रमांक १०७)

२) इंडियन ऑईल ८८ क्रमांकावर आहे.

३) स्टेट बँकेला देशातील सर्वात मोठी बँक मानली जाते तिचा क्रमांक २९८ इतका आहे.

४) टाटा स्टील कंपनी ४७१ क्रमांकावर आहे.

याचा अर्थ आपल्या कंपन्या भारतात जरी मोठ्या वाटत असल्या तरी जागतिक कंपन्यांच्या तुलनेने फारच मागे आहे. भारतीय कंपन्यांना कुठेही हलके लेखण्याचा हेतू नाही फक्त मग जग किती मोठे व विकसित आहे आणि भारत नेमका कोठे आहे आणि आपणास काय केले पाहिजे याची जाणीव त्यातून होते.

१) २०१२ मधील अंक्टाडच्या पाहणीनुसार चीननंतर भारत हा जगातील परकिय थेट गुंतवणुकीसोबत सर्वाधिक पसंतीचा देश होता. २०१०-११ पेक्षा २०११-१२ मधील FDI मध्ये ३४% नी वाढ झाली.

२) २०१३-१४ मध्ये सर्वाधिक FDI सेवा क्षेत्रात २.२ बिलीयन डॉलर व त्याखालोखाल दूरसंचार क्षेत्रात १.३ मिलियन डॉलर करण्यात आली. एप्रिल २००० ते एप्रिल २०१४ या कालावधीतदेखील सर्वाधिक FDI सेवा क्षेत्रातच ३९.८ बिलियन डॉलर म्हणजे एकूण गुंतवणुकीच्या १८% करण्यात आली.

३) २०१३-१४ मध्ये भारतात सर्वाधिक FDI सिंगापूर या देशातून (६ बिलियन डॉलर) व त्याखालोखाल मॉरिशस मधून (४.९ बिलियन डॉलर) करण्यात आली. एप्रिल २००० ते एप्रिल २०१४ या कालावधीत मात्र सर्वाधिक FDI मॉरिशसमधून ७ बिलियन डॉलर, एकूण गुंतवणुकीच्या ३६% करण्यात आली.

४) २०१३-१४ मध्ये २४.३ बिलियन डॉलरची थेट गुंतवणूक करण्यात आली होती. मागील वर्षाच्या तुलनेत यात ८.३६% ने वाढ झाली.

५) केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री निर्मला सिताराम यांना दिलेल्या माहितीनुसार एप्रिल २०१४- ऑक्टोबर २०१४ या सहा महिन्यात FDI मध्ये २५% ने वाढ झाली. नव्याने सत्तारुढ झालेल्या केंद्र सरकारच्या आर्थिक सुधारणा धोरणामुळे विदेशी गुंतवणुकदारांचा

विश्वास वाढल्याने चालू आर्थिक वर्षातील (२०१४-१५) पहिल्या सहा महिन्यातील विदेशी निधी FDI २५% नी उंचावून १७.३५ अब्ज डॉलर झाली आहे.

डिसेंबर २०१५ मध्ये देशातील गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्यासाठी तसेच मोठ्या प्रमाणावर परदेशी गुंतवणूक आकृष्ट करण्यासाठी नवीन केंद्र सरकारने धाडसी पाऊल उचलले. कृषी, बांधकाम, बँकींग, नागरी हवाई वाहतूक, खाणकाम, संरक्षण, उत्पादन, प्रसारमाध्यम अशा १५ क्षेत्रामध्ये थेट परदेशी गुंतवणुकीच्या उदारीकरणाचा निर्णय घेण्यात आला. यामुळे ही क्षेत्रे ४९ ते १०० टक्के थेट परदेशी गुंतवणुकीसाठी सज्ज झाली आहेत. तर बँकींग क्षेत्राला नवी भरारी देण्यासाठी खाजगी बँकांमध्ये ७४ टक्के गुंतवणुकीस मान्यता देण्यात आली. सध्या खरेदीदाराची पसंती ठरलेल्या सिंगल ब्रँड रिटेल मध्येही ई-कॉमर्सद्वारे उत्पादने विकता येणार आहे. म्हणजेच एकल ब्रँड रिटेलर्सना कोणत्याही परवानगीशिवाय वस्तू किंवा उत्पादिते ऑनलाइन विकता येणार आहे. त्यामूळे ऑनलाईन विक्री कंपन्यांकडून केली जाणारी विनाकारण मोठमोठ्या सवलती देऊन स्वत:कडे ग्राहक वळवण्याची जीवघेणी स्पर्धाही कमी होण्यास मदत होणार आहे.

हे निर्णय तात्काळ अमलात येणार आहे. विदेशी गुंतवणूक प्रोत्साहन मंडळातर्फे (एफ आय पी बी) आता ३००० कोटी रुपये ऐवजी ५००० कोटींच्या प्रस्तावांना मंजुरी देता येणार आहे. भारतात उद्योग आणि व्यवसाय करणे अधिक सुलभ व्हावे तसेच मोठ्या प्रमाणावर परदेशी गुंतवणूक आकर्षित करून आर्थिक विकासाला चालना मिळावी हा उद्देश सध्याच्या केंद्र सरकारचा आहे. तसेच बिहारच्या निकालाचा (दारूण पराभव) ब्रँड मोदींवर परिणाम होऊ द्यायचा नाही या पार्श्वभूमीवर हे निर्णय घेण्यात आले असेही संबोधले गेले. किंवा सुधारणावादी जागतिक प्रतिमा कायम ठेवण्यासाठी या धाडसी निर्णयांची घोषणा या सरकारने केली असेही म्हटले जाते. १५ क्षेत्रांमध्ये थेट परदेशी गुंतवणुकीचे विवरण सारांशाने पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) वृत्तवाहिन्यांव्यतिरिक्त चॅनल्स, ड्यूटी फ्री शॉप्स, होलसेल कॅश अँण्ड कॅरी, रिटेल ब्रँड, डी.टी.एच. आणि केबल नेटवर्क, एअरलायन्स ग्राऊंड हँडलिंग ही क्षेत्रे एफडीआय साठी १०० टक्के अर्थात पूर्णत: खुले करण्यात आले आहे.

२) एफ एम रेडिओ, वृत्तवाहिन्या, प्रादेशिक एअरलाईन्स, संरक्षण मध्ये विदेशी गुंतवणूक मर्यादा २६ टक्क्यावरून वाढवून ४९ टक्के करण्यात आली आहे.

३) बांधकाम क्षेत्रात पाच वर्षात एफडीआय आणण्याची अट सरकारने संपुष्टात आणली आहे. तसेच किमान चटई क्षेत्राची अटही रद्द करण्यात आली आहे.

४) पाम झाडांच्या लागवडीसाठी १०० टक्के थेट परदेशी गुंतवणूकीला (एफडीआय) परवानगी देण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचे पामतेल उद्योगाने जोरदार स्वागत केले आहे. देशात सध्या दोन लाख हेक्टर्स जमिनीवर पाम झाडांची लागवड केली जाते. ही लागवड आणखी दोन लाख हेक्टरवर होऊ शकते.

थोडक्यात जागतिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारुन २४ वर्षे उलटली. जगाच्या बाजारात उभे राहतांना बरीच आव्हाने देशासमोर आहे, ती

आव्हाने पेलताना आपण कमी पडतोय की काय असे वाटण्याजोगे सध्याचे आर्थिक वातावरण आहे. आपल्या देशात परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढण्यासाठी, मार्ग सुकर करण्यासाठी देशातील १३ क्षेत्रातील परकीय गुंतवणुकीची मर्यादा मागील सरकारने वाढविली आहे. तसेच डिसेंबर २०१५ मध्ये केंद्रातील नवीन सरकारने १५ क्षेत्रांमध्ये थेट परकिय गुंतवणुक उदारीकरणाचा निर्णय घेतला. त्यामुळे थंडावलेल्या आर्थिक आघाडीवर थोडे उत्साहाचे वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा आहे. असे असले तरी राजकीय अनिश्चितता हा अद्यापही मोठा अडथळा आहेच, याखेरीज आरबीआय चे व्याज धोरण हा देखील चिंतेचा विषय आहे.

नवीन धोरणाबरोबरच नवीन आव्हाने व जबाबदाऱ्या येत आहेत त्या पूर्ण करण्यासाठी दुसऱ्यांवर विसंबून चालणार नाही. आपल्या समस्या आपल्यालाच सोडवाव्या लागतील. फार तर दुसऱ्याची मदत घेऊ शकतो परंतु ही कायमस्वरुपी नाही. भारतीय अर्थव्यवस्थेचा चिरकालीन विकास (Sustainable Development) साध्य करण्यासाठी FDI ही तात्पुरती उपाय योजना आहे हे मात्र निश्चित.

**संदर्भ सूची:**

१) डॉ. गोविलकर विनायक, *रिटेलमधील विदेशी थेट गुंतवणूक*, हरिओम प्रकाशन, नाशिक
२) Economic Survey of India - 2012-13.
३) अच्यूत गोडबोले, *अर्थात*, राजहंस प्रकाशन प्रा.लि. पुणे.
४) *अर्थसंवाद* - जुलै - सप्टेंबर २०१२
५) सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे.
६) दैनिके - इकॉनॉमिक टाईम्स, महाराष्ट्र टाईम्स, ऑगस्ट २०१४, २०१५
७) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया - वार्षिक अहवाल.

# महाराष्ट्राचे जलव्यवस्थापन : धोरण आणि उपाय

**रामहरी किसन दातीर**, नाशिक,
सहयोगी प्राध्यापक,
पद्व्युत्तर अर्थशास्त्र संशोधन केंद्र,
के.टी.एच्.एम्. महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२०६९२१११

देशाला १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. १९६० ला महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. सिंचनाद्वारे शेतीची उत्पादकता वाढवून शेतकऱ्यांची उन्नती करणे हे सिंचनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. याला अनुसरून सुरूवातीपासूनच देशपातळीवर आणि राज्यात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून सिंचनाचा विस्तार घडवून आणण्यावर भर देण्यात आला. राज्यातील सिंचनाला प्रकल्पांतर्गत सर्वच शेतकऱ्यांना समान न्याय देणाऱ्या फड पद्धतीचा वारसा आहे. धुळे, जळगाव या भागात तापी खोऱ्यात दोन अडीच हजार वर्षांपूर्वीचे शंभरपेक्षा जास्त फड पद्धतीचे बंधारे आणि त्यावरील लोक नियुक्त सिंचन व्यवस्थापन आजही पहावयास मिळते. सिंचन व्यवस्थापनामध्ये लोक सहभाग होता. शासनाची भूमिका मालकाची नसून, मदतनिसाची होती. म्हणूनच या व्यवस्थांना सातत्य लाभले. ब्रिटिश कालावधीत सिंचनाच्या मोठ्या योजना हाती घेण्यात आल्या. राज्यातील कृष्णा, निरा, मुठा, प्रवरा, गोदावरी, गिरणा कालवे ही त्याची उदाहरणे आहेत. देशपातळीवर देखील गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा, कावेरी आदि नद्यांवर मोठे बंधारे बांधून कालव्याचे जाळे उभारून किमान दोन पिके घेण्याची व्यवस्था करण्यात आली. ब्रिटिशांचा हेतू केवळ लोककल्याणकारी नव्हता तर पाणी पट्टीच्या माध्यमातून सिंचन व्यवस्था निर्मितीसाठी जी गुंतवणूक झाली होती. त्यातून आर्थिक परतावा मिळविण्याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले नाही.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राला लागू असणारे कायदे मोडीत काढून प्रथमतःच १९७६ ला सिंचन व्यवस्थापनासाठीच्या राज्याच्या सर्व भागांना लागू होणारा सिंचनाचा कायदा निर्माण करण्यात आला. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी लागणारे नियम मात्र अद्यापपावेतो (२०१५) तयार केले गेले नाहीत. ही मोठी उणीव म्हणावयास

पाहिजे. सिंचनाची कार्यक्षमता वाढवून न्याय्य पाणीवाटप करण्याच्या दृष्टिकोनातून १९९०-९१ च्या दरम्यान १९७६ च्याच कायद्यातील कलमांचा आधार घेऊन सिंचन व्यवस्थापनामध्ये लोकप्रियता आणण्याचा प्रयत्न सुरू करण्यात आला. पाण्याचा हिस्सा ठरवून त्यानुसार पाणी मोजून देऊन त्या पुढील सिंचन व्यवस्थापन देखभाल दुरूस्तीसह पाणीवापर संस्थेकडे हस्तांतरीत करण्यात येऊ लागली. सुरूवातीला हा प्रयोग राज्यातील मुळा प्रकल्पावर करण्यात आला. त्यानंतर नाशिक जिल्ह्यातील वाघाड प्रकल्पावर पूर्णपणे यशस्वी झाला. सुमारे दहा हजार हेक्टर सिंचन क्षमतेचा वाघाड हा सिंचन प्रकल्प पूर्णपणे लोकप्रणित झालेला राज्यातीलच नव्हे तर देशातील पहिला प्रकल्प आहे. त्यानंतर २००३ ला राज्यात जलनीति तयार करण्यात आली आणि २०१२ ला पुन्हा सुधारणा होऊन सुधारित जलनीति अस्तित्वात आली. सदर विषयाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्ट्ये विचारात घेण्यात आली आहे.

१) महाराष्ट्रातील पर्जन्याची वैशिष्ट्ये अभ्यासणे.

२) महाराष्ट्रातील जलयुक्त शिवार योजनेचा आढावा घेणे.

३) महाराष्ट्रात जलक्रांती घडवून आणण्यासाठी उपाय सुचविणे.

**महाराष्ट्रातील पर्जन्याची वैशिष्ट्ये:**

महाराष्ट्रात जून ते सप्टेंबर या चार महिन्यात पावसाळा असतो. परंतु त्या १२० दिवसातील फक्त ३५-४० दिवसच पाऊस पडतो. याचाच अर्थ वर्षातले ३२५ दिवस कोरडे असतात. त्यातही सरासरीच्या अर्ध्यापेक्षा जास्त पाऊस केवळ १६ ते १८ तासात पडून जातो. हा पाऊस जमिनीत मुरत नाही. तो वाहून जातो. याचा अर्थ पावसाच्या पाण्यावर पूर्ण नियंत्रण मिळवल्याशिवाय आपले पाणी प्रश्न सुटणार नाहीत.

पाण्याचे साठे करायच्या दोन पद्धती आहेत. एक- भूपृष्ठावरील साठे आणि दुसरे भूगर्भातील साठे. पृष्ठभागावरचे साठे विशाल व्याप्तीचे असून ते शहरांसाठी वापरले जातात. ग्रामीण भागासाठी सहसा भूगर्भजलाचा वापर होतो. महाराष्ट्रातील भूस्तर आणि त्यातील जलभाराच्या परिस्थितीचा विचार फार महत्वाचा आहे.

गेल्या पंचवीस वर्षात महाराष्ट्रात पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्यासाठी लाखो विंधनविहिरी खोदण्यात आल्या, त्यामुळे आपल्या भूगर्भाची रचना लक्षात आली. एकजीव कठीण खडकात पाणी लागले तर १-२ मिटर प्रतिसेकंद प्रवाह मिळतो. भेगायुक्त खडकात पाणी लागले तर ५ लि. प्रतिसेकंद आणि अगदी क्वचित ठिकाणी २० लि. प्रतिसेकंद पाणी लागते. ज्या गतीने खडकातले पाणी विहिरीत येते. तेवढ्याच गतीने पुनर्भरणाचे पाणी खडकात शिरते. म्हणून कठिण खडकात पुनर्भरणाचा वेग हा अतिमंद असतो.

महाराष्ट्रातील सर्वच प्रदेशात पाऊस सारखाच पडत नाही. कोकण आणि विदर्भात पावसाचे प्रमाण जास्त आहे. तर पश्चिम महाराष्ट्रात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडतो. मराठवाड्यात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. आर.एम.आगाशे यांनी १९९० मध्ये महाराष्ट्रात खोरेनिहाय अतिरीक्त पाण्याचा अभ्यास केला. त्यानुसार सध्या अस्तित्वात असलेल्या व

नियोजित प्रकल्पात साठवणीसाठी लागणारे पाणी तसेच शेजारील राज्यांना देऊ केलेले आश्वासित पाणी वजा केले तर महाराष्ट्राच्या वाट्याला काहीच पाणी शिल्लक राहत नाही. कोकणातले पश्चिम वाहिनी नद्यांचे १३.३ द.ल.हे.मि. पाणी समुद्राला मिळते. ते महाराष्ट्रात वळवायची चर्चा चालू आहे. पण हे काम फक्त चर्चा करून होणार नाही तर त्यासाठी कृती करावी लागेल.

**महाराष्ट्रातील जलयुक्त शिवार योजना:**

राज्यातील सिंचनाचा प्रश्न सोडविण्यासाठी *जलयुक्त शिवार* अभियान राबविले जात आहे. मुख्यमंत्री त्यासाठी विशेष आग्रही आहेत. परंतु राज्य शासन पाण्याच्या समस्येवर सर्वांगीण जलव्यवस्थापनाचा विचार न करता केवळ या अभियानाला प्राधान्य देत असल्याचे चित्र सध्या निर्माण झाले आहे. या अभियानांतर्गत २८ प्रकारची कामे करून *डोंगरमाथा ते नदीचा पायथा* अशा विविध टप्प्यांवर पाणी शेतशिवारात अडवून ते जिरविण्याची कामे केली जाणार आहेत. त्यामध्ये कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे बांधणे व त्याचे पुनरुज्जीवन करणे, पाझर तलाव, लुज बोल्ड स्ट्रक्चर, सलग समतल चर, मजगी, मातीनाला बांध, सिमेंट, नाला बांध, वळण बंधारा, शेततळे, वनराई बंधारे, नदी रुंदीकरण आदींचा समावेश आहे. या कामांमुळे विकेंद्रित पाणी मिळेल, तसेच पाणी वापराची कार्यक्षमता सुधारून सिंचन क्षेत्रात वाढ होण्यास मदत होईल. हे अभियान म्हणजे पूर्वीच्या *एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमा*चीच सुधारित आवृत्ती आहे. ग्रामीण भागामध्ये पाण्याच्या ताळेबंदाबाबत जाणीव जागृती होण्यास अभियानामुळे मदत होईल.

या अभियानासाठी सामाजिक संस्थांची भरघोस आर्थिक मदत, निधीचा भ्रष्टाचारमुक्त विनियोग, विकासासाठी झपाटलेल्या काही प्रामाणिक व्यक्तींनी मनापासून घेतलेला पुढाकार ग्रामस्थांनी गट-तट न करता एकजुटीने नोंदविलेला सहभाग, अनुकूल भौगोलिक परिस्थिती, प्रशासकीय अधिकाऱ्यांची सक्रिय मदत आदि बाबी अत्यंत महत्वाच्या आहे. ज्या गावामध्ये या बाबींचा अभाव आहे. तिथे अभियानाची अंमलबजावणी कशी होईल याबाबत शंका येते. या अभियानांतर्गत काम करण्यापूर्वी, नंतर व तीन महिन्यांच्या अंतराने कामांचे छायाचित्रण आणि जिओटॅगिंग (अक्षांश-रेखांश निश्चिती) द्वारे नोंदी ठेवल्या जाव्यात. साठलेल्या पाण्याच्या साठ्याचे वितरण व्यवस्थापन ग्रामपंचायतीचे अधिकार, झालेल्या कामांची दोन वर्षानंतरची दुरुस्ती याबाबत विचार व्हावा. नैसर्गिकरीत्या वाहणारे नाले एका गावातून अनेक गावांत जात असतांना पहिल्या गावाने योजना राबवून पाणी अडविले तर तिसऱ्या चौथ्या गावांवर अन्याय होईल. कारण पाण्याचे झिरपणे हे जमिनीची भूस्तरीय रचना, साचलेल्या पाण्याचा काळ, अंतर विविध बाबींवर अवलंबून असते. त्यापेक्षा *शिवारातील पाणी शिवारात* अशी योजना राबविल्यास स्थानिक असंतोष होणार नाही.

अभियानातील कामांसाठी राज्य शासनाने केवळ एक हजार कोटी रूपयांची तुटपुंजी तरतूद केलेली आहे. ऊर्वरित निधी गावकऱ्यांची लोकवर्गणी, जिल्हा नियोजन समितीची बिगर आदिवासी योजना, जिल्हा परिषद स्वनिधी कॉर्पोरेट कंपन्यांकडून औद्योगिक सामाजिक उत्तदायित्त्व (सीएसआर), सेवाभावी संस्था,

देवस्थान ट्रस्ट, आमदार विकास निधी या माध्यमातून उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. *जलयुक्त शिवार अभियान* चांगल्या पद्धतीने राबविले गेले तर पाण्याचा प्रश्न काही अंशी सुटू शकेल.

**जलक्रांतीसाठी उपाय योजना:**

महाराष्ट्रात जलक्रांती घडवून आणण्यासाठी आणि पाणी वाटपावरुन होणारा वाद आणि आंदोलने टाळण्यासाठी काही महत्वपूर्ण उपाययोजना करणे गरजेचे आहे.

१) पीक पद्धतीत बदल: महाराष्ट्रातील मराठवाडा हा दुष्काळवाडा होण्यासाठी पीक पद्धती देखील जबाबदार आहे. कापूस, सोयाबीन आदि पिकांमुळे सुरूवातीस फायदा झाला. २०१३ मध्ये मराठवाड्यात दोन लाख तीस हजार हेक्टरवर ऊसाची लागवड होती. त्यासाठी ४३२२ एमसीएस एवढे पाणी दिले गेले. अर्थात हे सर्व भूगर्भातील पाण्याचा उपसा करूनच मराठवाड्यात प्रत्येक महिन्यात १०,००० कूपनलिका खोदल्या जातात. या भागात ऊसाच्या लागवडीचे क्षेत्र अर्ध्यापर्यंत कमी केले. जर ५०% पाण्याची बचत होऊ शकते. ऊर्वरित वाचलेल्या पाण्यावर लाखो टन तुरीचे व इतर डाळींचे उत्पादन होऊ शकते.

२) गाव तेथे गावतळे: प्रत्येक गावात त्या गावाची पाण्याची गरज लक्षात घेऊन पूर्वजांनी लोक सहभागातून गावतळ्याची व्यवस्था केली होती. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी त्यांची सामुहिकरित्या साफसफाई केली जात असते. संपूर्ण तळे स्वच्छ करून ठेवले जायचे आणि त्याच पाण्याचा गावकरी वर्षभर वापर करीत असत. ब्रिटिश काळात सर्व तळे व धरणे यांची मालकी सरकारी झाली. कालांतराने लोकांची अशी धारणा झाली की, या पाणीसाठ्यांच्या देखभालीचे काम सरकारचे आहे. आजही ही धारणा कायम आहे. गावतळ्यांच्या रूपाचे गावाला पाणी उपलब्धतेचा शाश्वत मार्ग परत सुरू केला तर गाव पिण्याच्या पाण्यासाठी स्वयंपूर्ण होतील.

३) अलिकडच्या काळात ऊस, केळी, डाळींब, द्राक्षे अशा प्रकारची नगदी पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. पश्चिम महाराष्ट्रात शेत जमिनीचे सरासरी प्रमाण कमी असल्यामुळे अधिक उत्पादन मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी ओढे, नाल्यांचे सपाटीकरण करून शेती लागवडीखाली आणली आहे. त्याच बरोबर शहरी भागात देखील मानवी वस्त्यांच्या निर्मितीसाठी ओढ्यांचे सपाटीकरण केले. या ओढ्या, नाल्यांचे रूंदीकरण केले व खोलीकरण केल्यास निश्चितपणे शिवारातील पाणी शिवारात राहण्यास मदत होईल.

अशा पद्धतीने उपाययोजना करण्यात आल्यास त्याचा फायदा जलसंधारणासाठी निश्चितपणे होईल. मुळातच दुष्काळ आणि महापूर या नैसर्गिक चक्राच्या घटना आहे. शिव काळात व इंग्रज काळात देखील भीषण दुष्काळानंतर अतिवृष्टी होऊन महापूर आल्याचे देखील उदाहरणे आहे. १९६१ साली पानशेत धरण फुटून जलप्रलय झाला. परंतु १९७२ ला भीषण दुष्काळ पडला. १९७२ च्या दुष्काळानंतर देखील मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. २००१-०२ मध्ये मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला. परंतु २००५ व २००६ यावर्षी अतिवृष्टी होऊन महापूराची परिस्थितीची उद्‌भवलीच म्हणून दुष्काळ व महापूर या चक्रीय संकल्पना आहे. त्यासाठी अतिवृष्टीच्या काळातील अतिरिक्त पाणी दुष्काळाच्या परिस्थितीत वापरता येण्यासाठी

दीर्घकालीन उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी लोक सहभाग अत्यंत महत्वाचा आहे.

### संदर्भ सूची:


१) कोळंबे रंजन, *भारतीय अर्थव्यवस्था*, २०१५, भगीरथ प्रकाशन, पुणे.

२) मिश्रा जे.पी., *भारतीय अर्थव्यवस्था*, २०१४, प्रतियोगिता दर्पण, दिल्ली.

३) मोरे दि.मा., *परिवर्तनाच्या वाटेवरील सिंचन*, सकाळ ॲग्रोवन, १ एप्रिल २०१५, पृ. ७.

४) अडकीने बापू, *तहानले पाणी:भाग २*, सकाळ ॲग्रोवन, ११ ऑगस्ट २०१५. पृ.७.

५)देशमुख सतीश, *सर्वांगीण जलव्यवस्थापनाचा विचार हवा*, सकाळ ॲग्रोवन, २८ ऑगस्ट २०१५.

६) टेकाळे नागेश, *मराठवाड्यातील पीक पद्धती बदलण्याची गरज*, सकाळ ॲग्रोवन, ५ सप्टेंबर २०१५.

७) गोमारे महादेव, *.... तर जलक्रांती दूर नाही*, सकाळ ॲग्रोवन, २१ सप्टेंबर २०१५.


---

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९वे राष्ट्रीय अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९ वे राष्ट्रीय अधिवेशन श्री. नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम (जैन गुरुकूल) संचलित कर्मवीर केशवलालजी खरकचंदजी आबड कला, श्रीमान मोतिलालजी गिरधारीलालजी लोढा वाणिज्य व श्रीमान पी. एच. जैन विज्ञान (वरिष्ठ) आणि श्रीमान प्रेमराजजी दलीचंदजी सुराणा कला, वाणिज्य व विज्ञान (कनिष्ठ) महाविद्यालय, नेमिनगर, चांदवड, जिल्हा नाशिक येथे सामान्यपणे नोव्हेंबर २०१६ मध्ये आयोजित केले जाईल. या अधिवेशनातील चर्चासत्राचे विषय पुढीलप्रमाणे राहतील.

१) प्रा.नी.वि.सोवनी यांचे आर्थिक विचार.

२) आर्थिक सुधारणा आणि भारतीय शेती.

३) महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासंदर्भात शासनाची भूमिका.

- कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद.

# सहस्रक विकासाचे ध्येय व भारताची प्रगती

नंदकुमार विश्वनाथ मेटे, यवतमाळ,
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
अमोलकचंद महाविद्यालय.
भ्रमणध्वनी:९४२१६५४१७१
Email: nanadkumarmete@yahoo.co.in

सप्टेंबर २००० मध्ये जगातील १८९ देशाचे नेते अमेरिकेतील न्यूयॉर्क या शहरात एकत्र येऊन त्यांनी सहस्रक विकास जाहीरनाम्यास (The Millennium Development Goals- MDGs) पाठिंबा दिला. यानुसार सर्वांनी समर्पण वृत्तीने एकत्रित काम करून एका सुरक्षित, अधिक भरभराटीच्या व समान जगाची बांधणी करण्याच्या दृष्टीने एक धाडसी दृष्टिकोन समोर ठेवून सर्व ठरवलेली उद्दिष्टचे २०१५ च्या आत पूर्ण करायची आहेत.

सहस्रक विकास ध्येयाच्या संदर्भात भारताने केलेली प्रगती निश्चितच उल्लेखनीय स्वरूपाची असलेली दिसते. दुसऱ्या शब्दात भारताने सहस्रक विकास ध्येयापैकी काही ध्येयाची प्राप्ती मुदतपूर्व काळातच केलेली दिसत असली तरी काही ध्येयाच्या प्राप्तीसंदर्भात आज देखील वस्तुस्थिती चांगली असलेली दिसत नाही.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सहस्रक विकास ध्येयाच्या उच्चारणास आज चौदा वर्ष होऊन गेलेली आहेत. सहस्रक विकास ध्येयाच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघाने एकूण आठ ध्येय्ये व त्या अनुषंगाने १८ लक्ष्य निर्धारित केलेले होते. या सर्व सहस्रक विकास ध्येयाच्या प्राप्ती संदर्भात भारताने केलेली प्रगती कशा स्वरूपाची आहे ते आपणास पुढील प्रमाणे सांगता येईल.

ध्येय क्रमांक १: आत्यंतिक दारिद्र्य व भुकेचे उच्चाटन करणे.

लक्ष्य क्रमांक १: १९९० ते २०१५ या कालावधीत एक डॉलरपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीचे प्रमाण निम्म्यापर्यंत खाली आणणे.

१९९० मध्ये संपूर्ण भारतात दारिद्र्य व्यक्ती गणना प्रमाण (Poverty Head Count Ratio-PHCR) ४७.८% अनुमानित होते ते २०१५ ला २३.९% होणे आवश्यक होते, जे २०११-१२ मध्येच संपूर्ण भारतात ते २१.९% इतके

होते. याचा अर्थ भारताने लक्ष्य क्रमांक एक वेळे आधीच पूर्ण केलेले दिसते.

२००४-०५ ते २०११-१२ या कालावधीत भारतातील ग्रामीण व शहरी भागात दारिद्र्य अंतर प्रमाण (Poverty Gap Ratio-PGR) घटलेले दिसून येते. भारतात २००४-०५ मध्ये ग्रामीण दारिद्र्य अंतर प्रमाण ९.६४ होते ते २०११-१२ मध्ये ५.०५ झाले. शहरी भागातील हेच प्रमाण याच कालावधीत ६.०८ वरून २.७० इतके कमी झाले. थोडक्यात, २००४-०५ ते २०११-१२ या कालावधीत ग्रामीण व शहरी दोन्ही भागातील दारिद्र्य अंतर प्रमाणा जवळजवळ ५० % कमी झाले. हे प्रतिबिंबीत करते की ते ग्रामीण व शहरी भागातील लोकांच्या स्थितीमधील सुधारणेचे. आज संपूर्ण भारताचा विचार करता एकूण उपभोगातील वंचितता शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात जास्त असलेली दिसते. भारतात एकूण लोकसंख्येमधील न्युनपोषितांची संख्या १९९०-९२ मध्ये २३.७% होती ती घटून १९९४-९६ मध्ये २१.६ % झाली आणि २००४-०६ व २०१४-१६ मध्ये अनुक्रमे २१.२% व १५.२ % पर्यंत घटली. असे असले तरी जगामधील एकूण न्युनपोषित व्यक्तींपैकी ४ थी व्यक्ती ही भारतीय आहे. तसेच जगातील न्यून वजनाच्या बालकापैकी प्रती तिसरा न्यून वजनाचा बालक हा देखील भारतीय आहे.

एकसमान संदर्भ कालावधी निदेशकानुसार (Uniform Reference Period) ते दारिद्र्य अंतर प्रमाण शहरी भागामध्ये १९९३-९४ ते २०११-१२ या कालावधीत ८.०७% वरून ७.१% पर्यंत घटलेले दिसते ते प्रमाण ग्रामीण भागात याच कालावधीमध्ये ९.६% वरून ९.१% पर्यंत नियमितपणे घटलेले दिसते.

ध्येय क्रमांक २: प्राथमिक शिक्षणाची वैश्विक प्राप्ती करणे.

लक्ष्य क्रमांक ५: प्राथमिक शिक्षणाचा पूर्ण अभ्यासक्रम सर्व मुले व मुली पूर्ण करतील याची हमी देणे.

प्राथमिक शिक्षणामधील (वय ६-१० वर्ष ) निव्वळ नामांकन दर (NER)२००५-०६ च्या शिक्षणावरील जिल्हा माहिती प्रणालीनुसार (U-DISE) ८४.५ % होता, तो वाढून २०१३-१४ च्या जिल्हा माहिती प्रणालीनुसार ८८.०८% पर्यंत वाढला त्यामुळे ठरलेल्या लक्ष्यांची साध्यता २०१५ पर्यंत होईल असे वाटत नाही.

२०११-१२च्या शिक्षणावरील जिल्हा माहिती प्रणाली अहवालानुसार ग्रेड V ते ग्रेड I चा नामांकनाचा दर २००९-१० मध्ये ७८.०% होता तो वाढून २०११-१२ मध्ये ८६.०५% इतका झाला.

भारतातील तरुणामधील साक्षरता (वय १५-२४ वर्षे) १९९१ ते २०११ या कालावधीत ६१.९% वरून ८६.१४% झाली. साक्षरतेतील प्रगती याच पद्धतीने राहिली तर २०१५ पर्यंत या वयातील साक्षरतेचा दर ९३.३८% असेल, जो १००% लक्ष्याच्या जवळजवळ असेल. २०१५ पर्यंत भारतातील पुरूष व स्त्रियांमधील या वयातील साक्षरता अनुक्रमे ९४.८१% व ९२.४७% असेल.

ध्येय क्रमांक ३: स्त्री-पुरूष समानता व महिला सक्षमीकरणास प्रोत्साहन.

लक्ष्य क्रमांक ४: २०१५ पर्यंत प्राथमिक व माध्यमिक शिक्षणामधील स्त्री-पुरूष विषमता नाहीशी करणे आणि अशा प्रकारच्या आधारावरील

विषमता सर्वच स्तरावरच्या शिक्षणात २०१५ नंतर देखील राहणार नाही.

सद्यस्थितीत प्राथमिक शिक्षणामधील नामांकन स्त्रियांसाठी अनुकूल असलेले दिसते. प्राथमिक शिक्षणामधील स्थूल नामांकन प्रमाणाचा (GER) स्त्री-पुरूष समानता निर्देशांक (GPI) २०१३-१४ मध्ये १.०३ होता हेच प्रमाण माध्यमिक शिक्षणाकरिता याच कालावधीत १ इतके होते ते शिक्षणाच्या तृतीय स्तरामध्ये २०१२-१३ ला ०.८९ इतके होते.

संपूर्ण भारताचा विचार करता २०११ च्या जनगणनेनुसार महिला युवती साक्षरतेचा दर पुरूष युवक साक्षरतेच्या दराशी ०.९१ इतका होता. तो २०१५ पर्यंत १ होईल अशी अपेक्षा आहे.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या ६८ व्या फेरीनुसार (२०११-१२) निघालेला निष्कर्ष असा होता की, अकृषी क्षेत्रामधील मजुरी रोजगारातील महिलांचा प्रतिशत वाटा संपूर्ण राष्ट्रीय स्तरावरती १९.३% होता. हीच आकडेवारी ग्रामीण व शहरी भागाकरिता अनुक्रमे १९.९% आणि १८.७% इतकी होती. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या ६६ व्या फेरीपेक्षा (२००९-१०) यात प्रगती झालेली दिसते. एन.एस.एस.च्या ६६ व्या फेरीनुसार अकृषी क्षेत्रामधील मजुरी रोजगारातील महिलांचा प्रतिशत वाटा संपूर्ण राष्ट्रीय स्तरावरती १८.६% होता, जो ग्रामीण व शहरी भागाकरिता अनुक्रमे १९.६% व १७.६% होता. अशाच प्रकारची प्रगती राहिली तर तो २०१५ पर्यंत २२.२८ राहण्याची शक्यता आहे. जी निर्धारित लक्ष्यापेक्षा (५०%) खूप दूर असलेला दिसतो. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. परंतु भारतात जानेवारी २०१५ मध्ये निवड झालेल्या लोकसभेच्या एकूण ५४२ सदस्यांपैकी स्त्री सदस्याची संख्या केवळ ६५ होती तर राज्यसभेच्या एकूण २४२ सदस्यांपैकी स्त्री सदस्यांची संख्या फक्त ३१ होती. अशा प्रकारे भारताच्या संसदेमध्ये असणाऱ्या स्त्रियांच्या सदस्यांची टक्केवारी फक्त १२.२४% आहे जी निर्धारित लक्ष्याचा विचार करता ५०% असायला हवी होती.

ध्येय क्रमांक ४: बालमृत्युदर कमी करणे.

लक्ष्य क्रमांक ५: पाच वर्षाखालील मुलांच्या मृत्यूचे प्रमाण (U5MR) १९९०-२०१५ या कालावधीत २३ नी कमी करणे.

भारतात पाच वर्षाखालील मुलांच्या मृत्यू दराचे प्रमाण १९९० मध्ये १२.६ % होते. ते १९९५, २०००, २००५ व २०१३ मध्ये अनुक्रमे १०.९%, ९.१%,७.५% व ५.३% पर्यंत खाली आले. भारतात १९९० मध्ये जन्मलेल्या १००० जिवंत बालकांपैकी १२५ बालकांचा मृत्यू वय वर्ष पाच पूर्ण करण्याच्या आत होत होता. दिलेल्या लक्ष्याचा विचार करता २०१५ पर्यंत तो ४२ पर्यंत आणणे आवश्यक आहे. २०१४ च्या नमुना नोंदणी पद्धतीनुसार (SRS) पाच वर्षाखालील बालमृत्यू दर, दर हजारी ४९ इतका होता. अशाच प्रकारची ऐतिहासिक प्रवृत्ती येणाऱ्या काळात दिसून आली तर २०१५ पर्यंत तो ४८ पर्यंत खाली येईल. त्यामुळे येथे देखील ठरवलेल्या लक्ष्यापासून आपण किंचित दूर राहू. तरी पण एकंदर पाहता १९९०-२०१३ च्या कालावधीत खूप मोठ्या प्रमाणात म्हणजे जवळजवळ ६०% बालमृत्युदरात घट नोंदवली गेली. हा बालमृत्यूचा दर येत्या काळात अशाच पद्धतीने नोंदवला गेला तर २०१५ पर्यंत ठरवलेल्या लक्ष्याच्या आपण खूप जवळ राहू यात कोणतीच शंका नाही.

अर्भक मृत्युदर (IMR) १९९० मध्ये दर हजारी ८० होता तो २०१३ च्या नमुना नोंदणी पद्धतीनुसार ४० होता आणि तो २०१५ पर्यंत ३९ पर्यंत पोहचू शकेल. परंतु निर्धारित लक्ष्य २०१५ पर्यंत २७ अर्भक मृत्युदराचे आहे. परंतु पाठीमागील काही वर्षापासून अर्भक मृत्युदरामध्ये होणारी घट निर्धारित लक्ष्य व वास्तविक अर्भक मृत्युदर यातील अंतर कमी होत असलेले दिसून येते. वृत्तांत मूल्यांकन सर्वेक्षणानुसार (Coverage Evaluation Survey- CES) २००९ मध्ये एक वर्ष वय असणाऱ्या एकूण मुलांपैकी ७४% मुलांना गोवर प्रतिबंधक लसीकरण केले जात होते तेच प्रमाण १९९२-९३ मध्ये ४२% इतके होते. गोवर रोगाविरूद्ध केल्या जाणाऱ्या लसीकरणाच्या प्रगतीचा दर असाच राहिला तर तो २०१५ पर्यंत ८९% इतका राहू शकेल जो वैश्विक निर्धारित लक्ष्यापेक्षा (१००%) कमी असेल.

ध्येय क्रमांक ५: मातांच्या आरोग्यामध्ये सुधारणा.

लक्ष्य क्रमांक ६: माता मृत्युदर ३४ पर्यंत खाली आणणे.

१९९० मध्ये १ लाख जिवंत बालकांच्या मागे ४३७ माता मृत्युदर (MMR) होता. २०१५ पर्यंत वरील (ध्येय क्र. ५) सहस्रक विकासाचे ध्येय गाठावयाचे असेल तर माता मृत्युदर २०१५ पर्यंत प्रती १ लाख जिवंत बालकांच्या मागे माता मृत्युदर १०९ पर्यंत आणणे आवश्यक आहे. २०११-१३ च्या नवीन अनुमानानुसार भारतातील असणारा माता मृत्युदर १६७ होता. सध्याच्या पद्धतीनेच प्रगती होत राहिली तर २०१५ पर्यंत माता मृत्यूचे प्रमाण १४० असेल. त्यामुळे MDGs च्या ध्येयापासून आपण बरेच दूर राहू हे लक्षात येते. तरीपण उचीत प्रयत्नाद्वारे हे प्रमाण सतत घटवून वरील लक्ष्यापासूनचे अंतर निश्चितच कमी करता येईल यात शंका नाही.

२००९ मध्ये युनिसेफ व भारत सरकारने केलेल्या वृत्तांत मूल्यांकन सर्वेक्षणानुसार ७६.२% प्रसुती ह्या प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्या द्वारे केल्या गेल्या तर २०१३ च्या नमुना सर्वेक्षण पद्धतीनुसार ८७.१% प्रसुती ह्या प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांद्वारे (जसे - शासकीय दवाखाने, खाजगी रूग्णालये प्रशिक्षित कर्मचारी इ.) करण्यात आल्या जे निश्चितच चांगल्या स्थितीचे द्योतक आहे.

ध्येय क्रमांक ६: एच.आय.व्ही.एड्स, मलेरिया व इतर रोगांविरूद्ध लढाई करणे.

लक्ष्य क्रमांक ७: २०१५ पर्यंत एच. आय. व्ही. एडस् चा प्रसार थांबवायला हवा व त्या नंतर त्याच्या प्रसाराचा दर कमी करणे.

जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ व युएनएड्स संस्थांनी २०१५ मधील एड्स बाबत काही तथ्ये सांगीतली ती धक्कादायक अशीच होती.

१) वैश्विक स्तरावर एड्सबाधीतांची एकूण संख्या ३६.९ मिलियन होती. त्यापैकी २.६ मिलियन मुले होती.
२) २०१४ मध्ये २ मिलियन लोकांना एड्सची लागण झाल्याचा अनुमान आहे.
३) एड्समुळे पौंगडावस्थेतील मरण पावणाऱ्या मुलांची संख्या गेल्या पंधरावर्षात तिपटीने वाढली आहे.
४) आफ्रिकेमधील पौंगडावस्थेतील मुलांच्या मृत्यूचे प्रमुख कारण आज एड्स आहे.
५) २००१ मध्ये एक मिलियन लोकांना ॲन्टीरिट्रोव्हायरल उपचार पद्धती मिळत होती ती २०१५ मध्ये १५ मिलियन लोकांना मिळत

आहे.

६) २००० नंतर जवळपास आठ मिलयिन लोक एड्समुळे मरण पावली

एड्सवरील संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका अहवालनुसार एकूण एड्सबाधित लोकांपैकी (३६.९ मिलियन) जवळपास १९ मिलियन लोकांना त्यांना एड्स आहे हेच माहीत नाही.

**भारतातील एड्ससंदर्भात स्थिती:**

जगामध्ये सर्वात जास्त एच.आय. व्ही.एड्स बाधितांची संख्या दक्षिण अफ्रिकेत (६.३० मिलियन) आहे दुसऱ्या क्रमांकावर (३.२ मिलियन) नायजेरिया आहे तर तिसऱ्या क्रमांकावर भारत (२.१ मिलियन) आहे. आशिया खंडातील एकूण दहा एच.आयव्ही. एड्सबाधितांपैकी चार जण भारतातील आहेत. भारतामध्ये केवळ ३१% लोकांना एचआयव्ही वरील उपचार पद्धती मिळते. २०१३ च्या अखेरपर्यंत भारतात एच. आय.व्ही. संसर्गाचा परिणाम कमी करण्यासाठी ॲन्टीरिट्रोव्हायरल उपचार पद्धतीचा उपयोग करणाऱ्यांची संख्या ७ लाखापेक्षा जास्त होती. भारतामध्ये शरीरविक्रय व्यवसायात गुंतलेल्या महिला कामगारांमधील एचआयव्ही चे प्राबल्य १०.३% वरून २.७% पर्यंत घटले आहे. मात्र आसाम, बिहार व मध्यप्रदेश राज्यातील शरीर विक्रय करणाऱ्या स्त्री कामगारामधील एच.आय.व्ही. चे प्राबल्य वाढलेले दिसते. भारतामध्ये शरीरविक्रय व्यवसायात गुंतलेल्यांची संख्या ८ लाख ६८ हजार अनुमानित आहे. त्यापैकी २.८% एच.आय.व्ही. बाधित आहेत.

भारतात ज्या महिलांना इंजेक्शनद्वारे ड्रग्ज घेण्याची सवय आहे. त्यांना एड्सची लागण होण्याची शक्यता ही दुप्पट असलेली दिसून येते. भारताचा एड्सवरील देशांतर्गत खर्च २०१० मध्ये ७३ मिलियन डॉलर इतका होता तो वाढून २०१४ मध्ये १६४ मिलियन डॉलर पर्यंत वाढला.

२००५ मध्ये भारतातील १५-२९ वयोगटातील गर्भवती महिलांपैकी ०.८९% महिलांना एचआयव्हीची लागण झालेली होती, हे प्रमाण कमी होऊन २०१२-१३ मध्ये ०.३२% पर्यंत झाले.

२००५-०६ मधील राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS) च्या तिसऱ्या फेरीनुसार भारतातील १५-४९ विवाहित महिलांपैकी संतती प्रतिबंधक साधन म्हणून कंडोमचा उपयोग केवळ ५.२% महिला करत होत्या.

२००१ व २००६ मध्ये केलेल्या एका सर्वेक्षणानुसार (Behovioural Surveillance Survey -BSS) १५ ते २४ वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण ज्यांनी आपला शेवटचा संभोग जो नियमीत जोडीदाराशिवाय इतरांसोबत (ज्यास उच्च जोखिम संभोग म्हणतात - Last high risk sex) करत असतांना कंडोमचा वापर केला अशांचे नोंदले गेलेले प्रमाण २००१ मध्ये ५१.९% होते ते वाढून २००६ मध्ये ६१.७% झाले तर २०१० मध्ये केल्या गेलेल्या एका सर्वेक्षणानुसार (Condom Promotion Impact Survey 2010) संपूर्ण भारतामध्ये वरील प्रकारच्या स्थितीमध्ये कंडोमचा वापर करणाऱ्यांचे प्रमाण हे ७४% झाले. थोडक्यात, २००६ ते २०१० या कालावधीत २०% नी सुधारणा झालेली दिसून येते.

याच सर्वेक्षणानुसार १५ ते २९ वयोगटातील लोकसंख्येपैकी ज्यांना एचआयव्हीएड्स बद्दल सर्वंकष अचूक ज्ञान आहे

अशांची टक्केवारी २००१ मध्ये केवळ २२.२% होती ती वाढून २००६ ला ३२.९% झाली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभासद राष्ट्रांनी २०३० अखेरपर्यंत एड्स रोगाच्या समूळ उच्चाटनाचे वैश्विक ध्येय सप्टेंबर २०१५ मध्ये निर्धारित करून त्याबाबत संमती दर्शविली आहे.

लक्ष्य क्रमांक ८: मलेरिया आणि इतर मुख्य आजारांच्या घटना २०१५ पर्यंत थांबवून त्यानंतर अशा प्रकारच्या रोगांच्या प्रसाराचा दर कमी करणे.

मलेरियाची लागण झाल्याचे प्रमाण हे सतत घटत असलेले दिसते. २००१ मध्ये दर हजार पुरूषांमागे २.१२ लोकांना मलेरियाची लागण झालेली होती ती घटून २०१३ मध्ये दर हजार पुरूषामागे ०.७२ इतकी झाली. ती थोडीशी वाढून २०१४ मध्ये दरहजार पुरूषांमागे ०.८८ इतकी झाली. तरीपण २०१३ मध्ये संपूर्ण भारतात मलेरियामुळे निश्चित मृत्यू झालेल्यांची संख्या ४४० व २०१४ मध्ये ५७८ नोंदवली गेली.

भारतामध्ये १९९० ला दरलाख लोकसंख्येमागे क्षयरोग (T.B.) झालेल्यांचे प्रमाण ४६५ व्यक्ती होत्या त्या २०१३ ला घटून २११ इतक्या झाल्या. क्षयरोग झाल्यामुळे मृत्यू झालेल्यांचे प्रमाण १९९० मध्ये दरलाख लोकसंख्येमागे ३८ इतके होते ते घटून २०१३ ला १९ इतके झाले.

ध्येय क्रमांक ७ : निरंतर पर्यावरणाची हमी.

लक्ष्य क्रमांक ९: देशाच्या धोरण व कार्यक्रमामध्ये स्थैर्यासह विकासाकरिता एकत्रित नियमांची बांधणी करून पर्यावरण संसाधनाची हानी कमी करणे.

२०१३ मध्ये केलेल्या मोजमापानुसार देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रफळापैकी वनाच्छादित क्षेत्र ६९७८९८ चौ. कि.मी. होते. ते देशाच्या भौगोलिक क्षेत्राच्या २१.२३% इतके होते. २०११ ते २०१३ या कालावधीत वनाच्छादित क्षेत्रफळ ५८७१ चौ. कि.मी. ने वाढले.

२००० मध्ये भारतात एकूण ८९ राष्ट्रीय उद्याने आणि ४८९ अभयारण्य होते.ह्या दोघांचे मिळून एकूण संरक्षित क्षेत्रफळ १५५४७५.६३ चौ. कि.मी. होते. २०१४ मध्ये यात वाढ होऊन एकूण संरक्षित क्षेत्रे ६९२ इतके झाले. पैकी एकूण राष्ट्रीय उद्यानांची संख्या १०३, अभयारण्याची संख्या ५२५ सामूहिक संरक्षित वने ४ व संवर्धन संरक्षित ६० क्षेत्रे होती या सर्वांचे मिळून संरक्षित क्षेत्रफळ २०१४ मध्ये १५८६४५.०५ चौ. कि.मी. झाले.

भारतात २०१३ मध्ये कार्बनडाय ऑक्साईडचे उत्सर्जन १९५४.०२ मिलियन टन इतके होते. १९९० ते २०१४ या कालावधीत भारतात कार्बनडाय ऑक्साईच्या उत्सर्जनाचे प्रमाण २३५.५७% नी वाढले. २००० मध्ये क्लोरोफ्लोरो कार्बनचा उपभोग ५६१४ टन होता तो घटून २०१० मध्ये २९०.७३३ टन इतका झाला. २००० पासून क्लोरोफ्लोरो कार्बनच्या उपभोगामध्ये २००८ पर्यंत सतत घट होत असलेली दिसते परंतु २०१० मध्ये याच्या उपभोगात किंचितशी वाढ झालेली दिसते. २००१ च्या जणगणनेनुसार भारतातील ७४.३% कुटुंबे घनइंधनाचा जसे लाकूड, शेतातील पिकांपासून शिल्लक राहिलेला भाग, गोवऱ्या, कोळसा इ. उपयोग स्वयंपाक बनवण्याकरिता करत होती. मात्र २०११ च्या जणगणनेनुसार ६७.३% कुटुंबे वरील प्रकारच्या घनइंधनाचा वापर स्वयंपाकाकरिता करत होती. २०११ ची जणगणना पुढे अशी ही सांगते

की ग्रामीण भागातील ८६.५% तर शहरी भागातील २६.१% कुटुंबे स्वयंपाकाकरिता घनइंधनाचा वापर करत होती.

भारतात दरडोई ऊर्जा उपभोग २०११-१२ मध्ये ६२०५.२४ किलोवॅट इतका होता तो वाढून २०१२-१३ मध्ये ६७४८.६१ किलोवॅट इतका झाला अशा प्रकारे ऊर्जा उपभोगातील वार्षिक वृद्धीची टक्केवारी ८.७६% इतकी होती.

**लक्ष्य क्रमांक १०:** ज्यांना पिण्याचे शुद्ध पाणी व आरोग्याच्या मुलभूत सोयी- सुविधा निरंतर मिळत नाहीत त्यांचे प्रमाण २०१५ पर्यंत निम्म्याने कमी करणे.

२०१२ मध्ये संपूर्ण देशाचा विचार करता ८७.८% कुटुंबांना मिळणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतात सुधारणा होऊन उपलब्धता झाली होती. ग्रामीण भागातील ८६.९% कुटुंबे व शहरी भागातील ९०.१% कुटुंबास पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतात सुधारणा होऊन उपलब्धता झाली. १९९० च्या कालावधीत ज्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची उपलब्धता नव्हती त्यांना ती उपलब्ध करून त्यावेळच्या प्रमाणापेक्षा २०१५ पर्यंत निम्याने कमी करण्याचे लक्ष्य होते ते ग्रामीण भागात साध्य झालेले असून शहरी भागातील प्रमाण लक्ष्याच्या जवळजवळ आलेले आहे. तरीपण संपूर्ण भारताचा विचार करता शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतात उपलब्धतेचे २०१५ पर्यंतचे लक्ष्य पूर्वीच प्राप्त केले आहे.

२०१२ च्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणानुसार संपूर्ण भारतामध्ये ४३.४% लोकांकडे स्वच्छतागृहांची उपलब्धता नव्हती. याच सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागात ५९.४% लोकांना तर शहरी भागात ८.८% लोकांना सार्वजनिक स्वच्छतेच्या सोयी-सुविधांची उपलब्धता नव्हती. सार्वजनिक स्वच्छता उपलब्ध नसण्याच्या संदर्भात २०१५ पर्यंतचे निर्धारित लक्ष्य ग्रामीण भागात ४६.७७% आहे तर शहरी भागात १४.१८% आहे. तर प्रत्यक्षातील वस्तुस्थिती ही अनुक्रमे ग्रामीण भागात ६०.९६% तर शहरी भागात १०.७४% राहील.

थोडक्यात, सार्वजनिक स्वच्छतेच्या उपलब्धतेच्या संदर्भातील निर्धारित लक्ष्य शहरी भागात प्राप्त केलेले आहे. परंतु भारतातील ग्रामीण भाग मात्र आजही निर्धारित लक्ष्यांपासून पुष्कळ दूर असलेला दिसतो. संपूर्ण भारताच्या संदर्भात (ग्रामीण व शहरी मिळून) ज्यांना सार्वजनिक स्वच्छतेच्या सोयी सुविधा उपलब्ध नाहीत अशांचे निर्धारित लक्ष्य ३८.९% असतांना प्रत्यक्षातील स्थिती मात्र ४७.३१% इतकी असेल.

**लक्ष्य क्रमांक ११ :** २०२० पर्यंत झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या कमीतकमी १०० मिलियन लोकांच्या राहणीमानात उल्लेखनीय सुधारणा करणे.

२०११ च्या भारतीय जनगणनेनुसार १७.२% शहरी कुटुंबे ही झोपडपट्ट्यांमध्ये राहत होती. एकूण झोपडपट्टी कुटुंबाचे शहरी कुटुंबाशी असणारे प्रमाण हे २२.१७% इतके होते. २००१ ते २०११ या दशकात झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबांच्या संख्येत ३७.१४% इतकी लक्षणीयरित्या वाढ झालेली दिसते. थोडक्यात, निर्धारित लक्ष्य दृष्टोत्पत्तीस पडणारे दिसत नाही.

**ध्येय क्रमांक ८:** विकासासाठी वैश्विक भागीदारी विकसीत करणे

**लक्ष्य क्रमांक १८:** खाजगी क्षेत्राच्या सहकार्याद्वारे नवीन तंत्रज्ञानाचे फायदे उपलब्ध करून देणे, (विशेषत: माहिती व जनसंपर्क तंत्रज्ञानाचे.)

प्रती शंभर व्यक्तीमागे असणाऱ्या दूरध्वनींची उपलब्धता म्हणजे दूरध्वनी घनता (Tele density) होय. भारतामध्ये ३१ जुलै २०१४ ला ७६% लोकांकडे दूरध्वनीसारख्या संपर्क साधनांची उपलब्धता होती. ज्यात होत जाणारी प्रगती ही प्रचंड असलेली दिसते. भारत देशामध्ये राज्यनिहाय व शहरी आणि ग्रामीण क्षेत्रनिहाय असणारी दूरध्वनी घनता वेगवेगळी पाहावयास मिळते. जून २०१५ मध्ये भारतातील दूरध्वनी घनता ७९.९८% होती पैकी १४९.७०% दूरध्वनी घनता शहरी भागातील होती तर ४८.६६% दूरध्वनी घनता ग्रामीण भागातील होती. राज्यनिहाय दूरध्वनी घनतेमध्ये देखील फरक असलेला पहावयास मिळतो सर्वात जास्त दूरध्वनी घनता दिल्लीमध्ये (११७.७१७%) असलेली दिसून आली. तर सर्वात कमी बिहारमध्ये (५४.४७%) होती तर महाराष्ट्रातील दूरध्वनी घनता ९२.८४% इतकी होती.

डिसेंबर २०१५ च्या मानव विकास अहवालानुसार जागतिक स्तरावरती दूरध्वनी घनतेच्या उपलब्धतेत देखील विभिन्नता पहावयास मिळते जसे विकसनशील जगात असणारी दूरध्वनी घनता ३२% होती. विकसीत जगात ७८% तर संपूर्ण जगामध्ये सरासरी दूरध्वनी घनता ४०% होती.

त्याबरोबरच प्रती शंभर लोकांच्यामागे इंटरनेचा वापर करणाऱ्यांची संख्या भारतात जून २०१३ मध्ये १६.१५% होती ती जून २०१४ ला २०.८३% झालेली दिसते. जून २०१५ च्या अखेरपर्यंत भारतात इंटरनेटचा उपयोग करणाऱ्यांची एकूण संख्या ३५४ मिलियन इतकी होती. जी अमेरिकेच्या एकूण लोकसंख्येपेक्षा जास्त आहे.

जगात सर्वात जास्त इंटरनेचा वापर करणाऱ्यांची संख्या चिनमध्ये आहे. त्या खालोखाल भारताचा क्रमांक लागतो. IAMAI (Internet and Mobile Association of India) च्या अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार २०१५ च्या सुरूवातीच्या सहा महिन्यांमध्ये इंटरनेटचा वापर करणाऱ्यांच्या संख्येमध्ये १७% इतकी वाढ नोंदवली गेली व त्यात ५२ मिलियन इतक्या अतिरिक्त इंटरनेचा वापर कर्त्यांची भर पडली.

**समारोप:**

सहस्रक विकास ध्येयाने भारतातील व संपूर्ण जगातील लहान मुलांकरिता खूप काही प्राप्त करून दिले यात कुठलीही शंका नाही. गेल्या पंधरा वर्षांच्या काळात सर्व काही प्रश्न कायमचे सुटले असे जरी म्हणता येत नसले तरी गरिबीमधील घट, बालमृत्युदरातील कमी वा शैक्षणिक नावनोंदणीमधील सुधारणा ह्या सर्व काही गोष्टी वैश्विक स्तरावरील राजकर्त्यांची राजकीय समर्पण वृत्ती व वरील प्रश्नांच्या निराकरणासाठी करण्यात आलेली भरीव गुंतवणूक ह्या सर्वांमुळे बराच सकारात्मक बदल पाहावयास मिळतो. सहस्रक विकासाचे ध्येय २०१५ च्या अखेर संपेल. परंतु अभ्यासक व राजकीय नेत्यांनी एकत्र येऊन सखोल चर्चा व विचार- विनिमय करून यापुढे आपण काय करायला पाहिजे हे ठरवून घ्यावे लागेल. यानंतर आपणास येत्या काळात दुसऱ्या कुठल्या विकास कल्पनाबंधाची गरज पडेल की, पूर्वीच्याच सहस्रक विकास धोरणास पुढे वाढवत न्यावे लागेल यासारखे प्रश्न येणाऱ्या काळात कदाचित आपल्या मनात पुन्हा निर्माणही होतील.

**संदर्भ सूची:**

1) Bhende A.A. Kanitkar T., *Principles of population Studies*, 2011, Himalaya Publishing House.
2) Chandna R.C., *Geography of Population : Concept Determinants & Patterns*, 2009, Kalyani Publishers.
3) *Human Development Report 2015*, Work for Human Development, United Nations Development Programme (UNDP)
4) *India National Family Health Survey* (NFHS-3) 2005-06, 2007, International Institute for Population Sciences.
5) India-*National Sample Survey* 2011-12 (68 th Round)
6) *Millennium Development Goals India Country Report* 2014, United Nations New York.
7) *Millennium Development Goals India Country Report* 2015, United Nations New York.
8) *National Health Policy 2015 Draft*, 2014, Ministry of Health & Family Welfare.
9) Sinha V.C., Zacharia E., *Elements of Demography*, 1984, Allied Publishers Private Limited.
10) *2015 Global Hunger Index*, P-31
11) Censusindia.gov.in/2011
12) Censusindia.gov.in/censul_data2001
13) www.trai.gov.in
14) www.broolangs.edu/mdga

# महाराष्ट्रातील पाणलोट क्षेत्र विकास

**अनिलकुमार कृष्णराव वावरे**, सातारा,
अर्थशास्त्र विभाग (पदवी व पदव्युत्तर)
छत्रपती शिवाजी कॉलेज.
भ्रमणध्वनी:९८५०११७२२६
ई-मेल: anilwavare75@rediffmail.com

शेती क्षेत्राच्या व शेतकऱ्यांच्या विकासाशिवाय ग्रामीण विकास शक्य नाही. हे जागतिक स्तरावर सुद्धा आज मान्य होत आहे. भारतातील कृषी विकासातील प्रमुख अडथळा हा अपुरा पाणी पुरवठा आहे. देशात तसेच महाराष्ट्रात पाणी व्यवस्थापनासाठी पाणलोट विकासाचा कार्यक्रम राबविला जात आहे. मात्र हा कार्यक्रम सर्वच ठिकाणी यशस्वी होताना दिसत नाही. राज्याच्या काही भागात अतिरिक्त सिंचनामुळे जमिनीच्या क्षारीकरणाची समस्या निर्माण होत आहे. तर दुसरीकडे जमिनीला पाणीच मिळत नसल्यामुळे तिला भेगा पडत आहेत. सिंचनामुळे ग्रामीण विषमतेची दरी अधिक रुंदावत चालली आहे. राज्यातील जनता पाण्याच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरत आहे. एकूणच राज्याच्या आर्थिक विकासात पाणी प्रश्न हा महत्त्वाचा अडथळा ठरत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे पाणी धोरण व सिंचन विकासाची मूलभूत उद्दिष्टे नव्याने मांडण्याची आवश्यकता आहे. पाण्याच्या मूलभूत व्यवस्थेत राज्य यंत्रणेला पूर्ण अपयश आले आहे. असे मत या क्षेत्रातले जाणकार आता स्पष्टपणे मांडत आहेत. ज्यांच्यासाठी हा प्रश्न सोडवायचा तो समाजही फारसा जागृत होत नाही. पाण्याच्या प्रश्नासाठी आता न्यायालयातही जाण्याची भाषा लोक करु लागले आहेत. या प्रश्नामुळे माणसे एकमेकांपासून तुटून दूर जात आहेत. या गंभीर प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी गेल्या २-३ दशकांपासून राज्यात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविले जात आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावा त्यातील समस्या, सद्यस्थिती आणि भविष्य-कालीन उपाययोजना अगदी वास्तव स्वरूपात अभ्यासण्याचा प्रयत्न केला

आहे.

**पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाची प्रगती व वास्तव:**

विकसनशील देशामध्ये साधारणपणे १९७० ते १९८० च्या दशकात पाणलोट विकास प्रकल्पांची सुरुवात झाली. पाणलोट क्षेत्राच्या खालच्या भागातील नैसर्गिक साधन सामग्रीत वाढ करण्यासाठी आराखडे तयार करण्यात आले. पाणलोट क्षेत्रातील वरच्या भागातील जङ्गिनीचा व नैसर्गिक संपत्तीच्या ऱ्हासाच्या झळा खालच्या बाजूच्या सुविधांवर पसरल्यामुळे एकूणच पाणलोट विकासाचा प्रश्न ऐरणीवर आल्यामुळे १९७६ मध्ये जगात प्रथम इंडोनेशियाने राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी केली. ब्राझीलने मृदसंधारण कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी करुन त्याची १९८० मध्ये एकात्मिक मृद व जलसंधारण व्यवस्थापन कार्यक्रमाचे रुपांतर सूक्ष्म पाणलोट क्षेत्रात केले. भारतामध्ये १९९० नंतर मोठ्या प्रमाणात पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्यक्रम हाती घेण्यात आले. महाराष्ट्राचा विचार करता आज राज्यात एकूण ४४, १८५ पाणलोट आहेत. त्यापैकी ३४, १४३ पाणलोट हे कामे करण्यासाठी निवडण्यात आले होते. त्यापैकी केवळ २७, ०१६ पाणलोटाचे काम सुरु झाले असून त्यापैकी केवळ ११, ६२९ पाणलोटाची कामे पूर्णत्वास गेली आहेत. म्हणजेच प्रति हेक्टरी ४-६ हजार रुपये इतका खर्च पाणलोटावर झाला आहे. आजही १५, ३८७ पाणलोट अपूर्ण अवस्थेत आहेत. एकूण कमांड आणि येणे एरिया वगळता २४१ लाख हेक्टर जमीन एवढे मोठे पोटेंशिअल आहे. त्यापैकी १२८ हेक्टर उपचारीत आहे आणि ११५ लाख हेक्टर जमीन अजून अस्पृश्य अवस्थेत आहे.

महाराष्ट्र शासनाने आजपर्यंत पाणलोट विकासाच्या कार्यक्रमावर २,१६३ कोटी रु. तर केंद्र सरकारने १,५४० कोटी रु. खर्च केले आहेत. खर्चामध्ये रोजगार हमी योजनेचा सर्वात मोठा म्हणजे ४१,५८१ कोटी रु. एवढा हिस्सा आहे. गेल्या दोन दशकातील पाणलोट क्षेत्र विकास सरासरी खर्च विचारात घेतल्यास तो वार्षिक सरासरी ३२० कोटी रु. आहे. सरकारने गेल्या ६० वर्षात मोठ्या धरणांच्या बांधकामावर अधिक भर दिला. त्यातून राज्याला वीज उपलब्ध झाली. पण या धरणाच्या पाण्याखाली लाखो एकर सुपीक जमीन गेली आणि राज्याच्या काही भागातच हरित पट्टे तयार झाले. मोठ्या धरणांमुळे अपेक्षित सिंचनापैकी फक्त ३०% सिंचन होऊ लागले. धरणाचे व्यवस्थापन व त्यातील पर्याप्त पाणीसाठा याबाबतीत दुर्लक्ष झाल्यामुळे धरणांची साठवण क्षमता व पर्यायाने सिंचन क्षमता कमी होऊ लागली. एवढी मोठी धरणे बांधूनही राज्यात सद्यस्थितीत सिंचनाची टक्केवारी १७ च्या पुढे गेली नाही. पाणलोटाचा विकास करीत असताना भूस्तररचना आणि तांत्रिक बाबींकडे दूर्लक्ष झाल्यामुळे लहान बंधाऱ्यांचे जाळे निर्माण करता आले नाही. आपल्या शेजारील गुजरात राज्याने एकट्या सौराष्ट्रात १,१३,००० लहान बंधारे बांधले आहेत. राज्यात विविध योजनांच्या नावाखाली पाणलोट विकास कार्यक्रम सर्व जिल्ह्यात राबविला जात आहे. गेल्या काही वर्षात सलग दोन-तीन वर्ष दुष्काळ, एखाद्या वर्षी महापूर अशी परिस्थिती असताना भूपृष्ठावर पडणारे ६० ते ७०% पाणी अडवून ते भूगर्भात मुरविण्याची गरज असताना मान्सूनोत्तर वाहणाऱ्या पाण्याला

अडविण्याचा निरर्थक प्रयत्न राज्यात केला जात असल्याने नियोजन येथेच फसले.

महाराष्ट्रात कोट्यवधी रुपये खर्च करुन सुद्धा एकही पाणलोट क्षेत्र *पाणी अडवा पाणी जिरवा* या संकल्पनेनुसार पूर्ण झाला आहे असे म्हणता येत नाही. रोजगार हमी योजनेने लोकांना हक्काचा रोजगार दिला. पण त्यातून भरीव असे विकासाचे काम होईल हे स्वप्न स्वप्नच राहिले. या योजनेतून होणाऱ्या कामाला शास्त्रीय व व्यावहारिक बैठक देणे शक्य झाले नाही. निसर्गातून पावसाच्या स्वरूपात पडलेले सर्वच पाणी आपण जमिनीवर व जमिनीखाली साठवू शकत नाही. साधारणपणे राज्यात अशा साठवणिचा अंतिम आकडा २५% च्या पुढे जाणार नाही. निसर्ग जरी प्रतिकूल असला, पाणी साठविण्यास जरी मर्यादा असल्या तरी पाणी वापराचा विवेक जलव्यवस्थापनामध्ये अत्यंत महत्त्वाचा ठरतो. उपलब्ध पाण्याच्या आधारे कोणती पीक पद्धती असावी. कोणती सिंचन पद्धती अंगिकारावी, कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर करावा याबाबतीत अत्यंत काळजीपूर्वक काम करण्याची गरज आहे. महाराष्ट्रात आज सांगली जिल्ह्याचा पूर्व भाग ते उत्तर महाराष्ट्राच्या धुळे, नंदूरबारच्या टोकापर्यंत दुष्काळाचे दाट सावट पसरले आहे. खरीपाचे पीक हातचे गेले आहे. पिण्याचे पाणी व जनावरांसाठी वैरण याची टंचाई आहे. मराठवाडा व विदर्भातील बहुतांश धरणे ही कोरडी पडलेली आहेत. येणाऱ्या पावसाळ्यापर्यंत ही परिस्थिती अत्यंत गंभीर होण्याची शक्यता आहे. मात्र गंमत अशी आहे याच पर्जन्य छायेच्या पट्ट्यात राज्यातील जवळजवळ ९० ते ९५% ऊस शेती आहे. ऊसाला पाणी देण्याची पद्धत ही पाटाची आहे. ऊसाची दर एकरी उत्पादकता २५ टनापर्यंत घटली आहे. या पिकाला राजाश्रय मिळाला आहे. ऊसाचे अर्थशास्त्र पाहिले तर, आज शेतकरी १ हजार लिटर पाण्यातून ५ रु. एवढे उत्पन्न ऊसापासून मिळवत आहे. तर तेवढ्याच पाण्यातून तुरी सारख्या पिकापासून २५ रु. मिळू शकतात हे वैज्ञानिक सत्य शेतकऱ्याला कोण समजावून सांगणार ? शेतकरी ज्या पिकाला बाजारपेठ उपलब्ध आहे, रास्त भाव मिळतो अशाच पिकांच्या मागे लागतो. त्याचा परिणाम गेल्या दोन- तीन दशकात तेलबिया, डाळी, तृणधान्ये या पिकांना शेतकऱ्यांनी शेताबाहेर ठेवले आहे. ही बाब राज्याला न परवडणारी आहे. पिक पद्धतीतला योग्य बदल आणि आधुनिक सिंचन पद्धतीचा अंगीकार ही बाब दुष्काळी परिस्थितीत अत्यंत महत्त्वाची ठरते. दुसऱ्या बाजूला पडणाऱ्या पावसावर जरी मानवाचे नियंत्रण नसले तरी पडलेला पाऊस प्रामुख्याने जमिनीच्या खाली शक्य तेथे जमिनीच्यावर साठवून ठेवण्यामध्ये आपण कोणतीही कसर ठेवू नये. राज्यात गेल्या अनेक वर्षात सतत दुष्काळाचे आघात होऊन सुद्धा त्यातून मात करणारे पर्याय शोधले गेले नाहीत. पाणलोट क्षेत्र विकास कामासाठी तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि स्वतंत्र यंत्रणा उभारली नाही. सरकारने जलसंधारणाची कामे आणि रोजगार हमी योजनेची सांगड घालून कामातील गुणवत्ता हद्दपार करुन टाकली. जलसंधारणाची कामे पूर्ण होण्याचे गणित दुष्काळ पडण्याशी जोडले, जे प्रयत्न झाले ते अशास्त्रीय आणि अप्रामाणिक झाले. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचे वास्तव असे आहे की, शासनाच्या वेगवेगळ्या योजनेतून, वेगवेगळ्या विभागाकडून व वेगवेगळ्या बिगर शासकीय

संस्थाकडून पाणलोटाचे काम करण्यात येत आहे. एकाच पाणलोटात विविध योजना व काम यांची सरमिसळ होत आहे. मोठ्या प्रमाणात पैसा खर्च होत आहे. त्यातही अप्रामाणिकपणा कामावर मात करीत असल्यामुळे जलसंधारणाचा विकास होत नाही. झालेल्या कामांचे मूल्यांकन होत नाही. इतक्या वर्षात हजारो शेततळी निर्माण झाली. पण त्यातली प्रत्यक्षात किती वापरली जातात याकडे दुर्लक्ष केले जाते. सरकारने अलिकडे रोजगार हमी योजनेची किमान ५०% कामे ग्राम पंचायतीच्या माध्यमातूनच करण्याचे बंधन घातले आहे. राज्यातल्या ग्रामपंचायतींची सध्याची अवस्था अशी आहे की, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामसेवकाशिवाय दुसरी कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही. ग्रामसेवकाला पाणलोट व्यवस्थापनाचे ज्ञान नाही. स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना या क्षेत्रातील ज्ञान आहे पण त्यांचा आपापसात समन्वय नाही. अशा परिस्थितीत पाणलोट क्षेत्राचा विकास कसा होणार? राज्यात जल संधारणांच्या कामांची संख्यात्मक वाढ झाली मात्र गुणात्मक घसरण झाली. मोठा खर्च झाला, लोखोंच्या संख्येने छोटे बंधारे उभारले मात्र ही सर्व गळकी, पाणी वळविणारी आणि बाष्पीभवन करणारी भांडी झाली. योजनेची अंमलबजावणी व लक्षपूर्ती करण्याच्या नादात भूस्तरातील सच्छिद्र व अच्छिद्र भराची रचना न जाणताच भूजल पूनर्भरणेचे गणित मांडले गेले. मागे वळून पाहिले नाही, राज्याच्या विविध भागातील हवामान व पाण्याची उपलब्धता यावर आधारित सुसंगत अशी पीकरचना झाली नाही. सरकारने या संबंधी कमिट्या नेमल्या मात्र कमिट्यांच्या शिफारशींची अंमलबजावणी केली नाही. जलतज्ज्ञांच्या अभ्यासाचा व ज्ञानाचा वापर करुन घेतला नाही. अपुरे पाणी चुकीच्या पिकाला अशास्त्रीय पद्धतीने वापरले जाऊ लागल्यामुळे दुष्काळाची तीव्रता वाढू लागली. पर्जन्यमान कमी असणे या कारणावर बोट ठेवून इतर महत्त्वाच्या मानवनिर्मित कारणांकडे दुर्लक्ष करणे अत्यंत धोक्याचे आहे. राज्याचे धोरण सुद्धा याला खूप कारणीभूत आहे. नको त्या प्रदेशात नको त्या प्रक्रिया उद्योगाला मर्यादेपेक्षा जास्त प्रोत्साहन दिल्यामुळे अवर्षणप्रवण क्षेत्राचे प्रश्न वाढतच गेले.

महाराष्ट्रात गेल्या ४० वर्षात पाणी अडविण्याचे अनेक प्रयोग केले आहेत. हजारो नाल्यांवर किमान ५ ते ६ लाख बंधारे बांधले आहेत. यामध्ये पाझर तलाव, दगडी बंधारे, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, वसंत बंधारे यांचा समावेश होतो. मात्र यातील अनेक बंधारे पाणी साठविण्यासाठी कुचकामी ठरले आहेत. अनेक ठिकाणची कामे गेल्या २० वर्षापासून अपूर्ण अवस्थेत आहेत. या कामांचा संबंध रोजगार हमी योजनेशी जोडला गेल्याने ती पूर्ण होण्यासाठी दुष्काळ पडावा लागतो असेच म्हणावे लागेल. पण आता दुष्काळातही मजुरांची टंचाई जाणवत आहे. शेतकऱ्यांनाही कामासाठी मजूर मिळत नाहीत. याची फिकीर कोणालाही नाही. केंद्रानेही रोजगार हमी योजना स्वीकारली या बाबीचे फक्त आपण उदात्तीकरण करीत आहोत. दरवर्षी राज्याच्या तिजोरीत दोन ते तीन हजार कोटींचा निधी या कामासाठी उपलब्ध होतो. मात्र १९७२ ला स्वीकारलेली रोजगार हमी योजना परिस्थितीनुसार तिच्या स्वरुपात बदल करावा लागणार आहे. आज अभियंत्यांनाही लहान कामे

अप्रतिष्ठेची वाटतात. कृषी अधिकाऱ्यांना पीक, माती, अन्नद्रव्ये, पाण्याची गरज इतकेच शिकविले जाते. खडक त्यांना समजत नाही. ज्याला भूगर्भ समजतो अशा भूगर्भशास्त्रज्ञांना जमिनीच्या पोटात पाणी साठविण्याच्या उपक्रमात समाविष्ट करुन घेतले जात नाही. आज शासकीय खात्यात व प्रामुख्याने कृषी विभागात विशेषीकरण करुन अधिकाऱ्यांमध्ये कामांचे वाटप केले आहे. त्यानुसार काही पदांना स्वतंत्र नावे दिलेली आहेत. एखाद्या वेळेस जर जलव्यवस्थापन या विषयासंबंधी एखाद्या अधिकाऱ्यास सहकार्याविषयी स्वयंसेवी संस्था किंवा स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून विनंती केल्यास या विषयाशी माझा संबंध येत नाही अशी उत्तरे प्राप्त होतात म्हणजेच अधिकाऱ्यांची उदासिनताही दुष्काळाची तीव्रता वाढण्यास कारणीभूत आहे.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आदरणीय कै. यशवंतराव चव्हाण यांनी राज्याच्या विकासाकडे पहात असताना कृषी - औद्योगिक समाजरचना निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले. नंतरच्या काळात ग्रामीण भागात कृषी आधारित उद्योग स्थापन होऊ लागले यामध्ये मुख्यत्वे सहकारी साखर कारखानदारी, सूत गिरण्या, दुग्ध उद्योग वसविण्याचा प्रयत्न झाला. राज्यात ऊसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले. मात्र ऊसाला गुडघाभर पाणी लागते हे अशास्त्रीय तत्व ग्रामीण भागात विकसित झाल्यामुळे ऊसाला पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये स्पर्धा लागलेली दिसते. ऊसाचे पिक हे जीवनावश्यक बाबींसाठी सुद्धा लागणारे पाणी खरडून वापरते आणि त्या परिसरात पिण्याच्या पाण्यासाठी बाहेरुन टँकर आणावा लागतो. चुकीच्या सिंचनपद्धतीने वाढविलेला ऊस दुष्काळात वाळून जायला लागतो. हाच ऊस आज जनावरांच्या छावणीत वैरण म्हणून दिला जातो. दुर्दैवाने जास्त पाण्याच्या प्रदेशात आणि ऊस पट्ट्यात कमी पाण्यावर ऊस पिकविण्याची ठिबक सिंचन सारखी पद्धती वापरली जात नाही. जानेवारी महिन्यातच राज्यातील उजनी सारखी मोठी धरणे कोरडी पडली असल्याने दुसऱ्या धरणातील पाणी या धरणात सोडावे आणि लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या वैरणीचा प्रश्न सुटावा यासाठी शेतकरी व ग्रामस्थ रस्त्यावर येऊन आंदोलने करीत आहेत. ज्या भागात मोठ्या प्रमाणावर ऊस पिकविला जातो. तेथे ऊस तोडणी कामगार म्हणून येणारे शेतमजूर हे मुख्यत्वे राज्याच्या पूर्व भागातील म्हणजेच दुष्काळी भागातील आहेत. हे कामगार ज्या परिस्थितीत राहतात ती परस्थिती आणि मुंबईतील कारखान्यात काम करणारे कामगार ज्या आशिया खंडातील सर्वात मोठ्या गणल्याजाणाऱ्या धारावी झोपडपट्टीत राहतात तिथली परिस्थिती सारखीच आहे. राज्यातील साखर कारखान्यांचे राजकीयीकरण झाले आहे आणि शासनकर्ते उद्योगपती झालेले आहेत. दुष्काळी पट्टयात सुद्धा ऊसाच्या राजकारणाशिवाय दुसरे काही घडत नाही. महाराष्ट्रातील निम्म्याहून अधिक जमिनीचे क्षेत्र आणि २५% पेक्षा जास्त लोकसंख्या पाणलोट क्षेत्र विकासाशी संबंधित राहणार आहे. याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असताना दिसते. त्याबाबतीत राज्याच्या जलव्यवस्थापन नियोजन आराखड्यात कुठेही दखल घेतलेली दिसत नाही.

**उपाययोजना:**

महाराष्ट्र सरकारने भूजलाचा कायदा

अतिशय चांगल्या पद्धतीने केला आहे. दोष आहे तो त्याच्या अंमलबजावणीत. पाणलोटाच्या आजच्या कार्यक्रमात शास्त्रीय दृष्टीकोनाचा अभाव असल्याने दुष्काळावर मात करताना अडचणी निर्माण होत आहेत. थोर भारतीय अर्थतज्ज्ञ कौटिल्यानेही आपल्या अर्थशास्त्रीय विश्लेषणात या विषयी फार पूर्वी लेखन केले आहे. ज्या नैसर्गिक क्षेत्राची क्षमता पशुधन सांभाळण्याची आहे तेवढीच परवानगी द्यावी. ग्रामीण जीवनाचे नियम कौटिल्याने त्याच्या ग्रंथात दिले आहेत. या भागात किती पशुधन आहे तेवढाच चारा आपल्याकडे आहे की नाही, तो कसा सांभाळायचा, वाढवायचा याचे गणित त्याने मांडून दाखविले. कुठलीही नियमबद्ध व्यवस्था ही विस्कळित नसते. आपण लोकशाहीचा अर्थ विस्कळित केला आहे. राज्यातील सगळ्या पाणलोटांना एकाच निर्णयाने आणि एकाच नियमाने पैसे दिले जात आहेत ते चुकीचे आहे. वेगवेगळ्या जिल्ह्यात परिस्थितीनिहाय निधी देण्याची आवश्यकता आहे. स्थळ परत्वे खर्चाचा निकष लावला पाहिजे. आतापर्यंत राज्यातील पाणलोटातील उपचाराचे आयूर्मान ठरविले गेले नाही. म्हणजेच ज्या कामाचे आयूर्मान संपले आहे त्याला पूनर्जीवित करण्याची गरज आहे. मृद संधारणाला वैयक्तिक ॲक्टिविटी न समजता ती राष्ट्रीय संपत्ती समजून त्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. भविष्यात पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर होत जाणार आहे. त्यासाठी शासनाने अन्न सुरक्षेप्रमाणे पाणी सुरक्षेचा सुद्धा विचार केला पाहिजे. शेतकऱ्यांना शेतीचे पाणी आता लिटरमध्ये मोजायला शिकविले पाहिजे. तेथे वारंवार पिण्याच्या पाण्यासाठी टँकर वापरावा लागतो अशा गावांना अस्तरिकरण केलेल्या शेततळ्यांची योजना राबवायला भाग पाडून त्या गावातील जनावरांची व माणसांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागेल इतकी शेततळी उभी करायला लावली पाहिजेत. गावाजवळील पडिक क्षेत्र, वनक्षेत्रामध्ये संयुक्त व्यवस्थापन समित्यामार्फत चराईबंदी अथवा नियंत्रित चराई हा कार्यक्रम लोकसहभागाने राबविला पाहिजे. कुरणविकासाच्या कार्यक्रमाची आखणी करुन सर्व पाणलोटांच्या माथ्यावर कालबद्ध पध्दतीने, स्थानिक गरजांचा विचार करुन शाश्वत भूजलाची व्यवस्था केली पाहिजे. जास्त पैसा देणारी पिके घेतली पाहिजेत पण पाण्याचे व्यवस्थापन करणे जास्त गरजेचे आहे. ठिबक, तुषार यांचे संच स्वस्त झाले पाहिजेत. त्यांचा दर्जा राखला पाहिजे त्यांच्या देखभाल दुरुस्तीची किमान २ ते ३ वर्षांची जबाबदारी पुरवठादारावर सोपविली पाहिजे. सिंचन व्यवस्थापनामध्ये कृषी अभियंत्यांचा प्रकर्षाने समावेश व्हायला हवा. सिंचनावर मोठ्या प्रमाणात संशोधन व्हायला पाहिजे. पाण्याची उत्पादकता वाढविण्यासाठी सिंचनाच्या व शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. या तंत्रज्ञानाच्या पुरवठ्यासाठी शासनाने सुद्धा शक्य तितक्या प्रमाणात मदत केली पाहिजे. कोणताही शेतकरी शासनाला मोफत वीज किंवा पाणी मागत नाही तर त्यांचा पर्याप्त प्रमाणात पुरवठा व्हावा एवढीच अपेक्षा करतो. दुर्दैवाने राज्यात कृषी नियोजन, पाणी व्यवस्थापन, वीज पुरवठा यावर लक्ष केंद्रीत करण्याऐवजी मोफत आदानांच्या राजकारणावरच नेते समाधान मानत आहेत. लहान शेतकऱ्याला मोठे करण्याची गरज असताना मोठाच शेतकरी अधिक मोठा होत आहे.

पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर

करण्यावर ब्रिटिश सरकारनेसुद्धा जास्त भर दिला होता. स्वातंत्र्यपूर्व काळात फेमिन (दुष्काळ) कमिशनने सुद्धा शेतीला सिंचनाची जोड दिली पाहिजे, ती पावसावर आधारित ठेवणे म्हणजे जुगार खेळल्यासारखे आहे. जुगार खेळून कोणी कधीही श्रीमंत झालेला नाही आणि म्हणून मानवनिर्मित पाण्यातून शेतीला किमान संरक्षित पाण्याची जोड देणे हा दुष्काळावर कायमचा उपाय आहे. हे फेमिन (दुष्काळ) कमिशनने व्यक्त केलेले मत आजच्या परिस्थितीत विचारात घेणे गरजेचे वाटते.

आज सिंचनाची व्याख्या बदलण्याची गरज वाटत आहे. नजीकच्या काळात बारमाही सिंचनाऐवजी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने संरक्षित सिंचन हा शब्दप्रयोग अत्यंत महत्त्वाचा ठरणारा आहे. राज्यात पडणाऱ्या पावसाचे नियोजन करुन आणि महापुराचे नियंत्रण करुन राज्यातील सर्व खेड्यात अगदी मे महिन्यात सुद्धा ८ तास पाणी उपसल्यानंतर सिंचन विहिरीतील पाणी जमिनीपासून २५ फुटाच्या खाली जाणार नाही असे नियोजन करण्याची गरज आहे. आपल्याकडे मनुष्यबळ, भांडवल, बुद्धीमत्ता आणि पाणी याची कमतरता नाही. गरज आहे ती राजकीय इच्छाशक्तीची आणि पराकोटीच्या प्रामाणिकपणाची, राज्यात विजय बोराडे यांनी कडवंची व आडगांव या ठिकाणी तर पोपट पवार यांनी हिवरेबाजार येथे पिक पद्धतीची शिस्त पाळून पाणलोटाच्या कार्यक्रमाला नवी दिशा दिली आहे. पाण्याचा वापर कोणी, कसा, किती करुन कोणती पिके घ्यावीत यासंबंधी सामुहिक धोरणे ठरवून ती राबविण्याच्या दृष्टीने पावले टाकली आहेत. त्याला यशही मिळाले आहे. याचा आदर्श राज्याच्या इतर भागातही घेण्याची गरज आहे. पाणलोट क्षेत्र विकासासाठी भविष्यात शाळा व महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात पाणी व्यवस्थापनाचा समावेश करण्याची गरज आहे.

**संदर्भसूचीः**


१. *Irrigation Status Report*- Government of Maharashtra, 2007-2008
२. *विविध वार्षिक अहवाल*, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन
३. *Economic Survey of Maharashtra*, Various Issues.
४. डॉ.घाटगे व डॉ. वावरे, *भारतीय अर्थव्यवस्था*, निराली प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती, जुलै १०.
५. *सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था*, संपादक डॉ. जे. एफ. पाटील, सकाळ पेपर प्रकाशन, मे. २०१०.
६. दै. सकाळ, दै. लोकमत व दै. लोकसत्ता विविध अंक.

# कांदा बीज निर्यातीतून आर्थिक विकास

**कृष्णा शंकर शहाणे, नाशिक,**
अर्थशास्त्र विभाग,
बी.वाय.के.(सिन्नर) कॉलेज ऑफ कॉमर्स,
भ्रमणध्वनी - ९८५०७४८४८१

भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीप्रधान आहे. शेतीतील एक अतिशय महत्त्वाचे पीक म्हणजे कांदा होय. भारतातील सर्वाधिक कांदा उत्पादन हे महाराष्ट्रात होते आणि महाराष्ट्रातील सर्वाधिक कांदा उत्पादन हे नाशिक जिल्ह्यात होते. या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्हा, महाराष्ट्र आणि भारतासाठी देखील नाशिकचा कांदा हा अतिशय महत्त्वाचा आहे. एवढेच नव्हे तर कांदा ही नाशिकची एक महत्त्वाची ओळखच आहे.

कांदा या पिकाचे मूळ स्थान इराण आणि त्याच्या आसपासच्या प्रदेशात आहे. कांद्याच्या भारतातील आजच्या व्यापक उत्पादनाला एक ऐतिहासिक परंपरा आहे. कांद्याची लागवड भारतात पुरातन काळापासून होत आहे. अमेरिका, इजिप्त, जपान, ब्राझील, स्पेन, पाकिस्तान या देशांमध्ये विशेषत्वाने कांदा लागवड केली जाते. महाराष्ट्राचा विचार करता कांद्याची लागवड पावसाळी, हिवाळी व उन्हाळी हंगामामध्ये होते.

जागतिक पातळीवर उष्ण कटिबंधामध्ये कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणावर होते. अतिशय उष्ण व अतिशीत हवामानात कांद्याची वाढ चांगल्या प्रकारे होत नाही, तर समुद्रसपाटीपासून १५०० मीटर उंचीवरील सर्व प्रदेशात कांदा लागवड होते. कांदा उत्पादनासाठी मध्यम प्रकारची व पाण्याचा निचरा होणारी जमीन योग्य समजली जाते. काळ्या, चिकणयुक्त व अतिशय हलक्या जमिनीत कांद्याची वाढ होत नाही.

भारतातील कांदा निर्यातीत महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. भारतीय कांदा निर्यात आज मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्याप्रमाणेच भारतातून होणारी कांदाबीज निर्यात देखील चांगल्या प्रकारे वाढत आहे. कांदाबीज निर्मिती ही शेतकऱ्यांनी स्वत:च्या गरजेपुरती न करता मोठ्या प्रमाणावर किंवा व्यापारी तत्त्वावर

केल्यास आणि कांदाबीज निर्यातीकडे विशेष लक्ष दिल्यास शेतकऱ्यांना मिळणाऱ्या उत्पन्नात तर वाढ होईलच पण देशाला होणारी परकीय चलनाच्या प्राप्तीतही भर पडेल त्याने देशाचा आर्थिक विकास होऊन आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा वाढण्यास मदत होईल. अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

१) कांदाबीज निर्यातीत झालेली वाढ अभ्यासणे.

२) कांदाबीज निर्यातीपासून मिळालेल्या परकीय चलनात झालेली वाढ अभ्यासणे.

३) भारतीय कांदाबीज निर्यातीची दिशा अभ्यासणे.

अभ्यास पद्धती:

गेल्या काही वर्षात भारतातून झालेल्या कांदा, बीज निर्यात, त्यापासून प्राप्त झालेले परकीय चलन, या निर्यातीची दिशा या घटकांचा अभ्यास करण्यासाठी द्वितीय सामुग्रीचा वापर करण्यात आला. सदर अभ्यास हा १९९९ - २००० ते २०१२-२०१३ या कालावधीतील उपलब्ध असणाऱ्या द्वितीय सामुग्रीवर आधारित आहे. हा अभ्यास या कालावधीत भारतातून झालेल्या कांदा बीज निर्यातीवर आधारित आहे.

कांदा हे कंदवर्गीय भाजीपाला प्रकारातील एक महत्त्वाचे पीक आहे. कांदा उत्पादनात भारत जगातील क्रमांक दोनचे राष्ट्र आहे. भारतातील कांदा उत्पादनात महाराष्ट्र क्रमांक एकचे राज्य आहे. भारतातून विविध देशांकडे होणारी कांदा निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. अलिकडील कालावधीत कांदा या पिकाबरोबरच कांदा बीज उत्पादन व कांदा बीज निर्यात यातही मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे.

आज भारतातील कांदा जगभरात मोठ्या प्रमाणावर निर्यात होतो. भारतातील कांदा निर्यातीत महाराष्ट्राचा हिस्सा ७० टक्क्यांच्या आसपास असतो. म्हणजेच महाराष्ट्राचा कांदा भारतीय कांदा निर्यातीत विशेष महत्त्वाचा आहे. भारतातील कांदा जगभरात मोठ्या प्रमाणावर निर्यात होतो. तसेच भारतातील कांदा बियाणे देखील जगातील विविध देशांच्या पसंतीस उतरत आहे. भारतातील कांदा बियाण्याची निर्यात अलिकडील काळात वाढत आहे. या पार्श्वभूमीवर कांदा बीजोत्पादन, कांदा बीज निर्यात याला विशेष महत्त्व प्राप्त होते.

कांदा बीजोत्पादन:

कांद्याचे अधिकाधिक हेक्टरी उत्पादन मिळवण्यासाठी सुधारित जातीचे बियाणे वापरणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडून बरेचदा गावातच किंवा स्वत: घरी दोन-चार वर्षापूर्वी तयार केलेले कांदा बियाणे खरेदी केले जाते किंवा वापरले जाते. बियाणे जुने वापरले की त्याचा पिकाच्या उगवण क्षमेतवर विपरित परिणाम होतो. शेतकऱ्यांनी कांदा बिज निर्मिती देखील व्यापारी तत्त्वावर करणे आवश्यक आहे. काही शेतकरी अशी कांदा बियाण्याची निर्मिती व्यापारी तत्त्वावर करतातही पण अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते.

सर्वसाधारणपणे जमिनीची सुपिकता, पाण्याची पुरेशी व वेळेवर उपलब्धता, सुधारित जातीचे उत्तम बेणे आणि इतर आवश्यक साधने या सर्वांची चांगली तसेच योग्य वेळी उपलब्धता झाल्यास उत्तम दर्जाचे कांदा बियाणे निर्माण होऊ शकते. कांदा बिजोत्पादनात अतिशय महत्त्वाचा घटक म्हणजे मातृकंदाची निवड हा होय. तयार होणाऱ्या बियाण्याची शुद्धता आणि दर्जा मातृकंदाच्या निवडीवर व क्षमतेवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते. यासाठी मातृकंदाच्या

निवडीच्या वेळी विशेष काळजी घ्यावी लागते. मातृकंदाचा आकार व रंग योग्य असावा, अतिमोठे व अतिलहान कांदे टाळावेत. चापट, जाड मानेचे, जोडकांदे टाळावेत. काजळी, कोंब आलेले, सडलेले कांदे वापरू नयेत. कांदा काढणीनंतर चांगला सुकविलेला आणि त्यानंतर विश्रांती मिळालेला कांदा मातृकंद म्हणून वापरावा. कांदा बीजोत्पादन होतांना रोप कायम जागी ठेवून जमिनीतून न काढता तसेच कांदे लावून बिजोत्पादन अशा दोन पद्धतींनी बिजोत्पादन घेतले जाते. त्यात कांदे लावून बिजोत्पादन ही पद्धती मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. तसेच एका वर्षात कांदा आणि बिजोत्पादन ही प्रक्रिया पूर्ण केली जाते आणि दुसऱ्या पद्धतीत ही प्रक्रिया दोन वर्षात पूर्ण केली जाते. त्याला द्विवर्षायू पद्धत असे म्हणतात. या दोन्ही पद्धतीतून चांगली कांदा बीज निर्मिती होण्यासाठी कांद्याची जात, आकारमान, वजन, हवामान, जमीन, खते, मशागत, पिकाची काळजी या घटकांचा मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो. या बरोबरच पिकाच्या आयुष्य काळातील पिकाची काळजी महत्त्वाची आहे. विविध रोगांचे नियंत्रण तणांचा बंदोबस्त, कीड नियंत्रण तसेच योग्य वेळी बियाण्याची काढणी करणे आवश्यक आहे. साधारणपणे बियाणे काळसर स्वरूपाचे दिसू लागल्यावर काढणी केली जाते. बियाण्याच्या काढणी नंतरचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे स्वच्छ व

तक्ता क्र.१

कांदाबीज निर्यात

| अ.क्र. | वर्ष | कांदाबीज निर्यात (किलोग्रॅम) | मिळालेली किंमत (लक्ष रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | १४७८७५ | ५६.६० |
| २ | २०००-२००१ | ५४८३३३ | १६१.४१ |
| ३ | २००१-२००२ | १८७३२३ | ११३.८४ |
| ४ | २००२-२००३ | ४१६०१ | ४.३८ |
| ५ | २००३-२००४ | ११२९९९ | १३७.४५ |
| ६ | २००४-२००५ | १३८०५० | २०१.७६ |
| ७ | २००५-२००६ | २६५९२० | ३०६.६३ |
| ८ | २००६-२००७ | ४८६९०४ | ४४६.३८ |
| ९ | २००७-२००८ | ५७८७६३ | ८८०.५३ |
| १० | २००८-२००९ | ३९४९११ | ६७५.७६ |
| ११ | २००९-२०१० | ३७७३१६ | ६७९.०५ |
| १२ | २०१०-२०११ | ४५४९७६ | १२७४.५९ |
| १३ | २०११-२०१२ | ७४६३२७ | १२६३.८० |
| १४ | २०१२-२०१३ | ४६१०६१ | ९६१.५५ |

अस्वच्छ बियाणे वेगळे करणे, बियाण्यांची काळजी घेणे, त्याची योग्य त्या प्रकारे साठवणूक करणे, पॅकिंग करणे आणि ठराविक कालावधीच्या आत त्याचा वापर करणे. अशी बियाणे स्वत: वापरण्याबरोबरच त्याची विक्री करता येते, निर्यात देखील करता येते. येथे केवळ स्वत:च्या वापरापुरते कांदा बियाणे निर्मिती करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर न ठेवता विक्री आणि निर्यातीचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवल्यास शेतकरी आणि देशाच्या आर्थिक विकासास मोठ्या प्रमाणावर हातभार लागण्यास मदत होईल.

### कांदा बीज निर्यात:

भारतातून होणारी कांदा बीज निर्यात विचारात घेता भारताला त्यापासून आजतागायत मोठ्या प्रमाणावर परकीय चलन प्राप्त झाले आहे. तक्ता क्र.१ मध्ये भारतातून झालेली कांदाबीज निर्यात व त्यापासून प्राप्त झालेले परकीय चलन यांची आकडेवारी दर्शविलेली आहे. १९९९ - २००० मध्ये भारतातील कांदा बीज निर्यात १४७८७५ किलोग्रॅम होती. त्यापासून ५६.६० लक्ष रुपयांचे परकीय चलन भारताला प्राप्त झाले होते. तर २०१२-२०१३ या वर्षात ४६१०६१ किलोग्रॅम कांदा निर्यात भारतातून झाली. त्यापासून ९६१.५५ लक्ष रुपयांच्या परकीय चलनाची प्राप्ती देशाला झाली.

१९९९-२००० ते २०१२-२०१३ या कालावधीचा विचार करता कांदाबीज निर्यात आणि त्यापासून मिळालेल्या परकीय चलनाच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे लक्षात येते.

तक्ता क्र.२

भारताच्या कांदाबीज निर्यातीची रचना (२०१२-१३)

| अ.क्र. | देश | कांदाबीज निर्यात (किलोग्रॅम) | मिळालेली किंमत (लक्ष रुपये) |
|---|---|---|---|
| १ | पाकिस्तान | ३०२३१०(६५.५७) | ३९६.४७(४१.२३) |
| २ | नेदरलँड | ७२३१३(१५.६८) | ३११.७७(३२.४३) |
| ३ | केनिया | ५७१३२(१२.३९) | १९०.१०(१९.७६) |
| ४ | श्रीलंका | ९६१२(२.०८) | २५.५८(२.६६) |
| ५ | इटली | ५०००(१.०९) | १७.९२(१.८६) |
| ६ | बांगलादेश | १००००(२.१७) | ११.७८(१.२३) |
| ७ | युक्रेन | २०००(०.४३) | २.३१(०.२४) |
| ८ | नायजेरिया | १४०(००.०३) | २.०७(०.२२) |
| ९ | इथिओपिया | ४००(०.०९) | १.९८(०.२१) |
| १० | नेपाळ | २१५५(०.४७) | १.५७(०.१६) |
| | एकूण | ४६१०६१(१००.००) | ९६१.५५(१००.००) |

*टीप: कंसातील आकडेवारी एकुणाशी शेकडा प्रमाण दर्शवितात.*

भारतातून होणाऱ्या कांदा बीज निर्यातीचा विचार करता सर्वाधिक कांदा बीज निर्यात ही पाकिस्तानकडे होत असल्याचे लक्षात येते.

तक्ता क्र.२ मध्ये भारतातून झालेल्या कांदाबीज निर्यातीची रचना दर्शविलेली आहे. इ.स. २०१२-२०१३ या वर्षात भारतातून ४६१०६१ कि.ग्रॅम. कांदा बीज निर्यात झाली त्यापासून सरकारला ९६१.५५ लक्ष रुपयांचे परकीय चलन मिळाले. त्यात एकूण कांदा बीज निर्यातीपैकी सर्वाधिक म्हणजेच ६५.५७ टक्के निर्यात ही पाकिस्तानकडे झालेली दिसून येते. त्या खालोखाल नेदरलँड (१५.६८ टक्के), केनिया (१२.३९ टक्के), बांग्लादेश (२.१७ टक्के), श्रीलंका (२.०८ टक्के), इटली (१.०९ टक्के), नेपाळ (०.४७ टक्के), युक्रेन (०.४३ टक्के), इथिओपिया (०.०९ टक्के), नायजेरिया (०.०३ टक्के) या देशांचा क्रम लागतो. म्हणजेच भारतातून होणाऱ्या कांदा बीज निर्यातीचा देशपरत्वे विचार करता जगातील विविध देशांकडे भारतातील कांदा बियाणे निर्यात होत असल्याचे दिसून येते.

**समारोप:**

गेल्या काही वर्षापूर्वीपर्यंत भारताची कांदा बीज निर्यात इजिप्त, इंग्लंड, पाकिस्तान, यु.ए.ई. या देशांकडे होत होती. अलिकडील काळात या देशांबरोबरच केनिया, इटली, बांग्लादेश, श्रीलंका, नेदरलँड या देशांकडेही ही निर्यात होऊ लागली आहे. एकूणच कांदा बीज निर्मिती प्रक्रियेकडे खास लक्ष दिल्यास कांदा बीज निर्मिती, विक्री, निर्यात या गोष्टींमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होईल. तसेच निर्यातीत वाढ झाल्यामुळे देशाला होणाऱ्या बहुमूल्य अशा परकीय चलनाच्या प्राप्तीत वाढ होईल आणि देशाची अर्थव्यवस्था बलशाली होण्यास हातभार लागेल.

**संदर्भ सूची:**


१. Export Statistics for APEDA
२. जोशी लक्ष्मणशास्त्री, संपादक, *मराठी विश्वकोश खंड-३*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६, पृ.५४७.
३. दत्त गौरव, महाजन अश्विनी, *इंडियन इकॉनॉमी*, २०१०, एस. चांद पब्लिकेशन्स, दिल्ली, पृ.४९८.
४. थोरात राहूल, *कृषि पणन मित्र*, एप्रिल २०१५, पृ.१६.
५. बाचार संदेश, *कृषि पणन मित्र*, फेब्रु.२००९, पृ.३५.
६. देशमुख के., *कृषि पणन मित्र*, नोव्हेंबर २०१०, पृ.४१.

# विशेष आर्थिक क्षेत्र आणि निर्यात वृध्दी

सुनिल लक्ष्मण मेढे, जाफ्राबाद,
उपप्राचार्य,
सिध्दार्थ महाविद्यालय,
जिल्हा जालना.
भ्रमणध्वनी: ९४२३४५९२४६

विशेष आर्थिक क्षेत्र ही संकल्पना म्हणजे भारतात अलिकडच्या कालखंडात बऱ्याच प्रमाणात चर्चीला जाणारा विषय आहे. देशाच्या अनेक भागात ह्या क्षेत्राच्या विरोधातील शेतकऱ्यांच्या असंतोषाची आग अजूनही धगधगते आहे. एका बाजुला सरकार बड्या उद्योगपतींनी विशेष आर्थिक क्षेत्र स्थापना केल्यामुळे देशाच्या भरभराटीची स्वप्न बघत आहे, तर याउलट शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांचा या संकल्पनेला तीव्र विरोध आहे. म्हणूनच विशेष आर्थिक क्षेत्र (Special Economic Zone) या धोरणाचा सखोल अभ्यास व त्याच्या बऱ्या-वाईट परिणामांची चर्चा होणे गरजेचे आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये विशेष आर्थिक क्षेत्राबाबत चर्चा करीत असताना पुढील उद्दिष्ट्ये समोर ठेवण्यात आली आहेत.

१. विशेष आर्थिक क्षेत्र या संकल्पनेचा विकास कसा झाला आहे हे अभ्यासणे.
२. विशेष आर्थिक क्षेत्र स्थापनेची उद्दिष्ट्ये कोणती होती त्याचा अभ्यास करणे.
३. विशेष आर्थिक क्षेत्राची वैशिष्ट्ये व मिळणाऱ्या सोयी सवलतींचा अभ्यास करणे.
४. भारतातील विशेष आर्थिक क्षेत्राची कामगिरी व प्रगती अभ्यासणे.
५. विशेष आर्थिक क्षेत्राचे निर्यातवृध्दीमधील योगदान अभ्यासणे.

भारताच्या विविध भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढलेले दिसून येत आहे. औद्योगिक विकासाचा वेग कमी असल्यामुळे देशातील बेकारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. आजही जवळपास ५२ टक्के लोकांची रोजीरोटी शेती व्यवसायावर अवलंबून आहे. विशेष आर्थिक क्षेत्रामुळे भारतात रोजगार वाढ झालेली आहे. मुख्यतः भारताच्या निर्यात वृध्दीमध्ये विशेष आर्थिक क्षेत्राचा महत्वपुर्ण वाटा उचलल्याचे दिसून येते.

## विशेष आर्थिक क्षेत्राच्या संकल्पनेचा विकासः

विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे एक असा भूभाग किंवा एखाद्या किंवा अनेक वस्तुंचे उत्पादन करणारा औद्योगिक पट्टा असतो की, जो देशातील इतर औद्योगिक वसाहतींपेक्षा संपूर्णपणे वेगळा असतो. ज्या भूभागाला देशाच्या इतर

औद्योगिक वसाहतीत कोणतेही कायदे लागू नसतात. देशांतर्गतच परंतु इतर औद्योगिक वसाहतीपेक्षा स्वतंत्र लागू असणाऱ्या अनेक सोयी सवलती ज्यात दिल्या जातात, असा एक तुटक औद्योगिक पट्टा असतो.

जागतिक पातळीवर विशेष आर्थिक क्षेत्र या संकल्पनेचा विचार केला तर असे दिसून येते की, जागतिक महामंदीच्या पार्श्वभूमीवर स्पेन या देशात १९२९ साली देशाच्या निर्यातीत वाढ करण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्राची निर्मिती केली जावी हा विचार रुजला व त्यानुसार विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्यात आले. त्यानंतर आयर्लंडमध्ये १९५९ साली निर्यात प्रक्रिया क्षेत्राची स्थापना करण्यात आली, परंतु १९६० नंतर जागतिक बँक व आतंरराष्ट्रीय नाणेनिधीने जगातील विविध अप्रगत राष्ट्रात प्रवेश मिळविण्यासाठी ह्या संकल्पनेचा वापर केला. प्रामुख्याने तैवान, सिंगापुर, मलेशिया, हाँगकाँग या देशात स्वतःच्या राष्ट्राचा आर्थिक विकास करण्यासाठी प्रगत राष्ट्रातील गुंतवणूक आकर्षित व्हावी म्हणून परकीय उद्योगपतींना किंवा उद्योगधंद्यांना विविध कर सवलती देण्यावर भर दिला गेला. त्यामुळे साठच्या शतकात संपूर्ण जगभरात विशेष आर्थिक क्षेत्रांची संख्या ४७ देशात १९८० च्या मध्यात १७६ इतकी निर्मिती करण्यात आली. यात प्रामुख्याने चीन या देशाचा मोठा वाटा होता. चीनमध्ये डेंग झाओपिंग यांनी शेन झेन येथे हजारो एकर जमिनीवर निर्माण केलेल्या One Time Fishing Zone चा आवर्जुन उल्लेख केला पाहिजे.

भारताच्या संदर्भात विचार केल्यास या प्रकारच्या नव्या स्वरुपातील विशेष आर्थिक क्षेत्राप्रमाणेच निर्यातवृध्दी क्षेत्राची स्थापना वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आली होती. उदा.१९६५ साली कांडला, १९७३ साली सांताक्रूझ, १९८० नंतर उत्तर प्रदेशातील नोएडा, पश्चिम बंगालमधील फालटा, केरळमधील कोचीन, तामीळनाडू राज्यात चेन्नई,आंध्र प्रदेशातील विशाखापट्टनम् तसेच गुजरातमधील सुरत येथे निर्यात प्रक्रिया किंवा निर्यातवृध्दी क्षेत्राची स्थापना करण्यात आली होती, परंतु या क्षेत्रात असणाऱ्या उद्योगांवर अनेक प्रकारची बंधने होती. आजच्या धोरणातील मुक्तपणा तेथे नव्हता. त्यामुळे उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जसजसा आंतरराष्ट्रीय संस्थाचा तसेच देशातील उद्योगपतींचा दबाव सरकारवर वाढत गेला तसतसा निर्यात वाढीसाठी निर्बंध मुक्त करविषयक विविध सोई-सवलती देणाऱ्या धोरणांची सरकारला गरज वाटू लागली व यामुळे आधुनिक स्वरुपातील विशेष आर्थिक क्षेत्राचे धोरण उदयास आले.

भारतात विशेष आर्थिक क्षेत्रातील धोरणाची खरी सुरुवात १९९७ ते २००२ या कालावधीमध्ये झाली. या कालावधीमध्ये कमलनाथ हे उद्योगमंत्री असतांना त्यांनी जे आयात निर्यात धोरण जाहीर केले त्यात ०१ एप्रिल २००५ पासून विशेष आर्थिक क्षेत्रांची स्थापना करण्यासाठी एक नवीन योजना सुरु करण्यात येईल असे जाहीर केले. त्यानुसार ९ मे २००५ रोजी संसदेत एक बील मांडण्यात आले व १० मे २००५ ला संसदेची या बिलाला मंजुरी मिळाली. त्यानंतर ह्या बिलाचे कायद्यात रुपांतर झाले. या कायद्याप्रमाणे देशाच्या वेगवेगळ्या भागातील शेतजमिनीची कवडीमोल भावाने विक्री करुन

भांडवलदारांच्या घशात हजारो एकर जमिनीची मालकी घालण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला. या धोरणानुसार पुर्वी अस्तित्वात असलेले कांडला, सांताक्रुझ, कोचीन व सुरत येथील निर्यात वृध्दीक्षेत्र १ नोव्हेंबर २००० पासून विशेष आर्थिक क्षेत्रात रुपांतरित करण्यात आले. या प्रकारे देशात वेगवेगळ्या महत्वाच्या व मोठमोठ्या शहरात आणि आसपासच्या जमिनी गिळंकृत करण्याचा मार्ग मोकळा झाला.

**विशेष आर्थिक क्षेत्र स्थापनेची उद्दिष्ट्ये:**

कमलनाथ यांनी मे २००५ ला विशेष आर्थिक क्षेत्रासंदर्भात जे बील मांडले त्या बाबतीत पुढील उद्दिष्ट्ये समोर ठेवली होती:

१. देशातील वेगवेगळ्या वस्तू व सेवांच्या निर्यातीत वाढ करणे.

२. परकीय गुंतवणूकमोठ्या प्रमाणात आकर्षित करणे, तसेच देशांतर्गत खाजगी गुंतवणुकीस वेगवेगळ्या सोयी-सवलती देऊन प्रोत्साहन देणे.

३. सार्वजनिक व खाजगी गुंतवणूकदार यांच्या संयुक्त प्रकल्पाद्वारे जागतिक दर्जाच्या मूलभूत सोयी-सुविधा देशाच्या वेगवेगळ्या भागात विकसित करणे.

४. वरील सर्व प्रयत्नाद्वारे रोजगारात वाढ करणे.

**विशेष आर्थिक क्षेत्राची वैशिष्ट्ये :**

२००५ च्या कायद्यातील तरतुदीनुसार विशेष आर्थिक क्षेत्राची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१. विशेष आर्थिक क्षेत्राचा विकास खाजगी उद्योगपती, सरकार किंवा राज्य सरकार यांना करता येतो.

२. विशेष आर्थिक क्षेत्राची स्थापना किंवा विकास करतांना त्याचे क्षेत्र कमीत कमी १००० हेक्टर्स राहील अशी तरतूद करण्यात आली आहे. परंतु एकच विशेष क्षेत्र विविध प्रकारच्या वस्तुंचे उत्पादन करत असेल तर त्यासाठी देशाच्या उत्तरपूर्व भागातील राज्यांसाठी उदा. आसाम, मेघालय, नागालँड तसेच जम्मू-काश्मिर, हिमाचल प्रदेश व उत्तरांचल या प्रदेशात जमिनीच्या क्षेत्रफळाची मर्यादा २०० हेक्टर इतकी ठेवण्यात आली आहे. बंदराच्या भागासाठी १०० हेक्टर मर्यादा आहे.

३. विशेष आर्थिक क्षेत्रातील उद्योग, विकासक यांना उद्योगाची स्थापना करणे सोयीचे व्हावे म्हणून या क्षेत्रासाठी एक खिडकी योजना आखण्यात आली आहे. जिथे एकाच ठिकाणाहून सर्व प्रकारच्या कागदपत्रांची पूर्तता किंवा सोयी सुविधा पुरवल्या जातात.

४. विशेष आर्थिक क्षेत्रात एखाद्या परकीय उद्योगपतीस आपला उद्योग सुरु करावयाचा असेल तर अशा प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या प्रकल्पांना १०० टक्के गुंतवणुकीस आपोआप मान्यता मिळेल. तसेच या विशेष आर्थिक क्षेत्रातील उत्पादनाच्या विविध प्रकिया करण्यासाठी परदेशातही उपकरार करायला पूर्ण स्वातंत्र्य असेल. या क्षेत्रातील उत्पादनासाठी देशांतर्गत होणाऱ्या व्यापार व्यवहारास निर्यात म्हणून मान्यता देण्यात येईल व त्या सवलतीसाठी हा व्यवहार पात्र राहील व यासाठी द्यावा लागलेला केंद्रीय कराचा परतावा दिला जाईल.

५. देशांतर्गत बाजारपेठेतून विशेष आर्थिक क्षेत्रातील उद्योगांसाठी जर भांडवली वस्तुंची खरेदी करण्यात आली किंवा कच्च्या मालाची खरेदी केल्यास केंद्रीय अबकारी करातून पूर्ण सूट दिली

जाते.

६. विशेष आर्थिक क्षेत्रातील उद्योगास तसेच उद्योजकास करातून पूर्णपणे सवलत देण्यात येते. या विशेष आर्थिक क्षेत्रातील उद्योगास पाच वर्षापर्यंत करातून शंभर टक्के सूट देण्यात येते, व त्यानंतरच्या पाच वर्षासाठी ५० टक्के कर सवलत देण्यात येते, तसेच उद्योगातून मिळणारा नफा पुन्हा त्याच उद्योगात गुंतवल्यास त्या गुंतवणुकीच्या ५० टक्के रकमेवर सूट देण्यात येते.

७. विशेष आर्थिक क्षेत्रातील जमिनीच्या विकासकास मिळणारे १०० टक्के उत्पन्न करमुक्त असेल. १० वर्षासाठी ते जास्तीत जास्त १५ वर्षाच्या ब्लॉकसाठी ते असेल.

८. प्रत्येक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी एक स्वतंत्र अधिकार मंडळ स्थापन करण्यात येऊन हे मंडळ या विशेष क्षेत्रातील उद्योगांना व्यवस्थापकीय स्वायत्तता प्रदान करेल तसेच विशेष अधिकारासाठी विशेष न्यायालयाची स्थापना करुन त्या क्षेत्रातील गुन्ह्याची प्रकरणे हाताळली जातील.

९. या क्षेत्रातून निर्यात केल्या जाणाऱ्या एकूण रकमेच्या मिळणाऱ्या ५ टक्के रक्कमेवर सूट मिळणार आहे. तसेच आतापर्यंत देशातील लघुउद्योगासाठी राखीव म्हणून ठेवण्यात आलेल्या वस्तुंचे उत्पादन करण्यास परकीय गुंतवणुकीत मुभा देण्यात आली असून या गुंतवणुकीवर कोणत्याही प्रकारच्या मर्यादा राहणार नाहीत. तसेच तोटा भरुन काढण्याची मुभा राहील. या क्षेत्रातील उद्योगांना बोनसच्या कायद्यातून तसेच न्यूनतम पर्यायी कर, केंद्रीय विक्रीकर, संप कामाचे तासाचे बंधन, किमान वेतन यापासून सुटका करण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे भारतात स्थापना केल्या जाणाऱ्या विशेष आर्थिक क्षेत्राची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

### भारतातील विशेष आर्थिक क्षेत्राची कामगिरी व प्रगती :

केंद्र व राज्य सरकारने निर्यात वृध्दी व रोजगार वृध्दी यासाठी विशेष आर्थिक क्षेत्राची जी सुरुवात केली त्याच्या कामगिरीचा किंवा झालेल्या प्रगतीचा थोडक्यात आढावा घेतला तर पुढील माहिती समोर येईल. सुरुवातीस देशातील विशेष आर्थिक क्षेत्रांची संख्या एकूण ११ इतकी होती त्यानंतर मार्च २००५ पर्यंत देशाच्या वेगवेगळ्या भागात ५३ विशेष आर्थिक क्षेत्राची निर्मिती करण्यात आली, त्यानंतर १ मार्च २००६ पर्यंत ११७ विशेष आर्थिक क्षेत्रांना परवानगी देण्यात आली होती. जुलै २०१५ पर्यंत भारतात एकूण ४१६ विशेष आर्थिक क्षेत्रांना मान्यता देण्यात आली होती त्यापैकी ३३ इतक्या विशेष आर्थिक क्षेत्रांना तत्वतः मान्यता देण्यात आली होती, मान्यता मिळालेल्या विशेष आर्थिक क्षेत्राचा राज्यनिहाय अभ्यास केला तर असे दिसून येते की, देशात सर्वात जास्त कर्नाटक व महाराष्ट्र या दोन राज्यांत सर्वात जास्त विशेष आर्थिक क्षेत्रांना मान्यता दिली गेली आहे. ती म्हणजे कर्नाटकमध्ये ६० इतक्या विशेष आर्थिक क्षेत्रांना मंजुरी दिली असुन महाराष्ट्रामध्ये ६० इतक्या विशेष आर्थिक क्षेत्रांना मंजुरी आहे परंतु त्यापैकी ९ इतक्या विशेष आर्थिक क्षेत्रास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. यानंतर तेलंगना राज्याचा क्रमांक लागतो या राज्यात एकुण ४८ इतक्या विशेष आर्थिक क्षेत्रांना मान्यता दिली गेली आहे.

तर गुजरात राज्यात ३२ इतक्या विशेष आर्थिक क्षेत्रांना मान्यता देण्यात आली आहे. तसेच केरळ राज्यात सुध्दा ३२ इतक्या विशेष आर्थिक क्षेत्रांचा मान्यता देण्यात आली आहे. तर सर्वात कमी विशेष आर्थिक क्षेत्रांची मान्यता असलेले राज्य म्हणजे अनुक्रमे पाँडिचेरी १, मणिपुर १, झारखंड १, छत्तीसगढ २, दिल्ली २ असे आहेत.

भारतातील क्षेत्रनिहाय मान्यता असलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांचा विचार केला तर सर्वात जास्त संख्येची मान्यता असलेले पहिले पाच क्षेत्र म्हणजे अनुक्रमे आयटीक्षेत्र २५६, बायटेक्नोलॉजी २३, मल्टी प्रॉडक्ट २० फार्मास्युटीकल्स किंवा केमीकल्स १७ व इंजिनियरींग क्षेत्रात १५ असे आहेत. तर सर्वात कमी, संख्येची मान्यता असलेले पाच क्षेत्र अनुक्रमे ऑटो १, ऑटोमोटीव्ह कम्पोनन्ट्स १, बिल्डिंग प्रॉडक्शन किंवा ट्रान्सपोर्ट इक्वीपमेंन्ट २, इलेक्ट्रॉनिक प्रॉडक्ट २, असे आहेत. यावरुन असे दिसते की, भारतात विशेष आर्थिक क्षेत्रांची स्थापना आयटीक्षेत्रात झालेली आहे. य तुलनेत इतर क्षेत्रात कमी आर्थिक क्षेत्रांची मान्यता मिळालेली दिसून येते.

### विशेष आर्थिक क्षेत्राचे भारताच्या निर्यातवृध्दीमधील योगदान:

विशेष आर्थिक क्षेत्राच्या माध्यमातून भारताच्या निर्यातीत किती भर पडली आहे हे तक्ता क्रमांक १ वरुन लक्षात येईल.

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, तक्ता क्र.१ मध्ये दाखविल्याप्रमाणे विशेष आर्थिक क्षेत्राच्या माध्यमातून भारताची होणारी निर्यात २००५ - ०६ मध्ये २२,८४० कोटी रु. ची होती तर २००६ - ०७ मध्ये ३४,६१५ कोटी रु. इतकी होती या दोन वर्षातील वार्षिक वृध्दी दर ५२ % इतका होता. २००७ - ०८ मध्ये निर्यात ६६,६३८ कोटी रु. ची होती या वर्षी वार्षिक वृध्दी दर ९३ % इतका होता विशेष आर्थिक क्षेत्रांच्या माध्यमातून २००९ - १० या

तक्ता क्र.१: विशेष आर्थिक क्षेत्राचे भारताच्या निर्यातवृध्दीतील योगदान

| वर्ष | निर्यात (कोटी रु.) | आर्थिक निर्यात वृध्दीदर |
|---|---|---|
| २००५ - ०६ | २२,८४० | - |
| २००६ - ०७ | ३४,६१५ | ५२ % |
| २००७ - ०८ | ६६,६३८ | ९३ % |
| २००८ - ०९ | ९९,६८९ | ५० % |
| २००९ - १० | २,२०,७११ | १२१ % |
| २०१० - ११ | ३,१५,८६८ | ४३.११ % |
| २०११ - १२ | ३,६४,४७८ | १५.३९ % |
| २०१२ - १३ | ४,७६,१५९ | ३१ % |
| २०१३ - १४ | ४,९४,०७७ | ४ % |

वर्षी निर्यातीमध्ये जास्त वाढ झाल्याचे दिसून येते ते म्हणजे २,२०,७११ कोटी रु. ची होती तर वार्षिक वाढ १२१ % इतकी होती. २०१३-१४ मध्ये सर्वात कमी निर्यात वाढ झाल्याचे दिसून आले म्हणजे २०१२-१३ मध्ये ४,७६,१५९ कोटी रु.ची असलेली निर्यात २०१३-१४ मध्ये ४,९४,०७७ इतकी झाली म्हणजे मागील वर्षाशी तुलना करता फक्त ४ % इतकी निर्यात वृध्दी झाल्याचे दिसून आले.

**समारोप:**

विशेष आर्थिक क्षेत्राची भारतात सुरुवात झाल्यापासून भारताच्या निर्यातमध्ये वृध्दी काही प्रमाणात झालेली असली तरी विशेष आर्थिक क्षेत्राचे इतर परिणाम फारच वाईट असे आहे. म्हणुन त्या परिणामांची तिव्रता कमी करण्याच्या दृष्टीने आधीच प्रयत्न होणे गरजेचे आहे. उदा. विशेष आर्थिक क्षेत्रातील कामगारांचे शोषण, देशाचे सार्वभौमत्व, देशात वाढणारी आर्थिक विषमता, शेतकऱ्यांच्या समस्या इ. या सर्व परिणामांकडे सरकारने विशेष लक्ष दिले तर विशेष आर्थिक क्षेत्र देशाच्या दृष्टीने कमी अहितकारक ठरतील.

**संदर्भ सूची:**

१) पी.चिदंबरम् : *टाईम्स ऑफ इंडिया*, दिनांक २४ ऑगस्ट २००६

२) भट्टाचार्य आणि शक्तीवेल, एस.महेंद्र देव, *इकॉनॉमिक ॲन्ड पॉलीटीकल विकली*, दि.२२ एप्रिल २००६ पृ.१५११

३) सदर्न इकॉनॉमिस्ट, जाने. २००६

४) डॉ.इंद्रजित आल्टे, *विशेष आर्थिक क्षेत्र एक गौड बंगाल.*

५) विशेष आर्थिक क्षेत्र, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, पृ.१ व २

६)http://se2india.nic.in/aboutep.dsp.page.I.

# कृषी विज्ञान केंद्र: शाश्वत शेती विकासासाठी वरदान

**नागेश एम. सूर्यवंशी, मुंबई,**
डॉ. टी. के. टोपे नाईट कॉलेज,
परेल.
भ्रमणध्वनी: ९८६७००४१८२
ई-मेल: nageshmsa@gmail.com

प्राचीन काळापासून भारतातील लोकांचा प्रमुख व्यवसाय कृषी हा आहे. देशातील लोकांचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन म्हणून आजही कृषी क्षेत्राकडे पाहिले जाते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी कृषीक्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष देण्यात आले. त्यामुळे कृषी क्षेत्राचा विकास घडून आला परंतु तो लोकसंख्यावाढीशी सुसंगत झाला नाही. भारतीय शेतीमधील बहुतांश पिकांची उत्पादकता नेहमीच सरासरीपेक्षा कमी असलेली दिसून येते. शेती व्यवसाय पारंपरिक असूनही आजही शेतकरी त्रस्त झालेला आहे. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानानुसार शेती करणे हाच उत्तम पर्याय शेतकऱ्यांसाठी आहे. ज्यामुळे शेतीची उत्पादकता वाढेल व शेतकऱ्यांची स्थिती सुधारेल म्हणूनच भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या संस्था, कृषी विद्यापीठे आणि अन्य संशोधन संस्था यांनी कृषी आणि संलग्न क्षेत्रात केलेले संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी भारतीय कृषी संशोधन परिषदेने (ICAR) सन १९७३ मध्ये स्थायी समितीच्या शिफारशीनुसार देशात कृषी विज्ञान केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सन १९७४ मध्ये तामिळनाडू कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत पॉन्डीचेरी येथे पहिले कृषी विज्ञान केंद्र स्थापन करण्यात आले त्यानंतर कृषी विज्ञान केंद्राच्या संख्येत सातत्याने वाढ करण्यात आली. देशात प्रत्येक जिल्ह्यासाठी एक कृषी विज्ञान केंद्र स्थापन करणे हे केंद्र सरकारचे धोरण आहे. Telephone Directory of Krushi Vidnyan Kendra-2013 नुसार सध्या भारतामध्ये ६२६ आणि महाराष्ट्रामध्ये ४४ कृषी विज्ञान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. जी केंद्रे कृषी विद्यापीठे व बिगर सरकारी संस्था (NGO) मार्फत चालविली जातात.

कृषी विज्ञान केंद्राची स्थापना पुढील बाबींवर आधारित आहे.

१. प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष कार्यानुभवाद्वारे प्रशिक्षण देणे.

२. शेतकरी, कृषी विस्तार कार्यकर्ते व स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या ग्रामीण युवक

व युवतींना प्रशिक्षण देणे.

३. प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम आणि कार्यक्रम विशिष्ट भागातील नैसर्गिक साधनसंपत्ती, स्थानिक गरजा आणि त्या परिसरात कृषी विकासाला असलेला वाव या बाबींचा विचार करून आखणे.

४. शेतकऱ्यांच्या शेतावरील पीक प्रात्यक्षिकामधून कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करणे.

कृषी विज्ञान केंद्राचा मूळ उद्देश उपलब्ध असलेले आधुनिक तंत्रज्ञान व शेती उत्पादन वाढीसाठी त्यांचा अवलंब यामध्ये जी दरी आहे, ती भरून काढणे, शेतीची उत्पादकता वाढविणे हा आहे. शेतकऱ्यांच्या जीवनमानाची पातळी उंचावण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र महत्वाची भूमिका पार पाडत आहे.

**कृषी विज्ञान केंद्रामार्फत कार्यक्रम आणि उपक्रम:**

१) तंत्रज्ञानाविषयी प्रक्षेत्र चाचणी:

कृषी विज्ञान केंद्रांच्या वतीने शेतकऱ्यांच्या शेतीवर कृषी विद्यापीठाने केलेल्या शिफारशीनुसार चाचण्या घेऊन शेतकऱ्यांच्या गरजेनुसार आवशक त्या सुधारणा केल्या जातात.

२) प्रथमदर्शी पीक प्रात्यक्षिके :

कृषी विद्यापीठ व इतर संशोधन केंद्राने संशोधित केलेल्या सुधारित तंत्रज्ञानाचे विविध पिकांच्या बाबतीत प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतीवर प्रात्यक्षिक घेतले जाते. सुधारित तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पिकांची उत्पादकता वाढते. तसेच आद्यरेषा प्रयोगातील शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शनामुळे कमी खर्चात अधिक उत्पन्न प्राप्त करणे शक्य होते.

३) शिक्षण-प्रशिक्षण:

कृषी विज्ञान केंद्रामार्फत त्या त्या जिल्ह्यातील शेतकरी/महिला शेतकरी, ग्रामीण युवक-युवती व कृषी विस्तार कर्मचारी यांना केंद्राच्या परिसरात किंवा परिसराबाहेर त्यांच्या गरजेनुसार शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते.

४) माती आणि पाणी परीक्षण:

केंद्रामार्फत शेतकऱ्यांच्या शेतीतील मातीचे आणि पाण्याचे परीक्षण केले जाते व त्यानुसार केंद्राच्या मार्गदर्शनाखाली सुधारित कृषी तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

५) गृहविज्ञान:

कृषी विज्ञान केंद्रामध्ये गृहविज्ञान केंद्राची स्थापना प्रामुख्याने शेती व्यवसायामध्ये महिलांचा सहभाग वाढविणे व कुटुंबाचे आरोग्य चांगले राखण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागातील महिलांचे सशक्तीकरण करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेली आहे. गृहविज्ञान विभागांतर्गत महिलांना विविध विषयावर प्रशिक्षण दिले जाते त्यामध्ये आरोग्य व अन्नसुरक्षा, पोषक आहार, माता आणि बालसंगोपन, गृहउद्योग व्यवसाय, धान्य साठवण्याच्या प्रक्रियेत होणारे नुकसान कमी करणे यावर भर दिला जातो.

६) निदान चमू भेटी :

कृषी विज्ञान केंद्रातर्फे केंद्राची संपर्क गावे व जिल्ह्यातील इतर गावांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतीतील पिकावर पडणाऱ्या कीड व रोगांचे निरीक्षण करून त्यावरील उपाय व नियंत्रण कसे करावे ते शेतकऱ्यांना सुचविले जाते. या भेटीदरम्यान कृषी अधिकारी, कृषी विभागातील अधिकारी, कृषी विज्ञान केंद्रातील अधिकारी व कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ मार्गदर्शन करतात.

७) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम:

या उपक्रमांतर्गत पाणलोटक्षेत्रातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्राचा अवलंब करण्यास प्रवृत करण्याचे प्रयत्न केले जातात. तसेच पाणलोट क्षेत्रात उपलब्ध पर्जन्यमानाचा अधिकाधिक वापर होण्यासाठी जमिनीचे सपाटीकरण, बांधबंदिस्ती, समपातळीत बांध, नाला बांध, शेततळे, पाझर तलाव यासारख्या विविध उपाय योजना सुचविण्यात येतात. त्यामुळे पाणलोटक्षेत्रातील जमिनीची धूप थांबवून जास्तीत जास्त पाणी जमिनीत जिरविले जाते. त्यामुळे विहिरींच्या पाणी पातळीत वाढ होते.

८) पीक संरक्षणः

पीक लागवडीपासून ते काढणीपर्यंत पिकांचे विविध कीड आणि रोगांमुळे नुकसान होते. शेतकऱ्यांकडून कीटकनाशक व बुरशीनाशक यांचा अवाजवी वापर होतो त्यामुळे उत्पादन खर्च वाढतो व त्याचे मानवी आरोग्यावरही दुष्परिणाम होतात त्यासाठी पिकावर पडणारी कीड व रोग यांचे परीक्षण करून शास्त्रीय निदान करून योग्य वेळी कीटकनाशकाची फवारणी करून त्यांचे दुष्परिणाम टाळता येतात. म्हणून कृषी विज्ञान केंद्राकडून शेतकऱ्यांना पीक संरक्षणाच्या बाबतीत प्रशिक्षण दिले जाते.

९) उद्यानविद्या :

कृषी विज्ञान केंद्रांमध्ये या विभागाची स्थापना करण्याचा उद्देश शेतकऱ्यांना फळबाग लागवड व व्यवस्थापन, भाजीपाला लागवड व व्यवस्थापन, फळे व भाजीपाला प्रक्रिया, फुलशेती, रोपवाटिका विकास व व्यवस्थापन इ. विषयावर प्रशिक्षण देऊन शेतकऱ्यांचा विकास करणे हा आहे. त्यानुसार कृषी विज्ञान केंद्राकडून शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

१०) अन्न तंत्रज्ञान :

कृषी विज्ञान केंद्रामार्फत जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अन्नावर प्रक्रिया करण्याचे तंत्रज्ञान अवगत व्हावे यासाठी ज्ञान व कौशल्यावर आधारित विविध विषयावर अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये दुध प्रक्रिया व दुधाचे पदार्थ, पापड निर्मिती, आंबा, केळी, मोसंबी, जांभूळ, डाळिंब, आवळा, बटाटा, गाजर इ. पिकावरील प्रक्रिया व त्यापासूनचे पदार्थ या संदर्भात प्रशिक्षण दिले जाते. अशा प्रशिक्षणामुळे अनेक प्रशिक्षित शेतकरी व महिला शेतकरी स्वतःचा फळप्रक्रिया उद्योग सुरू करण्यास मदत होते.

११) एकात्मिक कीड व्यवस्थापन :

एकत्मिक कीड व्यवस्थापन म्हणजे ज्यामध्ये वातावरणाशी समन्वय साधून कीडींची संख्या आर्थिक नुकसानीच्या पातळीखाली ठेवली जाते. या पध्दतीमध्ये तांत्रिक, भौतिक, रासायनिक, जैविक व पर्यावरणीय पद्धतीचा एकात्मिक वापर कमी करणे हा आहे.

कृषी विज्ञान केंद्रांकडून एकात्मिक किड व्यवस्थापन हा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविला जातो. यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण कार्यक्रमातून शत्रू व मित्र किडींची ओळख आणि जीवनक्रम, किडी व रोग सर्वेक्षण, वनस्पती परिसंस्थेचा अभ्यास, जैविक किडनाशकांची ओळख इत्यादी विषयांवर प्रशिक्षण देले जाते. याशिवाय एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पाहून ते आत्मसात होण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या शेतीवर प्रत्यक्ष पीक प्रात्यक्षिके घेतली जातात.

१२) शेतकरी मेळावे :

कृषी विज्ञान केंद्रांतर्फे खरीप व रब्बी हंगामात घेण्यात येणाऱ्या प्रमुख पिकांच्या सुधारित लागवड तंत्रज्ञान व इतर कृषीविषयी विद्यापीठ व कृषी विभागातील तंज्ञामार्फत उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. तसेच कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी गाव पातळीवर महिला शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. मेळाव्यात महिलांना स्वयंरोजगार निर्मिती व आत्मनिर्भरता इ. विषयावर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येते.

अशा विविध कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून देशातील कृषी विज्ञान केंद्राकडून शेतकरी/महिला शेतकरी, ग्रामीण युवक युवती यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती करण्याचे शिक्षण आणि प्रशिक्षण दिले जाते.

भारतामध्ये जवळपास ७२% शेतकरी हे अल्प भूधारक आहेत तसेच त्यांच्याकडे सुधारित तंत्रज्ञानाचा अभाव आहे व ज्यांच्याकडे आहे त्यांना सुधारित तंत्राचा वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शनाची गरज आहे. त्यामुळे कृषी विज्ञान केंद्रे अशा विविध कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम करतात. त्याचबरोबर शेतीपूरक उद्योग व्यवसाय जसे रेशीम उद्योग, हातमाग, खाद्यपदार्थांचे उत्पादन, जिनिंग व प्रेसिंग कारखाने, साखर कारखाने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, हरितगृहामध्ये भाजीपाला लागवड व शेतकरी महिलांना बचत गटाद्वारे गावपातळीवर लघुउद्योग निर्माण करण्यास प्रवृत्त करून आर्थिक स्त्रोत निर्माण करून त्यांच्या सक्षमीकरणास कृषी विज्ञान केंद्रे मदत करतात.

कृषी विज्ञान केंद्रामुळे तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार जलदगतीने होण्यास मदत होत आहे. शेतकऱ्यांशी वेळोवेळी संवाद साधता यावा यासाठी कृषी विज्ञान केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे या माध्यमातून शेतकरी व शेतीच्या विकासाला चालना मिळत आहे असे दिसून येते. देशातील सर्व कृषी विज्ञान केंद्रे नवीन जुनाट तंत्रज्ञानामुळे होणारा वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी नवीन तंत्रज्ञान तयार करून ते शेतीसाठी लवकर कसे वापरात आणता येईल व त्या माध्यमातून शेतीची उत्पादकता आणि उत्पादन कसे वाढविता येईल यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यामुळे कृषी विज्ञान केंद्रे भारतीय शेतीसाठी वरदान ठरणार आहेत.

**सारांश :**

भारतीय शेती बहुतांश पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीचे उत्पादन आणि उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते. बदलत्या हवामानाचा आणि जागतिक आव्हानांचा फटका शेती क्षेत्राला बसत आहे याचा सामना करून शेतकरी व शेती समृद्ध करण्यासाठी त्यांच्यामध्ये तशी क्षमता निर्माण करण्याचे करण्याचे कार्य कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून केले जात आहे. जिल्हा स्तरावर कृषी विज्ञान केंद्राचा विस्तार करण्यात आला आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती पुरविली जाते. त्यामुळे अलीकडच्या काही वर्षात देशामधील शेतकऱ्यांच्या शेती करण्याच्या पद्धतीत तंत्रज्ञानाला अनुकूल बदल पाहण्यास मिळत आहेत.

**संदर्भ सूची:**

१) पोवळे टी. व्ही., टकले एस. आर., खंदारे

विलास, *कृषी विकासाचे अर्थशास्त्र*, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद (२०१२),

२) वाणी नीता, *कृषी अर्थशास्त्र*, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव (२०१२)

३) लातूर कृषी विज्ञान केंद्राची विविध माहिती पत्रके.

४) www.icar.org.in

५) www.lokmat.com(4 April 2015)

६) www.Anandgiri.com

# नियोजन आयोगाची अर्थव्यवस्थेतील भूमिका

**अरूण तवार, परभणी,**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२१५९०२३२

१५ ऑगस्ट २०१४ च्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्यावरून देशाला संबोधित करताना म्हटले की, नियोजन मंडळाला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यात येईल. त्यामुळे साहजिकच नियोजन मंडळाविषयीची ऐतिहासिक पार्श्वभूमी जागृत झाली. त्यातूनच नियोजन मंडळाचे स्वरूप, कार्ये इ. बाबतचे स्मरण करून देणे आणि नवीन व्यवस्था कशी असावी या उद्देशाने प्रस्तुत लेखात चर्चा करण्यात आलेली आहे.

जगामध्ये विकसित, विकसनशील व अल्पविकसित अर्थव्यवस्था अस्तित्वात आहेत. या अर्थव्यवस्थांच्या स्वरूपाची व समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सर्व बाजूने प्रयत्न होणे आवश्यक आहे. सुरवातीच्या काळात अर्थव्यवस्थांचे वर्गीकरण भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्था असे होते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने खासगी मालकीची असतात, अर्थव्यवस्थेत मुक्त वातावरण असते आणि नफा मिळवणे हे या अर्थव्यवस्थेचे प्रमुख लक्ष असते. समाजवादी साधने वापरली जातात. नफा मिळविणे हा समाजवादी अर्थव्यवस्थांचा उद्देश नसतो. तर सामाजिक हित डोळ्यासमोर ठेवलेले असते. समाजवादी अर्थव्यवस्थेत विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक नियोजन हे प्रमूख साधन मानले जाते. वेगवेगळ्या क्षेत्रात व संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी काही उद्दिष्टे ठरविली जातात व ती उद्दिष्टे विशिष्ट कालावधीत साध्य करावयाची असतात. समाजवादात नियोजनाचे अस्तित्व इतके आवश्यक मानले जाते की, समाजवादाचे एक नवे रूप म्हणून नियोजनाचा उल्लेख केला जातो. समाजात नियोजनाची सुरूवात ही प्रामुख्याने रशियात १९७० च्या क्रांतीनंतर झाली.

दुसऱ्या महायुध्दानंतर जगामध्ये खऱ्या अर्थाने समाजवाद व नियोजनाचा जास्त प्रभाव वाढला. विकसनशील राष्ट्रांच्या विकासाच्या मार्गातील अडचणी

सोडविण्यासाठी अनेकांना नियोजनाची आवश्यकता वाटली. आज कमी अधिक प्रमाणात प्रत्येकच अर्थव्यवस्था नियोजनाचा अवलंब करत आहे. नियोजनाची कल्पना बरीच जुनी असून विविध राष्ट्रांच्या इतिहासात नियोजनाचा कमी अधिक वापर झालेला आहे. नियोजन हे विकासासाठी अपरिहार्य आहे. याची खात्री आता सर्वच राष्ट्रांना पटलेली दिसून येते.

नियोजनाची संकल्पना पश्चिमात्य राष्ट्रांप्रमाणे भारतालाही नवीन नाही. इ.स.पूर्व चौथ्या शतकात ग्रीक तत्वज्ञ प्लेटो यांनी नियोजनाची संकल्पना मांडली. भारतातही कौटिल्याच्या अर्थशास्त्रात नियोजनाचा उल्लेख येतो. आर्थिक नियोजनाची सुरुवात सर्वप्रथम १९२८ मध्ये रशियात झाली.

**नियोजन म्हणजे काय?**

प्रो.रॉबिन्स यांच्या मते, कल्याणकारी राज्याचे उद्दिष्टे साध्य करण्याचे एक साधन म्हणजे आर्थिक नियोजन होय. प्रा.एच.जी.डिकिन्सन यांच्या मते, राज्य अर्थव्यवस्थेची पाहणी करून कोणत्या वस्तूचे किती प्रमाणात उत्पादन करावयाचे, केव्हा व कोठे उत्पादन करावयाचे व केलेल्या उत्पादनाचे वाटप कशा प्रकारे करावयाचे यासारखे महत्त्वाचे निर्णय जाणीवपूर्वक घेणे म्हणजे आर्थिक नियोजन होय.

भारतीय नियोजन मंडळाने केलेल्या व्याख्येनुसार देशाची साधनसामग्री संघटित करून तिचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन, योजलेली सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अस्तित्वात आलेली पध्दती म्हणजे आर्थिक नियोजन होय.

पंडित नेहरु यांच्या मते, प्रत्यक्षातील घडलेल्या घडामोडी किंवा घटना आणि ज्या परिस्थितीला सामोरे जाऊन ती हाताळण्यासाठी लागणारी मेहनत आणि तिची उकल करण्यासाठी किंवा निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्यासाठी मानवी बुध्दीने केलेला प्रयत्न म्हणजे नियोजन होय.

थोडक्यात अर्थव्यवस्थेतील उपलब्ध साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर करून काही ठराविक उद्दिष्टे ठराविक काळात साध्य करण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे अर्थिक नियोजन होय.

**स्वातंत्र्यपूर्व काळ:**

स्वातंत्र्यापूर्वीच भारतातील काही विचारवंत, अर्थतज्ज्ञ, उद्योगपती, राजकीय पुढारी, यांनी देश स्वतंत्र झाल्यानंतर मार्गाचा अवलंब करण्यात यावा असे विचार व्यक्त केले होते. सन १९७६ मध्ये दादाभाई नौरोजी यांनी भारताचे दारिद्र्य ग्रंथात तर सन १९३४ मध्ये सर विश्वेश्वरैय्या यांनी भारतासाठी नियोजन अर्थव्यवस्था या ग्रंथात आणि सन १९३८ मध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी देशाच्या विकासासाठी नियोजनाची आवश्यकता प्रतिपादन केली.देशाचा जलद आर्थिक विकास साधण्यासाठी नियोजन करण्यासाठी पुढील योजना तयार करण्यात आल्या.

१)मुंबई योजना: देशाला स्वातंत्र्य मिळेल अशी आशा उराशी बाळगून मुंबईतील आठ उद्योगपतीनी एकत्र येवून १९४४ मध्ये १५ वर्षे मुदतीची मुंबई योजना तयार कली. या योजनेची उद्दिष्टे, याप्रमाणे आहेत पंधरा वर्षात शेतीचे उत्पादन दूप्पट करणे, औद्योगिक उत्पादन तिप्पट करणे, संतुलीत अर्थव्यवस्था निर्माण करणे, नागरिकांचे सरासरी उत्पन्न दुप्पट करणे अशी होती.

२) जनता योजना: भारताच्या आर्थिक विकासाची

दिशा, स्वरूप व घडण कशी असावी यावर विचार करून साम्यवादी विचारवंत मानवेंद्रनाथ राय यांनी दहा वर्षे मुदतीची ही जनता योजना तयार केली. लोकांचे राहणीमान चार पटींनी वाढविणे, शेती उत्पादन वाढविण्यासाठी देशातील संपूर्ण शेतीचे राष्ट्रीयीकरण करणे आणि जलद औद्योगिक विकासासाठी मूलभूत उद्योगांचा विकास करणे ही या योजनेची उद्दिष्टे होती.

३) गांधी योजना: गांधीजींच्या विचारावर आधारित भारताचा आर्थिक विकास कसा साधता येईल या विषयावर आचार्य मन्नारायण अग्रवाल यांनी एक आराखडा तयार केला. त्यालाच गांधीवादी योजना म्हणतात. ग्रामविकास उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण करणे, कुटिरोद्योगांची वाढ करणे, बेकारी निर्मूलन करणे, लोकांच्या राहणीमानात चार पटींनी वाढ करणे ही या योजनेची उद्दिष्टे होती.

४) सर्वोदय योजना: जयप्रकाश नारायण यांनी १९५० मध्ये सर्वोदय योजना तयार केली. अहिंसात्मक पध्दतीने शोषणविरहित समाज निर्माण करणे हे योजनेचे उद्दिष्टे होते.

या सर्व योजना ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठरल्या मात्र योजनांची प्रत्यक्षात कार्यवाही झाली नाही.

### स्वातंत्र्योत्तर काळ:

१५ ऑगष्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतीयांचा हा आनंदाचा दिवस! मात्र हा आनंद उपभोगायचा कसा? हा प्रश्न होता. कारण स्वातंत्र्याबरोबर भारतीय अर्थव्यवस्थेसमोर आणि तत्कालीन राज्यकर्त्यांसमोर अनेक समस्या आ वासून उभ्या होत्या. दारिद्र्य, बेकारी, भूकबळी, अन्नधान्याची टंचाई, भांडवलाची कमतरता, वाढती लोकसंख्या अशा अनेक समस्यांची सोडवणूक कशी करायची? यासाठी कोणता मार्ग अनुसरायचा? त्यावेळी जगात भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि समाजवादी अर्थव्यवस्था अशा आत्यंतिक टोकाच्या व्यवस्था अस्तित्वात होत्या. यापैकी कोणत्याही एका व्यवस्थेचा अंगिकार करून भारतासमोरचे प्रश्न सोडविणे कठीण आहे, याची जाणीव राज्यकर्त्यांना होती. यातून मध्यम मार्ग म्हणून या दोन्ही व्यवस्थांची चांगली वैशिष्ट्ये एकत्रित करून एक नवी व्यवस्था निर्माण करण्यात आली ती म्हणजे मिश्र अर्थव्यवस्था. मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारून देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी लोकशाही नियोजनाचा स्वीकार करण्यात आला. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर रशियाने आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून अल्पावधीत केलेली प्रगतीचा प्रभाव होता. त्यांनी व तत्कालीन सर्वच धुरिणांनी रशियाच्या धर्तीवर नियोजनाच्या माध्यमातून देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्याचे ठरविले व त्यातूनच भारतात नियोजनाच्या पर्वाला सुरूवात झाली.

### नियोजन मंडळ:

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही तज्ज्ञ, विचारवंत यांनी देशाच्या जलद आर्थिक विकासासाठी नियोजनाचे महत्व व नियोजनासाठी आग्रह धरला. तेव्हा काँग्रेस पक्षाच्या कार्यकारी समितीने १९ जानेवारी १९५० रोजी तत्कालीन भारत सरकारकडे अशी शिफारस केली की, देशाचे आर्थिक व सामाजिक कल्याण साधण्यासाठी विकासाची योजना तयार करण्यासाठी एक

नियोजन मंडळ त्वरित नियुक्त करण्यात यावे. भारत सरकारने ही शिफारस मान्य करून पंडित नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन मंडळाची स्थापना १५ मार्च १९५० रोजी केली. या मंडळाची पहिली बैठक २८ मार्च १९५० रोजी झाली. नियोजन मंडळाचे औपचारिक उद्घाटन १ एप्रिल १९५० रोजी झाले.

### नियोजन मंडळाचे स्वरूप:

१) नियोजन मंडळ हे भारताच्या नियोजन कार्यासंबंधीचे सर्वोच्च अभिकरण आहे. ते मंत्रालयाच्या कक्षेबाहेर राहून कार्य करते.

२) पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली हे कायमचे वैधानिक अभिकरण म्हणून अस्तित्वात आले आहे.

३) विविध खात्यांच्या मंत्र्यांचे सहकार्य घेऊन प्रत्यक्ष कार्याची अंमलबजावणी.

४) विकासासंबंधी धोरण निर्मिती.

५) नियोजन आणि आर्थिक विकास यासंबंधी इतर अभिकरणांकडून आलेल्या सूचना विचार व कार्यक्रम इ. मध्ये समन्वय साधने.

६) नियोजन मंडळ ही अराजकिय संघटना आहे, ती सरकारला सल्ला देते व शिफारशी करते.

### नियोजन मंडळाची रचना:

नियोजन मंडळातील सदस्य संख्या, सदस्यांची पात्रता इ. बाबतचे सर्व निर्णय पंतप्रधान परिस्थितीनुसार व सोयीनुसार वेळोवेळी घेतात.

१) भारताचे पंतप्रधान हे नियोजन मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष असतात.

२) एक उपाध्यक्ष (पूर्ण वेळ) आणि तीन सदस्य असतात यांची नियुक्ती भारत सरकार करते. हे चौघेही विचारवंत अर्थशास्त्राचे अभ्यासक असतात.

३) याशिवाय केंद्र सरकारमधील नियोजन मंत्री, अर्थमंत्री व संरक्षण मंत्री हे सदस्य असतात.

४) नियोजन मंत्र्यांना सहाय्य करण्यासाठी एक उपमंत्री व सांसदीय सचिव आणि मंत्रीमंडळाचे सांख्यिकीय सल्लागार हे मंडळात असतात.

### नियोजन मंडळाची कार्ये:

नियोजन व विकास प्रक्रियेत भारत सरकारला वेळोवेळी मार्गदर्शन करणे.

१) देशातील नैसर्गिक, तांत्रिक व मानवी संसाधनांचा शोध घेवून त्यांचा पर्याप्त वापर होण्यासाठी योजना तयार करणे.

२) पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करणे.

३) प्राधान्यक्रमानुसार साधनसामग्रीचे वाटप करणे.

४) योजनेचा प्रत्येक टप्पा यशस्वी करणे.

५) विकासाच्या मार्गातील अडथळे सरकारला सूचित करणे.

६) योजनेचे वेळोवेळी परीक्षण करून त्यात योग्य बदल सुचविणे.

७) केंद्र व राज्यसरकारकडून मंडळासमोर आलेल्या समस्यांचा अभ्यास करून त्यांना योग्य सल्ला देणे.

८) मागील अनुभवावरून नवीन योजनेची दिशा ठरविणे.

९) योजनेची उद्दिष्टे ठरवून त्यांना अग्रक्रम देणे.

### नियोजन मंडळाचे विविध विभाग:

१) आर्थिक विभाग आणि २) अर्थिकेत्तर विभाग आर्थिक विभागात अ) आर्थिक व सामाजिक संशोधन विभाग, ब) किंमत धोरण आंतरराष्ट्रीय आयात निर्यात, क) आंतरउद्योग अभ्यास, आर्थिक सामुग्री, ड) आर्थिक धोरण व विकास

इ. चा समावेश होतो.

आर्थिकेत्तर विभागात अ) श्रम व रोजगार विभाग, ब) दीर्घकालीन नियोजन क) आंतरउद्योग अभ्यास, आर्थिक सामुग्री, ड) आर्थिक धोरण व विकास इ. चा समावेश होतो. याशिवाय १) शेती, २) उद्योग, ३) संसाधन, ४) खनिज, ५) उर्जा, ६) पंचायत राज, ७) माहिती व दळणवळण, ८) योजना समन्वय व व्यवस्थापन, ९) अल्पसंख्यांक विभाग, १०) वन व पर्यावरण, ११) भविष्यकालीन योजना, १२) वित्तीय संसाधन, १३) आरोग्य, कुटूंब कल्याण व सकस आहार, १४) गृह व नागरी संबंध, १५) मानव संसाधन विकास, १६) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, १७) आंतरराष्ट्रीय संबंध, १८) ग्रामीण विकास, १९) विज्ञान आणि तंत्रज्ञान, शिक्षण, २०) सामाजिक न्याय व सामाजिक कल्याण, विमा, २१) संशोधन विभाग, २२) वाहतूक पर्यटन, २३) जलसंसाधन, २४) महिला व बालविकास, २५) ग्रामोद्योग इ.चा समावेश होतो.

### नियोजनाची उद्दिष्टे:

अ) आर्थिक उद्दिष्टे:

१) जलद आर्थिक विकास घडवून आणणे.
२) नैसर्गिक साधनसामग्रीचा महत्तम उपयोग करणे.
३) समतोल विकास करणे.
४) आर्थिक समता प्रस्थापित करणे.
५) पूर्ण रोजगार निर्माण करणे.
६) आर्थिक स्थैर्य निर्माण करणे.
७) लोकांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे.
८) दारिद्र्य निर्मुलन, औद्योगिकरण व पर्यावरण संरक्षण

ब) सामाजिक उद्दिष्टे

१) सामाजिक सुरक्षितता निर्माण करणे.
२) सामाजिक समता प्रस्थापित करणे.
३) लोकसंख्या नियंत्रणाला प्राधान्य देणे.

क) राजकीय उद्दिष्टे

१) राष्ट्राचे संरक्षण
२) कायदा व सुव्यवस्था राखणे.

### योजना निर्मितीची प्रक्रिया:

प्रत्यक्षात योजना सुरू होण्यापूर्वी तीन वर्ष अगोदर पुढील योजनेबाबत सर्वसाधारण दृष्टिकोन तयार केला जातो. मागील अनुभव व अडचणी विचारात घेऊन योजनेचा अहवाल राष्ट्रीय विकास परिषदेमध्ये सादर करण्यात येतो. पुढील तीन टप्प्यातून योजनेची निर्मिती होते.

पहिला टप्पा: योजना स्वीकृतीमध्ये योजना आयोग, राष्ट्रीय विकास परिषद, केंद्र व राज्य सरकारांचा समावेश असतो. नियोजन आयोग विभिन्न मंत्रालयाशी तसेच राज्य सरकारांशी चर्चा करून निश्चित बिंदू तसेच योजनेच्या आराखड्याचा पूर्वानूमान लावण्याचा प्रयत्न करते. नियोजन आयोग प्राथमिकता निश्चित करते व त्यानुसार उपलब्ध भौतिक, भांडवली व मानवी संसाधनाचे अनुमान लावते. या सर्व मसुद्याला आयोग राष्ट्रीय विकास परिषद त्यावर सूक्ष्म परीक्षण करून नंतर केंद्र सरकारकडे पाठविते.

दुसरा टप्पा: दुसऱ्या टप्यात केंद्र व राज्य सरकारे आपआपल्या योजना तयार करून योजना आयोगाला पाठवितात. यावर आयोग विचारविमर्ष करून राज्य सरकारांच्या योजनांचे एकत्रिकरण करते. दरम्यानच्या काळात योजना आयोग विविध तज्ज्ञ व संघटनांशी चर्चा करते. या सर्व प्रक्रियेनंतर प्रारूप तयार होते.

तिसरा टप्पा: योजनेचे प्रारूप मांडल्यानंतर तिसरा टप्पा सुरू होतो. योजना प्रारूपावर योजना आयोग आणि राज्यसरकारमध्ये चर्चा होते. राज्य सरकारच्या योजनेचे स्वरूप स्पष्ट करणे हा या चर्चेचा मुख्य उद्देश असतो. त्यानंतर आयोग केंद्रिय मंत्रीमंडळासोबत विचार विमर्ष करते व त्यानंतर योजनेचा अंतिम आराखडा कॅबिनेट समोर ठेवला जातो. यानंतर योजनेचे प्रारूप राष्ट्रीय विकास परिषदेकडे पाठविण्यात येते. परिषद त्यास अंतिम स्वरूप देऊन स्वीकृती देते. स्वीकृती केलेली योजना पंतप्रधान संसदेसमोर ठेवतात. संसदेच्या दोन्ही सभागृहात त्यावर चर्चा होते आणि संसदेच्या मंजुरीनंतर योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होते.

पर्यायी व्यवस्था का ? नियोजन आयोगाची / मंडळाची वरील प्रमाणे संपूर्ण रचना व प्रक्रिया समजावून घेतल्यानंतर एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते ती म्हणजे, ही संपूर्ण प्रक्रिया मा. पंतप्रधानांच्या अधिपत्याखाली चालते. म्हणजे सत्तेवर असलेल्या पक्षाचीच हुकूमत या सर्व बाबीवर असते. असे असतानाही पंतप्रधानच ही व्यवस्था बदलायची किंवा त्या जागी पर्यायी व्यवस्था आणायची असे का म्हणतात, याचे स्पष्टीकरण मात्र त्यांनी दिलेले दिसत नाही. तसेच जर नियोजन मंडळात दोष असतील तर पंतप्रधान आपल्या अधिकारात ते दूर करू शकतात. नियोजन मंडळाला पर्यायी व्यवस्था आणण्यासाठी जनतेकडून / तज्ज्ञांकडून सुचना मागविल्या आहेत. परंतु याचवेळी त्यांनी त्यांना बदल कसा हवा याविषयी मार्गदर्शन करायला हवे होते. वास्तविक पाहता नियोजन आयोगाचे सर्वेसर्वा पंतप्रधानच असतात. आयोगावरील सदस्यांची नियुक्तीही तेच करतात, असे असतांना त्यांना आयोगाची रचना हवी तशी करता येत असताना, आयोगच रद्द करायचा अशी भूमिका का घेतली हे अनाकलनीय आहे.

शेवटी कोणतीही यंत्रणा अंमलात आणली, तरी ती राबविणाऱ्या व्यक्तींची विचारप्रणाली, निष्पक्षपातीपणा, निर्णयक्षमता कशी आहे यावर यंत्रणेचे श्रेष्ठत्व ठरत असते. चांगल्या व्यक्ती योग्य ठिकाणी असतील, त्यांना स्वातंत्र्य असेल, तर ती यंत्रणा यशस्वी होते, अन्यथा नाही.

**संदर्भ सूची:**


१) गौरव दत्त अँड अश्विनी महाजन, आवृत्ती २०१२, *भारतीय अर्थव्यवस्था*, एस.चांद प्रकाशन.
२) मिश्रा पुरी, २००९, *भारतीय अर्थव्यवस्था*, हिमालया पब्लिशिंग हाऊस.
३) डॉ. सुखदेव खंदारे, २०१३, *भारतीय अर्थव्यवस्था*, एज्युकेशनल पब्लिशर्स.
४) *भारतीय अर्थव्यवस्था*, वार्षिक अहवाल २०१३-१४ प्रतियोगिता दर्पण.
५) रंजन कोळंबे, *भारतीय अर्थव्यवस्था*, भगीरथ प्रकाशन
६) www.planing.commission.in

# महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा विकास

**हिरालाल वामन चव्हाण**, जळगाव,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२३९१५६४४

शोषणमुक्त समाज निर्माण करणे, गरजू आणि दुर्बल घटकांना एकत्रित करून संघटनेच्या माध्यमातून आवश्यक सेवा व उत्पादन हाती घेणे, ते ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालविणे, सर्व गरजुंना मुक्त सभासदत्व देणे, समता आणि लोकहितासाठी लोकशाही पद्धतीने कारभार चालविणे या मूळ सहकारी तत्त्वावर आधारलेल्या सहकार चळवळीला देशाच्या अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कृषी पतपुरवठ्याच्या माध्यमातून सुरू झालेल्या सहकार चळवळीने देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेचे औद्योगिक व्यवस्थेत रुपांतर करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाची कामगिरी केल्याचे दिसून येते. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने तर भारतातल्या सहकारी चळवळीला विशेष महत्त्व असून ग्रामीण जीवनात लक्षणीय बदल घडवून आणण्याचे एक प्रतिमान या चळवळीच्या निमित्ताने भारतात विकसित झाले. प्रदीर्घ काळ यशस्वी वाटचाल करणारी ही चळवळ मात्र आज संकटात सापडलेली दिसते. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाच्या आव्हानांबरोबरच अनेक समस्यांमुळे सहकारी संस्था अडचणीत आलेल्या आहेत. प्रस्तुत निबंधात महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या प्रगतीवर व सद्यस्थितीवर संक्षिप्त प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत निबंधाचे लिखाण खालील प्रमुख उद्देशाने केलेले आहे.

१) महाराष्ट्र सहकार संस्थांच्या प्रगतीचा आढावा घेणे.

२) सहकारी चळवळीचे आर्थिक सामाजिक विकासातील योगदानाचा अभ्यास करणे.

३) सहकारी संस्थांपुढील समस्या व त्यावरील उपाय योजनांचा आढावा घेणे.

प्रस्तुत निबंधाच्या लेखनासाठी पुढील गृहीतके स्वीकारण्यात आली आहेत.

१) राज्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासात सहकारी संस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

२) सहकारी संस्थांच्या गुणात्मक विकासापेक्षा संख्यात्मक विकास अधिक झालेला आहे.

३) कृषी वित्तपुरवठ्यात सहकारी संस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून कर्जाच्या थकबाकीमुळे या संस्था अडचणीत सापडल्या आहेत.

प्रस्तुत निबंध प्रामुख्याने द्वितीयक स्वरुपाच्या माहितीवर आधारलेला आहे. विविध प्रकारचे प्रकाशित अप्रकाशित तसेच शासकीय किंवा अशासकीय लिखित साहित्यातील माहिती व विचारांचा आधार घेण्यात आला आहे.

**सहकार चळवळीचा उगम व विकास:**

सहकारी चळवळीला स्वातंत्र्यापूर्वीच्या अनेक वर्षापासून सुरूवात झाली असली तरी २५ मार्च १९०४ रोजी पास झालेल्या पहिल्या सहकारी कायद्याने सहकार चळवळीची विधिवत सुरुवात झाली. त्यानंतर १९१२ मध्ये दुसरा सहकार कायदा पास करण्यात आला. महाराष्ट्र राज्यांची स्थापना झाल्यानंतर लगेचच २६ जानेवारी १९६२ पासून संपूर्ण महाराष्ट्रात संस्था अधिनियम १९६० लागू करण्यात आला. वेळोवेळी यात सुधारणा करून सहकार चळवळीला निश्चित दिशा ठरवून देण्यात देशात राज्याची सहकार चळवळ अग्रेसर मानली जाते. महाराष्ट्रातील सहकार चळवळीला फार मोठी परंपरा असून राज्यातील सहकार चळवळीने देशात एक वेगळा ठसा उमटवलेला आहे. म्हणूनच देशातील सहकार चळवळीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. देशातील एका भागात असलेली सहकारी चळवळ संपूर्ण देशाचे स्वरुप बदलवून टाकते म्हणून माझी इच्छा आहे की महाराष्ट्रातील सहकार चळवळीतील काही क्षेत्राचे अनुकरण इतर राज्यांनी करावे, असे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू म्हणाले होते. याचे श्रेय या चळवळीचे आद्यप्रवर्तक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, वैकुंठभाई मेहता, सर विठ्ठलदास ठाकरसी, डॉ.धनंजयराव गाडगीळ, वसंतदादा पाटील, गोपाळकृष्ण गोखले, यशवंतराव चव्हाण यांना जाते. या नेत्याने सहकार चळवळीत त्यागाच्या भावनेतून कार्य केले. त्याचे फळ म्हणून सन २०१४ अखेर राज्यात २,३०,२९५ एवढ्या विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन झाल्या असून या संस्थांचे ५०९ लाख सभासद आहेत. ३,६१,३१५ कोटी रुपयांचे खेळते भांडवल असणाऱ्या या संस्थांकडे १,६६,१५५ कोटी रुपयांच्या ठेवी असून १,२६,५१६ कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले आहे. थकबाकी या संस्थांपुढील एक प्रमुख समस्या असून २०१४ अखेर थकबाकीची रक्कम १,२२,४९९ कोटी इतकी प्रचंड आहे. यात कृषी व बिगर कृषी सहकारी पतसंस्था, पणन संस्था, शेतमाल प्रक्रिया करणाऱ्या संस्था, सामाजिक सेवा करणाऱ्या सहकारी संस्थांचा समावेश होतो.

**कृषी वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था:**

कृषी वित्तपुरवठ्याच्या माध्यमानेच राज्यात सहकार चळवळीची सुरुवात झाली आहे. राज्यात कृषी वित्तपुरवठ्याची त्रिस्तरीय यंत्रणा अस्तित्वात आहे. कृषी वित्तपुरवठा आणि विकासात या यंत्रणेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. राज्यपातळीवर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक स्थापन करण्यात आली असून प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची स्थापना करण्यात आली आहे. गाव पातळीवर स्थापन करण्यात आलेल्या प्राथमिक पतसंस्था या त्रिस्तरीय यंत्रणेचा पाया आहेत.

### महाराष्ट्र राज्य सहकारी बँक:

सहकारी क्षेत्रात वित्तीय पुरवठा करणारी ही शिखर संस्था आहे. १९२१ साली स्थापन झालेल्या मुंबई मध्यवर्ती सहकारी बँकेलाच १ मे १९६१ रोजी राज्य सहकारी बँकेचा दर्जा प्राप्त झाला. आज या बँकेचे २००० सभासद असून सहकारी वित्तपुरवठ्यात या बँकेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. कृषी आणि कृषी संलग्न सहकारी संस्थांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत अर्थपुरवठा करण्याचे कार्य ही बँक करत असते. बँकेच्या आर्थिक स्थितीचे अवलोकन करता वित्तीय क्षेत्रात बँकेने लक्षणीय प्रगती केल्याचे दिसून येते. त्याची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

१)१९६०-६१ मध्ये बँकेचे खेळते भांडवल ५२५४ लक्ष रुपये होते. २०१४ अखेर ते २३६५७ कोटी रुपये झाले.

२)१९६०-६१ या बँकेकडे २१५३ लक्ष रुपयाच्या ठेवी होत्या.२०१४ अखेर त्या १३४७५ कोटी रुपयाच्या ठेवी झाल्या.

३) १९६१-६२ मध्ये बँकेने ७७८५ लक्ष रुपयाचे कर्ज वाटप केले होते. २०१४ मध्ये कर्ज वाटपाचे प्रमाण १६०६० कोटी रुपयांपर्यंत पोहचले.

४)१९६०-६१ मध्ये ३७४२ लाख रुपये कर्ज येणे होते. २०१४ वर्ष अखेर येणे कर्जाची रक्कम १०७३१ कोटी रुपयापर्यंत पोहोचली.

५)१९६०-६१ मध्ये बँकेची ८४ लाख रुपये थकबाकी होती. २०१४ अखेर थकबाकीची रक्कम १४२० कोटी रुपयांपर्यंत पोहचली.

### जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका:

राज्यातील सहकारी वित्तपुरवठ्यात हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. राज्य सहकारी बँक आणि प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था व इतर सहकारी संस्था यांच्यात प्रभावी दुवा म्हणून या बँकांचे कार्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. या बँकांच्या प्रगतीची काही ठळक आर्थिक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

१) राज्यात ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या जवळपास ४००० संस्था कार्यरत आहे.

२) १९६०-६१ मध्ये बँकांची एकूण सभासद संख्या ५७ हजार होती. सन २०१४ अखेर ती १.७३ लाख झाली.

३) १९६०-६१ मध्ये या बँकांकडे ६०९३ लाख रुपयांचे खेळते भांडवल होते. २०१४ अखेर ७७,७८२ कोटी रुपये झाले.

४) १९६०-६१ मध्ये बँकांकडे २६४७ लाख रुपयाच्या ठेवी जमा झाल्या होत्या. त्या २०१४ अखेर ५७३७८ कोटी रुपयापर्यंत पोहचल्या.

५) १९६०-६१ मध्ये जिल्हा बँकांनी २४६५ लाख रुपयांचे कर्जवाटप केले. सन २०१४ अखेर ४०४६३ कोटी रुपयांचे कर्ज वाटप झाले.

६) १९६०-६१ मध्ये ४६० लक्ष रुपयांचे कर्ज थकीत होते. २०१४ अखेर थकबाकी ९८०१ कोटी रुपयांपर्यंत पोहचली.

### प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था:

शेतकऱ्यांना त्रिस्तरीय यंत्रणेमार्फत केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठा पद्धतीत प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांना सगळ्यात महत्त्वाचे पायाभूत स्थान आहे. संपूर्ण कृषी सहकारी पतपुरवठा यंत्रणा या पायावर उभी असते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत झालेला कर्जपुरवठा नियोजित धोरणानुसार शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे व

तो मुदतीत सव्याज वसूल करण्याचे प्रमुख कार्य या संस्था करतात. या बरोबरच विविध प्रकारच्या सेवा देण्याचे कार्यही या संस्था करीत असतात. या संस्थांच्या आर्थिक स्थिती अथवा प्रगतीची काही ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील-

१) १९६०-६१ मध्ये राज्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांची एकूण संख्या १८,९९८ होती. ती सन २०१४ अखेर २१,१८५ झाली.

२) १९६०-६१ मध्ये या संस्थांच्या सभासदांची संख्या केवळ १८२७ होती त्यात लक्षणीय वाढ होत २०१४ अखेर ती १५७ लाखापर्यंत पोहचली.

३) १९६०-६१ मध्ये या संस्थांचे खेळते भांडवल ५,६६८ लाख रुपये होते. तर २०१४ अखेर ते १६,८८७ कोटी रुपये झाले.

४) १९६०-६१ मध्ये संस्थांकडे ९९ लाखाच्या ठेवी होत्या. २०१४ अखेर ३६७० कोटी रुपयांच्या ठेवी झाल्या.

५) १९६०-६१ या वर्षात संस्थांनी फक्त ४०.३६ लाख रुपयाचे कर्ज वाटप केले होते.२०१४ या वर्षात ८५६७ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले.

६) १९६०-६१ मध्ये या संस्थांचे एकूण ८६५ लाख रुपयाचे कर्ज थकले होते. ही थकबाकी वाढत जाऊन सन २०१४ अखेर ४२२६ कोटी रुपयांपर्यंत पोहचली.

७) १९६०-६१ मध्ये ४०४२ संस्था तोट्यात होत्या. २०१२ वर अखेर तोट्यातील संस्थांची संख्या ११,२७९ पोहचली आहे.

कृषी सहकारी वित्तपुरवठ्याच्या त्रिस्तरीय यंत्रणेची ठळक वैशिष्ट्ये पाहत राज्यांच्या स्थापनेनंतर या यंत्रणेच्या विकासाला गती व नवी दिशा मिळाली. कृषी पतपुरवठ्यात या यंत्रणेचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण राहिले. मात्र संस्थांचे भांडवल, ठेवी यात अपेक्षित वाढ झाली नाही. ठेवी संकलनातील उदासीनता, अपुरे भागभांडवल यामुळे ही यंत्रणा आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी होऊ शकली नाही. अनियमितता, वाढती थकबाकी आणि तोट्यामुळे ही यंत्रणा अडचणीत आली आहे. या यंत्रणेचाच एक भाग असणारी राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक तर अवसायानात गेली आहे.

### कृषी प्रक्रिया सहकारी संस्था:

राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांचे योगदान महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांना उत्पादनाचा वाजवी मोबदला व ग्रामीण उद्योगाच्या वाढीला चालना मिळून या संस्थामुळे रोजगार निर्मितीला चालना मिळाली आहे. परिणाम ग्रामीण जीवनमान व राहणीमान उंचावण्यास हातभार लागल्याचे दिसून येते. या संस्थांमध्ये प्रामुख्याने सहकारी साखर कारखाने, कापूस पिंजणी व गासड्या बांधणी करणाऱ्या संस्था, सुतगिरण्या, दुग्ध सहकारी संस्था, हातगार व यंत्रमाग संस्था तसेच मत्स्य सहकारी संस्थांचा समावेश होतो. राज्य शासनातर्फे अशा प्रक्रिया संस्था स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य दिले जाते. सन २०१४ अखेर राज्यात अशा ४८१४७ कृषी प्रक्रिया संस्था कार्यरत होत्या. या संस्थांचे एकूण ८५.३० लाख सभासद होते. यातील प्रमुख प्रक्रिया सहकारी संस्थांची प्रगती दर्शविणारी सद्यस्थितीची वैशिष्ट्ये थोडक्यात पुढीलप्रमाणे-

### सहकारी साखर कारखाने:

सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीत महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. भारतातील एकूण साखर कारखान्यांपैकी ३२ टक्के साखर कारखाने राज्यात आहेत. सन २०१४ अखेर महाराष्ट्रात २०२ साखर कारखान्यांपैकी ११९ कारखाने सुरु होते. संदर्भ वर्षात ४८६.७२ लाख मेट्रीक टन उसाच्या गाळपातून ५६.५२ मेट्रीक टन साखर उत्पादन करण्यात आले. राज्यातील बहुतांशी साखर कारखान्यांची स्थिती समाधानकारक नसून ८९ साखर कारखाने तोट्यात सुरु आहेत.

### सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थाः

सन २०१४ अखेर महाराष्ट्रात ६७२ हातमाग २१३६ यंत्रमाग संस्था होत्या. पैकी ३२५ हातमाग (४८.३६%) व ११७५ यंत्रमाग (५५%) संस्था तोट्यात होत्या. संदर्भ वर्षात या संस्थांनी अनुक्रमे ७७ व ७० कोटी रुपयांचे उत्पादन केले.

### दुग्ध सहकारी संस्थाः

यामध्ये सहकारी दुग्ध संस्था व सहकारी दुग्ध संघाचा समावेश होतो. सन २०१४ अखेर महाराष्ट्रात २६५७७ सहकारी दुग्ध संस्था व संघ होते. पैकी ५० टक्के सहकारी संस्था तर ३८ टक्के दुग्ध संघ तोट्यात होते. यावर्षी दोघांना एकूण १०८.३३ कोटी रुपयांचा तोटा झाला होता. या दोन संस्थांनी खरेदी केलेल्या दुधाची एकत्रित किंमत रु.१३३५.९३ कोटी रुपये होती.

### बिगर कृषी सहकारी पतसंस्थाः

राज्याच्या अर्थव्यवस्थेत बिगर कृषी सहकारी पतसंस्थांनाही महत्त्वाचे स्थान आहे. २०१४ अखेर महाराष्ट्रात एकूण २२,८४७ बिगर कृषी सहकारी पतसंस्था होत्या. यात ५२६ नागरी सहकारी बँका, १५,००४ नागरी सहकारी पतपुरवठा संस्था, ७१३७ पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्थांचा समावेश आहे. जवळपास २ कोटीच्या घरात सभासद असणाऱ्या या संस्थांपैकी ५५०२ म्हणजे २४ टक्के संस्था तोट्यात आहेत. ६७५५ कोटी रुपयांचे कर्ज थकले आहे. पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था वगळता इतर पतसंस्थांची परिस्थिती चिंताजनक आहे.

### सहकारी बाजार संस्थाः

राज्यात सहकारी बाजार सोसायटीची त्रिस्तरीय यंत्रणा कार्यरत आहेत. त्यात राज्यपातळीवर राज्य सहकारी बाजार फेडरेशन, जिल्हास्तरावर जिल्हा सहकारी बाजार संस्था आणि ग्रामीण पातळीवर प्राथमिक सहकारी बाजार संस्थांचा समावेश होतो. २०१४ अखेर राज्यात १६०२ सहकारी बाजार सोसायट्यांचे १३.८१ लाख सभासद होते. १३२० कोटी खेळते भांडवल असताना या संस्थांपैकी जवळपास ३४% म्हणजे ५८२ संस्था तोट्यात आहेत.

उपरोक्त अभ्यासावरुन असे दिसून येते की,

१) महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासात जडण-घडणीत सहकारी संस्थांचा वाटा महत्त्वाचा आहे.

२) वेगवेगळ्या क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन होऊन त्यांचा विस्तार वाढल्याने विविध क्षेत्रांचा विकास होण्यास फार मोठा हातभार लागला आहे.

३) कृषी वित्तपुरवठ्यात सहकारी वित्तपुरवठ्याचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असून यामुळे कृषी वित्तपुरवठ्यात लक्षणीय वाढ होऊन कृषी विकास होण्यास फार मोठा हातभार लागला आहे.

४) १९६०-६१ नंतर सहकारी संस्थांची संख्या, सभासदांची संख्या, भागभांडवल, संस्थाचे

खेळते भांडवल, संस्थाकडील ठेवी यात लक्षणीय वाढ झाली असली तरी अपेक्षित वाढ झाल्याचे दिसून येत नाही.

५) अनियमितता, वाढती थकबाकी, तोटा सहकारी संस्थां पुढील प्रमुख समस्या असून यामुळे सहकारी संस्था व एकूणच सहकारी चळवळ अडचणीत आली आहे.

थोडक्यात कृषी पतसंस्थाप्रमाणेच कृषी प्रक्रिया व बिगर कृषी सहकारी पतसंस्थांचे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या विकासातील योगदान महत्त्वाचे असले तरी विद्यमान आर्थिक परिस्थिती पाहता या संस्था अडचणीत असल्याचे स्पष्ट होते. भ्रष्टाचार, अनियमितता, अकार्यक्षमता, अपुरे भांडवल, नियमबाह्य कर्जवाटप, थकबाकी अशा विविध कारणांनी दिवसेंदिवस तोट्यात चालणाऱ्या संस्थांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे एकूणच सहकारी चळवळ अडचणीत सापडल्याचे चित्र स्पष्ट होते.

उपाययोजना:

सहकार चळवळीचा विकास व्हावा. त्यात सुधारणा व्हावी, सहकारी संस्थांची स्थिती मजबूत व्हावी यासाठी सरकारने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या धोरणात महत्त्व दिल्याचे दिसून येते. सरकारने प्रत्येक पंचवार्षिक योजनेत सहकारी चळवळीच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सहकाराला लोकशाहीतील आर्थिक नियोजनाचे अत्यावश्यक साधन मानण्यात आले. देशातील ३० टक्के जनता सहकारी संस्थांच्या कक्षेत आणण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून ही योजना राबविण्यात आली. दुसऱ्या योजनेतही सहकार क्षेत्राची उभारणी नियोजित विकासाचा एक भाग मानण्यात येऊन राष्ट्रीय धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले व त्यासाठी आतापर्यंतच्या प्रत्येक पंचवार्षिक योजनेत सहकार चळवळीच्या विकासासाठी भरीव आर्थिक तरतुदीबरोबरच प्रयत्न केल्याचे दिसून येते. याचाच भाग म्हणून रिझर्व्ह बँक, केंद्र सरकार व राज्य सरकारांनी वेळोवेळी वेगवेगळ्या समित्या तसेच अभ्यास गट स्थापन केल्याचे दिसून येते. या समित्यांनी सहकारी संस्थांच्या संदर्भात सखोल अभ्यास करुन केलेल्या सूचना सरकारने वेळोवेळी स्वीकारल्याने सहकारी चळवळीचा विकास होण्यास फार मोठा हातभार लागला आहे. १९५१ मध्ये ए.डी.गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या अखिल भारतीय पतपाहणी समितीने सादर केलेला अहवाल तर सहकाराची गीता म्हणून ओळखला जातो. सहकारी अपयशी झाले असले तरी ते यशस्वी होणे आवश्यक असल्याचे मत मांडून अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी या समितीने केलेल्या आहेत. या प्रमाणेच निकोलसन समिती १८९२, गाडगीळ समिती-१९४४, कर्वे समिती- १९५६, मेहता समिती-१९५९, मिर्धा समिती-१९६४, दाते अभ्यासगट १९७२, शिवरामन समिती १९७९, व्यास समिती २००० आणि वैद्यनाथन कार्यदल -२००४ या समित्यांनी सहकारी चळवळीचा अभ्यास करुन महत्त्वपूर्ण सूचना केलेल्या आहेत.

सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती मजबूत व्हावी त्यांच्या कार्याला चालना मिळावी यासाठी केंद्र सरकारने ९७वी घटना दुरुस्ती करुन घटना कायदा २०११ फेब्रुवारी २०१२ पासून लागू केलेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र सरकारनेही महाराष्ट्र सहकारी संस्था सुधारणा अध्यादेश २०१३

निर्गमित केलेला आहे. त्याचा निश्चितच लाभ सहकार चळवळीला होईल अशी अपेक्षा आहे.

थोडक्यात सहकारी संस्थांची सद्यस्थिती अभ्यासता ती फारशी समाधानकारक नाही असे लक्षात येते. संयुक्त राष्ट्राच्या सर्वसाधारण परिषदेने २०१२ हे वर्ष सहकाराचे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित केले होते. सहकाराचे सामाजिक व आर्थिक विकासात प्रामुख्याने दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती व सामाजिक ऐक्य यातील योगदान ठळकपणे विशद केले आहे. सहकारी उपक्रम उत्तम विश्व घडविते हा या वर्षाचा मुख्य विषय होता. त्या अनुषंगाने सहकार चळवळीशी जुळलेल्या प्रत्येक घटकाने ह्या संस्था वाचवण्यासाठी आणि त्यांना सक्षम करण्यासाठी योगदान देण्याची गरज आहे. तरच सहकारी संस्था टिकून राहतील.

**संदर्भ सूची:**


१) घाणेकर वि.वि., २००४, *सहकार चळवळीचे १०० वर्षांचे अवलोकन*, प्रथमावृत्ती.

२) गाडगीळ धं. रा., *सहकारी चळवळीचे समालोचन*, सुलभा ब्रम्हे संपादित धं.रा गाडगीळ, लेखसंग्रह खंड-२

३) क्षीरसागर पां.श., हवालदार ज.ब., भगत भा.तु., *सहकारी समित्यांचे अहवाल*, १९७३

४) *National Co-operative Union of India,* Indian Co-operative Movement yearly Statistical profile.

५) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - २०१४-१५


---

### भावपूर्ण श्रध्दांजली

### मनोहर गाडगीळ

पत्रपंडित पां. वा. गाडगीळ स्मृती उपक्रमास अखंडपणे आर्थिक मदत करणारे श्री.मनोहर गाडगीळ यांचे दु:खद निधन झाले. मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली. मराठी अर्थशास्त्र परिषद त्यांच्या ऋणात राहू इच्छित असून गाडगीळ कुटुंबियांवर ओढवलेल्या दु:खात सहभागी आहे. त्यांच्या पश्चातही सदर उपक्रम सुरू ठेवावा असे सुधाताई गाडगीळ यांनी कळविले आहे.

- कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

# आधुनिक किटकनाशके: आर्थिक-सामाजिक परिणाम

**दिलीप रामभाऊ जगताप, नंदुरबार,**
गजमल तुळशीराम पाटील महाविद्यालय,
भ्रमणध्वनी: ९८२३६९२३६०.

भारत हा कृषीप्रधान देश असून सुमारे ५२% जनता उदर निर्वाहासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे कृषीक्षेत्रावर अवलंबून आहे. देशाची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येचा अन्न, वस्त्र, व निवारा यासोबतच अन्य गरजा सुध्दा कृषीक्षेत्रावरच अवलंबून आहेत. देशाचा औद्योगिक विकास पर्यायाने आर्थिक विकास कृषी क्षेत्राच्या विकासावरच अवलंबून आहे. म्हणूनच कृषीक्षेत्राचे उत्पादन वाढविणे आवश्यक ठरले. त्यातूनच १९६६ मध्ये भारतात हरित क्रांती झाली. कृषी धोरणांतर्गत कृषी अभियांत्रिकी तंत्रात बदल झाले. या तंत्रज्ञानामुळे निरनिराळ्या प्रकारची किटकनाशके बाजारात येऊ लागली. जास्त उत्पादन घेण्याच्या हव्यासातून किटकनाशकांचा वापर वाढत आहे. कृषी धोरणात फक्त उत्पादन वाढविणे महत्वाचे ठरते. या गोष्टीला महत्त्व नसते की, किटकनाशकांच्या अमर्याद वापरामुळे शेत जमिनीची सुपीकता दीर्घ काळासाठी नष्ट होते व मानवाच्या स्वास्थ्याच्या हानीला कारणीभूत ठरते. हरितक्रांतीमुळे उत्पादन वाढले आहे परंतु हरित क्रांतीच्या बदल्यात लोकांच्या जीवाशी खेळले जात आहे. इतर देशांमध्ये बंदी घातलेली ६० पेक्षा जास्त किटकनाशके भारतात सर्रास वापरली जात आहेत. केंद्र शासनाने स्थापन केलेल्या एका तज्ज्ञांच्या समितीने या प्रकरणी अभ्यास करुन या किटकनाशकांचा वापर चालू ठेवण्याची शिफारस केली आहे या किटकनाशकांचा वापर चालू ठेवण्यात यावा अशी भूमिका कृषी मंत्रालय घेत असल्याचे दिसून येते. या किटकनाशकांचे देशातील जनतेच्या आर्थिक, सामाजिक जीवनावर व आरोग्यावर घातक परिणाम होत आहेत.

**किटकनाशके-अर्थ :**

किटकनाशके म्हणजे जैविक अथवा रासायनिक पदार्थांचे असे मिश्रण असते की, जे जीवजंतू तसेच कीड व बुरशीमुळे होणाऱ्या दुष्परिणामांना कमी करण्यासाठी किंवा कीड नष्ट करण्यासाठी, त्यांना मारण्यासाठी किंवा त्यांच्या पासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी वापरले जाते यांचा उपयोग प्रामुख्याने कृषी

क्षेत्रात फळे, भाजीपाला व रोपांना वाचविण्यासाठी केला जातो.

मानवनिर्मित रासायनिक द्रव्यांचा वापर करुन (जैविक) पिकांचे उत्पादन वाढविता येते. कीटक अथवा कीड नष्ट करण्यासाठी अथवा मारण्यासाठी मानवनिर्मित रसायनांचा वापर करतात त्यांना किटकनाशके असे म्हणतात. कीड नाशकांमध्ये किटकनाशके, बुरशी नाशके, उंदीर नाशके, सुत्रकृमीनाशके, प्रतिजैविके आणि अन्य विषारी रसायनांचा समावेश होतो. सर्व कीडनाशके कमी-अधिक प्रमाणात विषारी असतात.

**किटकनाशकाचे आर्थिक परिणामः**

जगभरातील कृषीक्षेत्रात प्रतिवर्षी जवळपास २.५ दशलक्ष टन कीडनाशकांचा वापर केला जातो. या कीडनाशंकाचे मुल्य सुमारे २० अब्ज डॉलर इतके आहे. यावरुन लक्षात येते की, कीडनाशकांची बाजारपेठ किती प्रचंड आहे. फक्त अमेरिकेत दरवर्षी सुमारे ५ लाख टन, ६०० प्रकारची विभिन्न किटकनाशके वापरली जातात. त्यांचे बाजारमूल्य ४.१ अब्ज डॉलर इतके जास्त आहे. भारताच्या बाबतीत विचार करावयाचा झाल्यास किटकनाशकांच्या उत्पादनाच्या बाबतीत भारताचा जगात चौथा क्रमांक आहे. एवढेच नाहीतर आशिया खंडात भारत किटकनाशकांचा सर्वात मोठा उत्पादक देश आहे. भारतीय किटकनाशक उद्योगात ८५००० मेट्रिक टन एवढे अबब उत्पादन होते. सन २००९ -१० मध्ये ८२००० मेट्रिक टन एवढे उत्पादन स्थीर होते. मुल्याच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास भारतीय किटकनाशक उद्योगाचा आकार निर्यातीसहीत १८० अब्ज रुपये इतका प्रचंड आहे.

एमको किटकनाशक लि. कं. चे अध्यक्ष व व्यवस्थापक प्रदिप यांच्या मते, अमेरिकेत प्रतिएकर १६ किलो किटकनाशके वापरली जातात. त्या तुलनेत भारतात प्रतीएकर फक्त ८०० ग्रॅमच किटकनाशके वापरली जातात. तरीही त्याचे आर्थिक परिणाम भारतातील मानवाच्या जीवनावर होत असल्याचे आढळते.

किटकनाशकांच्या वापरामुळे उत्तरोत्तर शेतकऱ्याची आर्थिक स्थिती बिघडत चाललेली आढळून येते. किटकनाशकांच्या अमर्याद वापरामुळे शेतजमीन नापीक होऊन अकिफायतशीर ठरुन समस्या वाढवित आहे. रासायनीक किटकनाशकांच्या अतोनात वापरामुळे अन्न विषारी होत आहे. किटकनाशकांनाही कीटक प्रतिसाद देईनाशी झाली आहेत. त्यामुळे अधिक किटक जन्माला येतात व पिके फस्त करतात. परिणामतः शेतकरी उत्पन्न घटल्यामुळे आर्थिक संकटात सापडत आहेत. कीटक नाशकांच्या उत्पादक कंपन्या बहुराष्ट्रीय असल्यामुळे त्या किटकनाशकांच्या किंमती अव्वाच्या सव्वा आकारात आहेत त्यामुळे शेतकऱ्यांच्या खिशातून या कंपन्या पैसा काढत आहेत. आधीच उत्पन्न घटलेले त्यात किटकनाशकांच्या जास्त किमती त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहेत किटकनाशक कंपन्यांसाठी शेतकरी कृषीक्षेत्र मार्केट आहे. परंतु भरपूर उत्पादन मिळविण्याची लालसा देशाच्या अन्नदात्यांना महाग ठरत आहे. शेतकरी लुबाडला जात आहे नागवला जात आहे. त्याचे शोषण होत आहे.

**कीटकनाशकांचे सामाजिक परिणामः**

किटकनाशकांमध्ये एंडोसल्फान, डी.डी.टी.बेंजीन हेक्स क्लोराईड (BHC), एल्ड्रिन, डायेल्ड्रीन, लिडेंन, फोरॅटेब मोनोक्रोटोफॉस,

प्रोफेनोफॉस ॲड सायपरमेथ्रिन, कार्बोफुरन, डायमेंथोरेट/ रोजर, कवुनाल फोस /इकालूक्स, कार्बेरीच कवायफोरीफॉस, फेंथियोन, मालथॉयन, कार्बनडॅशीम व अट्राझीन ही अत्यंत घातक विषारी किटकनाशके म्हणजे विषच आहेत.

किटकनाशकांच्या सामाजिक परिणामात सर्वात अधिक आढळून येणारा परिणाम म्हणजे शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे आत्महत्या करीत आहेत व आत्महत्या करण्यासाठी या किटकनाशकांचाच वापर करीत असल्याचे आढळून येते ही घातक किटकनाशके अन्नसाखळीतून मानवाच्या शरीरात प्रवेश करतात. ही कीटकनाशके मुख्यतः महिलांना हानीकारक ठरत आहेत. महिलांच्या चरबीमध्ये किटकनाशकांचे प्रमाण आढळायला लागले आहे. भारतामध्ये तसेच इतर प्रगतीशील देशामंध्ये शेतात काम करणाऱ्या स्त्रियांच्या शरीरात किटक नाशकांचे प्रमाण आढळून आलेले आहे. किटकनाशकांमुळे स्त्रीयांना गर्भधारणा उशिरा होते. तसेच काही स्त्रीयांना गर्भपाताला सामोरे जावे लागणे, अशा घटना घडत आहेत. कीटकनाशकांचा परिणाम लहान मुलांवर जास्त प्रमाणात होतो. आईच्या दुधातून किटकनाशके मुलांच्या शरीरात येतात. त्यामुळे त्यांच्या मेंदूवर परिणाम होतो त्याचप्रमाणे मज्जा संस्थेवर परिणाम झाल्याचेही अभ्यासातून आढळते.

एंडोसल्फान एक खतरनाक किटकनाशक आहे. त्यामुळे फक्त केरळ राज्यात ४०० पेक्षा अधिक व्यक्ती मरण पावल्या आहेत व ४००० पेक्षा जास्त विकलांग झालेल्या आहेत. त्यामुळे केरळ राज्यात एंडोसल्फान या किटकनाशकावर बंदी आहे.

संशोधनातून सिध्द झालेले आहे की, किटकनाशकांमुळे पिण्याचे पाणी दूषीत होते व त्यातून मानवाच्या शरीरात विषाचा प्रवेश होतो. मानवाच्या मुत्रात अलाचलोर, अट्राझीन आणि डायाझीनान ही कीटकनाशके आढळतात व ती मानवाच्या प्रजनन क्षमतेला बाधा पोहोचवतात. १८ ते २५ वयोगटातील ५ पैकी १ पुरुषांच्या वीर्याला किटकनाशकामुळे बाधा पोहोचते. डी.डी.टी, इथिलीन, ड्रायब्रोभाईड, आरगॅनो फॉस्फेट या किटकनाशकांचा जबर फटका शुक्राणूंच्या संख्येवर बसतो त्यामुळे स्त्रीबीजाला भेदण्याची क्षमताही कमी होते.

किटकनाशके हाताळणाऱ्या शेतकऱ्यामंध्ये वंध्यत्वाचे प्रमाण वाढल्याचे सिध्द झाले आहे. हेच परिणाम लिंडेन, मिथॉक्झिक्लोर, डॉयॉआक्झिन या किटकनाशकांमध्ये दिसून आले आहे. कार्बेडोझिम या बुरशीनाशकामुळे अंडाशयाचे वजन कमी होणे, शुक्राणूंची संख्या घटणे, अंडाशयाचा आकार अनैसर्गिक होणे असे भिन्न घातक परिणाम झाल्याचे स्पष्ट झाले आहेत.

### किटकनाशकाचे आरोग्यावर परिणाम:

बहुसंख्य शेतकरी आपल्या शेतात उत्पादित होणाऱ्या बटाटे, टमाटे, भेंडी, कोबी, वांगी, फळभाज्या, अन्नधान्य एवढेच नव्हेतर चीकू, द्राक्षे, संत्री, आंबे, केळी व सफरचंद डाळींब यासारख्या खाद्यपदार्थांवर मोठ्या प्रमाणात किटकनाशकांची फवारणी करतात. त्या किटक नाशकांचे विषारी तत्व फळांच्या बियांमध्ये प्रवेश करतात. या किटकनाशकांची रासायनिक तत्वांचा प्रवास नदीचे पाणी व हवेत सुरु राहतो. पिण्याच्या पाण्यातून व हवेतून पुन्हा मानवाच्या शरीरात प्रवेश

करतात. हे विषारी पदार्थ आमच्या शरीरातील पेशींवर हल्ला करतात. तेथेच साठतात त्यामुळे अनेक प्रकारचे गंभीर रोग व इलाज नसलेल्या अतिघातक कॅन्सरला जन्म देतात.

किटकनाशके वापरल्यामुळे कृषीउत्पादन चारपट वाढते हे जरी खरे असले तरी त्यामुळे भरुन न काढता येणारे नुकसान होते. फवारणी, धुरळणी किंवा धुरीजन्म किटकनाशके हाताळतांना त्वचेतून डोळे, कान, नाक आणि जांघेतील भागातून किटकनाशके शरीरात अधिक झटपट प्रवेश करतात सर्वसाधारण नागरिकांपेक्षा शेतकरी व फवारणी करणाऱ्या प्रामुख्याने स्त्रियांमध्ये प्रोस्टेट कर्करोगाचे प्रमाण आढळते. या शेतकरी पुरुष स्त्रियांच्या शरीरातील प्रमुख अवयवावर उदा.मेंदू, फुफ्फूस, यकृत, मुत्रापिंड, विविध ग्रंथी प्लिहा, श्वसनसंस्था, पचनसंस्था, प्रजननसंस्था यांच्यावर होतो आणि त्यामुळे कर्करोग, कावीळ, नपुंसकता, वंध्यत्व, आकस्मिक गर्भपात, मुदतपूर्व प्रसूती, अर्भकाचा मृत्यू, जन्मजात व्यंग, मतिमंदता, पंडुरोग, मुत्रपिंडाचे विकार, जनुकीय बदल, मेदूंचे विकार, अंधांगवायू व दमा इत्यादी विकार होतात

**निष्कर्ष:**

किटकनाशकांचे इतके भयानक दुष्परिणाम असले तरी इतर देशांमध्ये कडक निर्बंध असलेली ६० पेक्षा जास्त किटकनाशके भारतात वापरात आणली जात आहेत. लोकांच्या जीवाशी खेळ होत आहे, असा आरोप होत आहे.

किटकनाशकांच्या संपर्कामुळे मुलांच्या लैंगिक परिपक्वतेत उशीर होतो. मेंदूवर परिणाम होतो व बुध्दीच्या विकासावर परिणाम होतो. आईच्या दुधातून किटकनाशके बालकात प्रवेश करतात म्हणजेच भविष्यात जन्माला येणारी पिढी आजारी, बाधीत, नपूंसक असेल?

किटकनाशकांचा वापर करुन उत्पादित झालेली अन्नधान्ये पदार्थ खाऊन फक्त मानवाच्या स्वास्थ्यावरच प्रभाव पडत नाही तर पशू-पक्षी व शेतकऱ्याचे मित्र ठरत असलेले इतर किटक यांच्यावरही परिणाम होतो व त्यामुळे एकंदर पर्यावरण सुध्दा प्रभावित होते.

किटकनाशकांमुळे झालेले परिणाम प्रदूषण कमी करण्यासाठी भारतासमोर पर्यायी पध्दती अथवा सेंद्रिय शेती शिवाय पर्याय नाही. त्यातूनच भावी पिढीला वाचवता येईल त्यासाठी शाश्वत शेतीची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची:**


१. डेव्हीड पिमेंटेल, (Nov -1992) *इन्होरनमेटंल अँड इकॉनामिक अँड ईकॉनामिक कॉस्टस ऑफ पेस्टीसाईड युज,* बॉयोसायन्सेस व्हाल्यूम ४२, नं. १०, पृ.७५०-७६०.

२. *पर्यावरण विमर्श* विविध अंक.

३. डॉ.वसंत काळे,डॉ.संतोष वानखेडे ॲग्रोवन १५.१०.२०११ महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी (कीटकशास्त्र विभाग).

४. *किसान की आवाज* नवी दिल्ली विविध अंक.

५. विक्रम हरकरे मुंबई, लोकसत्ता १२ ऑगस्ट २०११ इंटरनेट आवृत्ती.

६. ॲग्रोवन, १० सप्टेंबर २०१२

7. http:www.jstor.org

8. http: scientifizamerian.com

9. beyondthecurtain.wordpress.com

10. Economic & Political Weekly.

# भारतातील भूमिहीन शेतमजुरांचे अध्ययन

**चंद्रकांत नामदेव कोकाटे**, औरंगाबाद,
सहयोगी प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.
भ्रमणध्वनी ९९२११५३५२१
ईमेल: cnkokate@yahoo.com

**शिवशंकर सिताराम लेकुरवाळे**, औरंगाबाद,
पीएच्.डी. संशोधक विद्यार्थी,
अर्थशास्त्र विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.
भ्रमणध्वनी ८६९८५०७३३५
ईमेल : shivshankarlekurwale@gmail.com

आर्थिक विकासासाठी मानवी भांडवल हा घटक अतिशय महत्त्वाचा असून देशाच्या विकासासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. सद्यस्थितीत देशातील ६५ टक्केपेक्षा अधिक लोकसंख्या आजही कृषी क्षेत्रावर अवलंबून असल्याचे दिसते. भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेमध्ये सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती प्रतिकुल असलेल्या गरीब भूमिहीन शेतमजुरांचे प्रमाण असंघटीत क्षेत्रामध्ये अधिक असल्याचे दिसून येते.

राष्ट्रीय श्रम आयोगाच्या मते - भूमिहीन शेतमजुर म्हणजे असे शेतमजुर की ज्यांच्याकडे शेती करण्यासाठी स्वत:च्या मालकीची जमीन नसते अशा शेतमजुरांना भूमिहीन शेतमजुर असे म्हणतात. आज मोठ्या प्रमाणामध्ये भूमिहीन शेतमजुर असंघटीत, अशिक्षित आणि अकुशल आहेत. त्यांना शेतीतील यंत्र चालविण्याचे कोणतेही मुलभूत कौशल्य नाही. या भूमिहीन शेतमजुरांचे उत्पन्न शेतमजुरीवर अवलंबून असले तरी त्यांना अधिक तास कष्टदायक अवघड काम करुन कमी मजुरी दिली जाते. त्यांना मिळणारा शेतीतील रोजगार अनिश्चित

आहे. भारतीय शेती निसर्गावर अवलंबून असून अलिकडे निसर्गातील पर्जन्यमानाचा लहरीपणा वाढल्यामुळे भूमिहीन शेतमजुरांना बेरोजगारीच्या समस्येला सामोरे जावे लागते. शेतमजुरांना एका वर्षामध्ये सतत रोजगार उपलब्ध होत नसून हंगामी रोजगार उपलब्ध होतो. परिणामी भूमिहीन शेतमजुरांना रोजगारासाठी एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करावे लागते.

राष्ट्रीय श्रम आयोगाने भूमिहीन शेतमजुरांचे दोन भागात विभाजन केले आहे.
१)स्थायी किंवा कायमस्वरुपी भूमिहीन शेतमजुर जे शेतमालकाच्या जमिनीवर वार्षिक आधारावर किंवा हंगामी स्वरुपाच्या आधारावर काम करतात.
२)अस्थायी किंवा अनियमित शेतमजुर जे आपल्या इच्छेनुसार वेगवेगळ्या शेतमालकाकडे काम करतात.

यामध्ये अस्थायी किंवा अनियमित भूमिहीन शेतमजुरांची स्थिती अतिशय बिकट आहे. भूमिहीन शेतमजुरांकडे श्रमाच्या व्यतिरिक्त कोठल्याही उत्पन्नाच्या साधनांची मालकी नसून त्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागतो हे विविध अभ्यासातून दिसून आले आहे. विविध अभ्यासकांनी भूमिहीन शेतमजुरांच्या परिस्थिती संदर्भात जी मते मांडली आहेत त्यातील काही महत्वाच्या अभ्यासाचा आढावा पुढीलप्रमाणे देता येईल.

अतुलकर दिप्ती आणि दुबे लक्ष्मीराणी (२०१२) यांच्या अभ्यासावरुन ९३.३३ टक्के भूमिहीन शेतमजुरांना हंगामी स्वरुपाचे काम मिळत असल्याचे तर ८८.३३ टक्के भूमिहीन शेतमजुरांना असमान मजुरी मिळत असल्याचे आणि ७६.६७ टक्के भूमिहीन शेतमजुरांना अनियमित अल्परोजगार मिळत असल्याचे दिसून आले. थोरात सुखदेव (२०१२) यांना महाराष्ट्रातील अनुसूचित जातीमध्ये ७४.२२ टक्के भूमिहीन शेतमजुरांचे प्रमाण तर अनुसूचित जमातीमध्ये सुध्दा ७४.२२ टक्के आणि इतर मागास वर्गामध्ये ६१.९० टक्के भूमिहीन शेतमजुरांचे प्रमाण आढळले. कुमार विरेन्द्र आणि सिंग बलविर (२०१३) यांना त्यांच्या अभ्यासामध्ये देशातील एकूण श्रमशक्तिपैकी दोन - तृतीयांश शेतमजूर प्रामुख्याने असंघटीत क्षेत्रामध्ये असल्याचे आढळले. त्याचबरोबर अर्थव्यवस्थेतील बिगर कृषी क्षेत्रामध्ये शेतमजुरांना पर्यायी रोजगाराच्या संधीचा अभाव दिसून आला. त्यामुळे शेतमजुरांचे उत्पन्न फारच कमी असल्यामुळे शेतमजुरांची आर्थिक स्थिती खालावलेली असल्याचे दिसून आले. महत्वाचे म्हणजे त्यांना पंजाबमध्ये ८५.३७ टक्के भूमिहीन शेतमजुरांची कुटुंबे कर्जबाजारी असल्याचे दिसून आले. कारण पंजाबमधील मोठे शेतकरी आणि सावकार उच्च व्याजदराने कर्ज वसुल करतात. चंद्रशेखर एस. (२०१४) यांना त्यांच्या अभ्यासामध्ये २००४-०५ ते २००९-१० मध्ये भूमिहीन शेतमजुरांच्या प्रमाणामध्ये २०.६ टक्क्यावरुन २६ टक्क्यापर्यंत वाढ झाली असल्याचे दिसून आले. त्यांना मजुरीच्या रुपाने काही पैसे किंवा वस्तुच्या स्वरुपात पिकातील हिस्सा मिळत होता. भूमिहीन शेतमजुरांची इतर मजुरापेक्षा आर्थिक स्थिती खालावलेली असल्याचे दिसून आले. चंद रमेश आणि श्रीवास्तव एस.के. (२०१४) यांना भारतातील सर्व क्षेत्रातील श्रमिकांच्या वेतनामध्ये मोठ्या प्रमाणात सतत वेगाने वाढ होत असताना कृषी क्षेत्रातील शेतमजुरांची मजुरी मात्र कमी वेगाने

वाढत असल्याचे दिसून आले.

थोडक्यात असे म्हणता येते की, इतर कोणत्याही व्यवसाय अथवा वर्गापेक्षा शेतमजूर या प्रवर्गाची स्थिती वाईट आहे. यामध्ये भूमिहीन शेतमजुरांची स्थिती तर कमालीची दयनीय असल्याचे वरील अभ्यासावरुन दिसून येते.

विविध अभ्यासकांनी केलेल्या अभ्यासावरुन असे दिसून येते की, भूमिहीन शेतमजुरांना असमान मजूरी, हंगामी रोजगार, कर्जबाजारीपणा, असंघटीतपणा, रोजगार संधीचा अभाव यासारख्या अनेक समस्यांचा सामना शेतमजुरांना करावा लागत असल्याचे विविध अभ्यासकांच्या अभ्यासावरुन दिसून येते. अलीकडील काळात शेतकरी असंघटीत मजूर संघटीत मजूर, स्थलांतरीत मजूर, ऊसतोड कामगार अशा विविध मजुरांच्या संदर्भात विविध अभ्यासकांनी अभ्यास केला असला तरी भूमिहीन शेजमजुरावर मात्र फारसे तुलनात्मक संशोधन होताना आढळून येत नाही. त्यामुळेच भारतातील भूमिहीन शेतमजुरांची विभागनिहाय स्थितीची माहिती घेण्याचा प्रयत्न सदरील लेखामध्ये करण्यात आला आहे.

तक्ता क्र.१ मध्ये भारतातील विभाग निहाय भूमिहीन शेतमजुरांची संख्या दर्शविली आहे. २००१ मध्ये पूर्व विभागामध्ये भूमिहीन शेतमजुर २.८६ कोटी एवढे होते त्यात २०११ मध्ये ३.९७ कोटी एवढी वाढ झाली. उत्तरपूर्व विभागामध्ये २००१ मध्ये ११.१८ लाख एवढी भूमिहीन शेतमजुरांची संख्या होती. त्यामध्ये २०११ मध्ये २६.७९ लाख एवढी वाढ झाली. दक्षिण विभागामध्ये २००१ मध्ये ३.०३ कोटी एवढी भूमिहीन शेतमजुरांची संख्या होती. त्यामध्ये २०११ मध्ये ३.५१ कोटी एवढी वाढ झाली. २००१ मध्ये उत्तर विभागामध्ये २.९१ कोटी एवढी प्रचंड वाढ झाली. पश्चिम विभागामध्ये २००१ मध्ये भूमिहीन शेतमजुरांची संख्या २.६५ कोटी होती ती २०११ मध्ये ३.७६ कोटी एवढी अधिक वाढली.

भारतातील एकूण भूमिहीन शेतमजुरांची संख्या २००१ मध्ये १०.६७ कोटी होती ती २०११ मध्ये १४.४३ कोटी इतक्या वेगाने वाढली असल्याचे वरिल तक्त्यावरुन दिसून येते.

तक्ता क्र.१

भूमिहीन शेतमजूर

| अ.क्र. | विभाग | २००१ | २०११ | भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येतील बदल |
|---|---|---|---|---|
| १ | पूर्व विभाग | २८६३५७४४ | ३९७१५३१७ | ३८.६९% |
| २ | उत्तरपूर्व विभाग | १११८५१८ | २६७९१५२ | ३९.६४% |
| ३ | दक्षिण विभाग | ३०३८९८२६ | ३५१२१५०५ | १५.५७% |
| ४ | उत्तर विभाग | १९३०९९२३ | २९१६२६८१ | ५१.०२% |
| ५ | पश्चिम विभाग | २६५२०७९२ | ३७६५४९८५ | ४१.९८% |
| ६ | भारत | १०६७७४८०३ | १४४३३३६४० | ३५.१७% |

*स्रोत: लोकसभा ॲनक्सरी पार्ट बी.*

**भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती:**

भारतातील ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती खालावलेली असल्याचे दिसून येते. अलिकडील काळामध्ये भूमिहीन शेतमजुरांच्या कुटुंबांना कोणत्याही जमिनीची मालकी मिळाली नाही. राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ३२ व्या फेरीनुसार ५१.३२ टक्के भूमिहीन शेतमजुरांच्या कुटुंबांना कोणत्याही जमिनीवर स्वत:ची मालकी मिळाली नाही. साधारणत: एका वर्षामध्ये भूमिहीन शेतमजुरांच्या कुटुंबांना बेरोजगार रहावे लागते. त्यामुळे ते हंगामी स्वरुपाच्या कामाचा शोध घेतात.

तक्ता क्र.२-अ

शेतमजुरांच्या कुटुंबाची उपभोग रचना (रुपयामध्ये)

| अ.क्र. | गट | पहिली ग्रामीण मजुर चौकशी समिती १९६३-६५ | दुसरी ग्रामीण मजुर चौकशी समिती १९७४-७५ | तिसरी ग्रामीण मजुर चौकशी समिती १९७७-७८ | चौथी ग्रामीण मजुर चौकशी समिती १९८३ |
|---|---|---|---|---|---|
| १ | अन्न | ७६० (७३.९) | १९२६ (७८.८) | १९४४ (६८.६) | ३२९५ (६८.७) |
| २ | कपडे आणि पादत्राणे | ६९ (६.७) | ९९ (४.१) | २१५ (७.६) | ३४७ (७.२) |
| ३ | इंधन आणि प्रकाश | ७८ (७.६) | १६४ (६.७) | २०६ (७.३) | ३९२ (८.२) |
| ४ | उत्तेजक मादक पेय | ४१ (४.०) | ७४ (३.१) | १०५ (३.७) | १७९ (३.७) |
| ५ | घरभाडे | - | १ (०.०) | - | - |
| ६ | किरकोळ सेवा | ८० (७.८) | १७९ (७.३) | ३६३ (१२.८) | ५८७ (१२.२) |
| ७ | एकुण उपभोग खर्च | १०२८ (१००.०) | २४४३ (१००.०) | २८३३ (१००.०) | ४८०० (१००.०) |

*आधार : रुरल लेबर इनक्वॉयरी ६१ वी एन.एस.एस. फेरी भारत सरकार.*

भूमिहीन शेतमजुरांचे कामाचे तास निसर्गाच्या घटकावर अवलंबून असल्याचे दिसते. तसेच त्यांना काही परिस्थितीमध्ये रखरखत्या उन्हात आणि मुसळधार पावसामध्ये सुध्दा काम करावे लागते. तसेच भूमिहीन शेतमजुरांना रात्रीच्या वेळी पिकांना विहिरीतील पाणी देणे आणि थ्रेशर मशीनमधून पिकाचे धान्य काढणे अशा स्वरुपाची कामे करावी लागतात. भूमिहीन शेतमजुरांच्या कुटुंबांचे सरासरी उत्पन्न कमी आणि उपभोग खर्च अधिक असल्याकारणाने शेतमजूर कोणतेही काम करण्यासाठी तयार असतात. वेळप्रसंगी जर त्यांना काम उपलब्ध झाले नाही

**तक्ता क्र.२-ब**

**शेतमजुरांच्या कुटुंबाची उपभोग रचना (रुपयामध्ये)**

| अ.क्र. | गट | पहिली ग्रामीण मजुर चौकशी समिती १९८७-८८ | दुसरी ग्रामीण मजुर चौकशी समिती १९९३-९४ | तिसरी ग्रामीण मजुर चौकशी समिती १९९९-२००० | चौथी ग्रामीण मजुर चौकशी समिती २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|
| १ | अन्न | ४४८३ (६७.१) | ७७८८ (६६.३) | १३६६८ (६२.३) | १३६०१ (५९.१) |
| २ | कपडे आणि पादत्राणे | ४०२ (६.०) | ५७८ (४.९) | १६६७ (७.६) | ९६२ (४.२) |
| ३ | इंधन आणि प्रकाश | ५९० (८.८) | ९७६ (८.३) | १७८३ (८.१) | २६३८ (११.५) |
| ४ | उत्तेजक मादक पेय | २७४ (४.१) | ४६१ (३.९) | ७९० (३.६) | ८०५ (३.५) |
| ५ | घरभाडे | ७ (०.१) | १५ (०.१) | ३४ (०.२) | ३६ (०.२) |
| ६ | किरकोळ सेवा | ९२५ (१३.९) | १९४१ (१६.५) | ३९८६ (१८.२) | ४९५३ (२१.५) |
| ७ | एकुण उपभोग खर्च | ६६८१ (१००.०) | ११७५९ (१००.०) | २१९२८ (१००.०) | २२९९५ (१००.०) |

*स्त्रोतः रुरल लेबर इनक्वॉयरी ६१ वी एन.एस.एस. फेरी भारत सरकार*

तर ते गावातील सावकार किंवा शेतमालक यांच्याकडून कर्ज घेतात. राष्ट्रीय नमुना पाहणीनुसार राष्ट्रीय स्तरावर ५२.३२ टक्के भूमिहीन शेतमजुरांची कुटुंबे हे कर्जबाजारी होते. भारतातील विविध राज्यामध्ये किमान मजुरी कायदा पास केला असला तरी आजही भूमिहीन शेतमजुर कुटुंबांच्या राहणीमानात कोणतीही सुधारणा झाली नाही. त्यांना आजही बेरोजगारी, अर्धबेकारी, दारिद्र्य अशा समस्यांचा सामना करावा लागतो.

तक्ता क्र.२ मध्ये शेतमजुरांच्या कुटुंबांची उपभोग रचना दर्शविली आहे. त्यामध्ये शेतमजुरांच्या कुटुंबांचा अन्नधान्यावरील सरासरी वार्षिक खर्च १९६३-६५ मध्ये ७३.९ टक्के एवढा होता. मात्र तो २००४-०५ मध्ये ५९.१ टक्के एवढा कमी झाला. तर इंधन आणि प्रकाश यावरील शेतमजुरांच्या कुटुंबांचा सरासरी वार्षिक खर्च १९६३-६५ मध्ये ७.६ टक्के एवढा होता. तो २००४-०५ मध्ये ११.५ टक्क्यापर्यंत वाढला. तसेच किरकोळ सेवावरील शेतमजुरांच्या कुटुंबाचा सरासरी वार्षिक खर्च १९६३-६५ मध्ये ७.८ टक्के एवढा होता तो २००४-०५ मध्ये २१.५ टक्के एवढा वाढला तर १९६३-६५ मध्ये शेतमजुरांच्या कुटूंबाचा एकूण सरासरी वार्षिक खर्च १०२८ रुपये एवढा होता तो २००४-०५ मध्ये २२९९५ रुपये एवढा वाढला असल्याचे दिसून आले.

### भूमिहीन शेतमजुरांचा कर्जबाजारीपणा:

पहिल्या ग्रामीण मजूर चौकशी समिती (१९६३-६५) च्या अहवालानुसार कर्जबाजारी शेतमजुर कुटुंबांचे प्रमाण ६०.६ टक्के होते, ते आठव्या ग्रामीण मजूर चौकशी समिती (२००४-०५) च्या अहवालानुसार ४८.४ टक्के एवढे कमी झाले. १९६३-६५ मध्ये शेतमजूर कुटुंबांकडे सरासरी १४८ रुपये कर्ज होते, ते २००४-०५ मध्ये ३९४६ रुपये एवढे वाढले. १९६३-६५ मध्ये शेतमजूर कुटुंबांनी सरासरी २४४ रुपये कर्ज घेतले होते, ते २००४-०५ मध्ये सरासरी ८१४५ रुपये एवढे वाढले.

भारतातील शेतमजुरांच्या कुटुंबांचे सरकार, सहकारी संस्था, शेतमालक, नातेवाईक यांच्यापेक्षा सावकाराकडून कर्ज घेणाऱ्या शेतमजुरांच्या कुटुंबांचे प्रमाण अधिक होते. १९६३-६५ मध्ये सावकाराकडून ३०.७ टक्के शेतमजुरांनी कर्ज घेतले होते. त्यामध्ये २००४-०५ मध्ये ४४.५ टक्के वाढ झाली. बँकेचा विचार केला असता १९७४-७५ मध्ये बँकेकडून ३.६ टक्के शेतमजुरांनी कर्ज घेतले होते. त्यामध्ये २००४-०५ मध्ये १४.० टक्के वाढ झाली. यावरुन असे दिसून येते की, शेतमजुरांना बँकेकडून मिळणारे कर्जाचे प्रमाण कमी असल्याकारणाने सावकारावर अवलंबून राहावे लागते.

शेतमजुरांच्या कुटुंबांनी उपभोग हेतुसाठी १९६३-६५ मध्ये ५३.३ टक्के तर २००४-०५ मध्ये ३३.१ टक्के कर्ज घेतले होते. त्याचबरोबर उत्पादक हेतुसाठी १९६३-६५ मध्ये ११.९ टक्के कर्ज घेतले त्यात २००४-०५ मध्ये २०.८ टक्के वाढ झाली. तर जमिनीची खरेदी आणि इमारत बांधणीसाठी १९८३ मध्ये ६.३ टक्के कर्ज घेतले होते, त्यात २००४-०५ मध्ये १५.० टक्के वाढ झाली.

### भूमिहीन शेतमजुरांच्या समस्या:

भारतामध्ये सततच्या वाढत्या लोकसंख्येमुळे भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येबरोबरच त्याच्या समस्यामध्येही वाढ होताना दिसून येते.

त्यामध्ये प्रामुख्याने शेतमजुरांचा हीन सामाजिक दर्जा, गरिबी, कर्जबाजारीपणा, दारिद्र्य, घराची समस्या, रोजगाराचे हंगामी स्वरुप, वाढते किंमतमान, काम करण्यासाठी वेळेचे बंधन नाही. या सारख्या समस्या आहेत. कृषीमध्ये यांत्रिकीकरणामुळे बेरोजगारी आणि इतर सहाय्यक व्यवसायांचा अभाव इत्यादी समस्यामुळे भूमिहीन शेतमजुरांची स्थिती अतिशय बिकट झाली आहे.

**भूमिहीन शेतमजुरांसाठी राबविण्यात येत असलेल्या सरकारी योजना:**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर केंद्र आणि राज्य सरकारने भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारण्याकरीता विविध प्रकारच्या योजना आणि कायद्याची अंमलबजावणी केली. त्यामध्ये किमान मजुरी अधिनियमाद्वारे भूमिहीन शेतमजुरांना किमान जीवनावश्यक गरजा भागविता याव्यात म्हणून किमान मजुरी कायदा पास केला. कमाल भूधारणा सिमा निर्धारण कायदा लागू झाल्यामुळे अतिरिक्त प्राप्त होणाऱ्या जमिनीचे वितरण भूमिहीन शेतमजुरांना करण्यात येते. तसेच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळापासून भूमिहीन शेतमजुरांना सहकार्य करण्यासाठी रस्त्याचे बांधकाम, सांडपाण्याच्या नाल्या बांधणे अशा विविध सरकारी प्रकल्पाचे भूमिहीन शेतमजुरांसोबत करार केले जातात. तसेच शेतमजुरांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी रोजगार हमी योजनेची सुरुवात केली. त्याचबरोबर अशा प्रकारच्या विविध योजना, त्यामध्ये जवाहर रोजगार योजना तसेच शेतमजुरांची आणि इतर कारागिरांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी २० कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी तसेच भूमिहीन शेतमजुरांसाठी स्वतःची मालकी असलेल्या पक्क्या घरांची उपलब्धता व्हावी यासाठी इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजनेची सुरुवात केली गेली. त्याचबरोबर वेठबिगार शेतमजुरांचे निर्मुलन तसेच भूमिहीन शेतमजूर, कारागिर, सिमांत शेतकऱ्याचे कर्जबाजारीपणाचे निर्मुलन करुन त्याच्या परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने अशा विविध प्रकारच्या योजनाची अंमलबजावणी केली आहे.

**समारोप:**

कोणत्याही देशाचा विकास त्या देशात असलेल्या रोजगारांच्या संधीवर अवलंबून असतो. देशाचा लोकसंख्येच्या बाबतीत जगात दुसरा क्रमांक असून देशातील ६५ टक्क्यापेक्षाही अधिक लोकसंख्या आजही शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे आजच्या घडीला शेती क्षेत्रामध्ये शेतमजुरांची संख्या, भूमिहीन शेतमजुर, सिमांत शेतकऱ्यांची संख्या अधिक असून त्यांना बेरोजगारी, अर्धबेकारी दारिद्र्य अशा समस्या प्रामुख्याने भेडसावतात. शेतमजूर मागासलेले असून अकुशल आहेत. त्यामुळे त्यांना आधुनिक कृषी क्षेत्रातील रोजगाराच्या संधी प्राप्त होत नाहीत. प्रत्येक दशकामध्ये शेतमजुरांची संख्या वाढत आहे. परंतु त्यांना मिळणाऱ्या रोजगारात मात्र घट होत आहे. तसेच सरकारी योजनांचीही प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे रोजगार मिळविण्यासाठी भूमिहीन शेतमजुरांना स्थलांतर करावे लागते. त्यामुळे भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सरकारने किमान मजुरी अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. तसेच शेतमजुरांची सौदाशक्ती

वाढविण्यासाठी सरकारने शेतकरी संघटनांसोबत करार करावेत आणि वेठबिगार शेतमजुरांचे निर्मुलन करुन त्यांना पर्यायी रोजगार मिळावा यासाठी ग्रामीण भागामध्ये लघु आणि कुटीर कृषी उद्योगाची उभारणी करावी. शेतमजुरांचे कामाचे तास नियमित करावे, जेणेकरुन भूमिहीन शेतमजूर आणि इतर मजुरांची आर्थिक परिस्थिती सुधारेल आणि त्याचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

**संदर्भसूची:**


१) नागराजन एम.एम., *गव्हर्नमेंट मेझर्स फॉर ॲग्रीकल्चरल लेबरर्स इन इंडिया अॅण्ड कर्नाटका*, २०१३, जर्नल ऑफ इन्टरनॅशनल ग्लोबल रिसर्च अनॅलेसिस, व्हॉल्यूम २.

२) खान मुकबुल हुस्सैन, *ॲन आर्टिकल ऑफ ॲग्रीकल्चरल लेबर प्रॉब्लम इन बारपेटा ऑफ आसाम*, २०१३, आय.ओ.एम.आर. जर्नल ऑफ फार्मसी व्हॉल्यूम ३.

३) लोकसभा *ॲनक्सरी रेफर्ड टू रिपले टू पार्ट बी* (२०१५) स्टेट वाईज कॉपरेटिव्ह डाटा ऑफ लॅण्डलेस ॲग्रीकल्चरल वर्कर्स.

४) कुलामणी पाठी *ॲग्रीकल्चरल लेबर इन इंडिया अ क्लोज लूक ओरिसा रिव्हू*, २००७, डायरेक्टर जनरल लेबर वेलफेअर मिनिस्ट्री ऑफ लेबर गव्हर्नमेंट ऑफ इंडिया.

५) दत्त गौरव व महाजन अश्विनी, *इंण्डियन इकॉनॉमी*, २०१४, एस चन्द कंपनी लि. न्यु दिल्ली.

६) अतुलकर दिप्ती आणि दुबे लक्ष्मीराणी, *सोशिओ इकोनॉमिक्स स्टेटस ऑफ ॲग्रीकल्चरल लॅण्डलेस लेबरर्स ए स्टडी कंन्डक्ट इन इन्दौर डिस्ट्रीक्ट ऑफ मध्यप्रदेश*, २०१२, लम्बर्ट ॲकॅडमिक पब्लिशिंग मध्यप्रदेश.

७) थोरात सुखदेव, *भेदभावाच्या ओझ्याखाली दलित मजुराची घुसमट*, २०१२, श्रमिकांचे जग काल आज आणि उद्या, प्रकाशक भुपेश गुप्ता भवन १५ सयाणी रोड प्रभादेवी मुंबई.

८) कुमार विरेन्द्र आणि सिंग बलविर, *लेवल्स ॲन्ड पॅटर्न ऑफ इन्डिब्टनेस अमॉन्ग लैन्डलेस ॲग्रीकल्चरल लेबर इन रुरल पंजाब*, २०१३, जर्नल ऑफ ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ॲन्ड पॉलिसी, व्हॉल्यूम २३ इश्यु २.

९) चंद्रशेखर एस., *रिडिंग दि टी लिव्हस ऑन फायनॉनसियल इनक्लुझन दि केस ऑफ रुरल लेबर हाऊसहोल्ड*, २०१४, इकॉनॉमिक ॲन्ड पॉलिटिकल विकली व्हॉल्यूम नं.३, समिक्षा ट्रस्ट पब्लिकेशन.

१०) चंद रमेश आणि श्रीवास्तव एस.के., *चेंज इन दि रुरल लेबर मार्केट ॲन्ड देअर इम्प्लीकेशन्स फॉर ॲग्रीकल्चर*, २०१४, इकॉनॉमिक ॲन्ड पॉलिटिकल विकली, समिक्षा ट्रस्ट पब्लिकेशन, व्हॉल्यूम XLIX नं.१०.

# आदिवासींच्या विकासात केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची भूमिका

कु.धनश्री धनंजय आंबेकर, पुणे,
पीएच.डी. संशोधक विद्यार्थिनी, अर्थशास्त्र विभाग
श्री.ना.दा.ठाकरसी महिला विद्यापीठ, कर्वेपथ-४११०३८
भ्रमणध्वनी: ९८६०३२९७६५
ईमेल: dhanshri.ambekar@gmail.com

भारतात आदिवासींच्या सुमारे ४५० तर महाराष्ट्रात ४७ जमाती आहेत, या जमाती संपूर्ण भारतभर व महाराष्ट्रभर विखुरलेल्या दिसतात. या प्रत्येक जमातीची वैशिष्ट्ये, चालीरिती भिन्न आहेत. सर्वात पुरातन जमात म्हणून आदिवीसींचा उल्लेख केला जातो. परंतु दऱ्याखोऱ्यात राहणारी ही जमात अजूनही आर्थिक व सामाजिक दृष्टीने मागासलेली आहे. या अतिमागास आदिवासी समाजासाठी स्वातंत्र्योत्तर काळापासून केंद्र व राज्य शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी एक महत्वपूर्ण योजना म्हणजे केंद्रवर्ती अर्थसंकल्प ही होय. प्रस्तुत लेखातून या योजनेचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

## केंद्रवर्ती अर्थसंकल्प - संकल्पना :

महाराष्ट्र राज्यात निरनिराळ्या क्षेत्रात राहणाऱ्या एकूण ४७ आदिवासी जमाती आढळतात. त्यांच्या विकासात व प्रगतीच्या दरात तफावत आढळून येते. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील विकास कार्यक्रमाच्या गरजाही भिन्न आहेत. प्रत्येक प्रकल्पातील भौगोलिक परिस्थिती व नैसर्गिक साधनसंपत्तीमधील विपुलता व त्रुटी भिन्न असल्यामुळे ठराविक साच्याचे कार्यक्रम सर्वच प्रकल्प क्षेत्रात आदिवासी विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरत नाहीत. आदिवासी विकास कार्यक्रमांच्या योजनांमध्ये स्थळ व कालानुरूप लवचिकता व अभिनवता आणणे अत्यंत गरजेचे आहे. तथापि प्रकल्प क्षेत्रातील स्थानिक गरजा ह्या शासनाने मान्य केलेल्या नियमित योजनांहून बऱ्याचदा भिन्न असतात. त्यासाठी आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने सुयोग्य अशा विविध कार्यक्रमांना स्थानिक पातळीवर मंजुरीचे अधिकार प्रदान करुन सदर कार्यक्रम तातडीने कार्यान्वित

करता यावेत या उद्देशाने केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लीअस बजेट) ही योजना शासनातर्फे सन १९८१-८२ या वर्षापासून राबवली जात आहे. सदरील योजना प्रकल्प अधिकारी त्यांच्या परिसरातील आदिवासींच्या गरजा व उपलब्ध साधनसामग्री लक्षात घेऊन तयार करतात. उदा.तेंदूपत्ता गोळा करणे, कलाकुसरीच्या वस्तू तयार करणे, कांडप यंत्र देणे, पत्रावळी तयार करणे इत्यादी.

ज्या योजना आदिवासी विकास किंवा कल्याणाच्या दृष्टीने आवश्यक आहेत आणि त्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरुपाच्या स्थानिक महत्वाच्या कर्जविरहित योजना तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घ कालावधीकरिता अडकून न पडता स्थानिक पातळीवर तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करुन गरजू आदिवासींना प्रत्यक्ष योजनेचा लाभ मिळवून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेमध्ये लाभार्थींना केवळ कर्ज देणे अपेक्षित नाही तर या निधीतून कार्यान्वित करावयाच्या योजना प्रामुख्याने आदिवासी व्यक्ती व कुटुंबे केंद्रबिंदू मानून त्यांचे जीवनमान वाढविण्याच्या दृष्टीने राबविल्या जातात.

योजनेचे स्वरुप : प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प या मार्फत ही योजना कार्यान्वित केली जाते. या योजनेचे स्वरुप पुढीलप्रमाणे -

१) स्थानिक गरजा व योजना राबविण्यास असलेला वाव तसेच योजनेमुळे आदिवासींच्या जीवनावर होणारा सकारात्मक परिणाम इ.बाबी विचारात घेऊन योजनांची निवड केली जाते.

२) योजनेंतर्गत प्रत्येक आदिवासी व्यक्तीस/कुटुंबास/सामुहिक प्रकल्पात/कार्यक्रमांतर्गत आर्थिक मदत रु.१५,०००/- पर्यंत दिली जाते.

३) शासन निर्णय दि.३१ मे २००१ च्या मार्गदर्शक सूचनेतील अटी व शर्तीनुसार पात्र लाभार्थी व त्यांनी मागणी केल्यानुसार योजना तयार करुन प्रकल्प अधिकारी यांनी उच्च आयुक्ताकडे निर्देश समितीचे अध्यक्ष या नात्याने मंजुरी देणे.

४) अर्थसंकल्पात तरतूद असलेल्या एखाद्या योजनेवर अत्यावश्यक आणि अपवादात्मक परिस्थितीत पूरक खर्च केंद्रवर्ती अर्थसंकल्पामधून करावयाचा असल्यास प्रस्ताव मंजुरीसाठी आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडे सादर करावा.

५) शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार जे कार्यक्रम केंद्रवर्ती अर्थसंकल्प अंतर्गत देता येत नाहीत परंतु स्थानिक परिस्थितीनुसार खास कार्यक्रम घेणे आवश्यक आहे असे निर्देशक समितीस वाटल्यास त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणे.

६) योजनेचे चार गटात वर्गीकरण करण्यात येते - अ) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना ब) प्रशिक्षणाच्या योजना क) मानवी साधनसंपत्तीच्या विकासाच्या योजना आणि ड) आदिवासी कल्याणात्मक योजना.

**केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना अंमलबजावणी कार्यपध्दती :**

आदिवासींच्या विकासासाठी एखाद्या विभागास एखादी योजना आवश्यक वाटल्यास

त्यासंबंधीचा योग्य तो प्रस्ताव तयार करुन तो संचालन समितीकडे प्रकल्प अधिकारी यांनी सादर करावयाचा असतो. या समितीमध्ये पुढील सभासद असतात. १. अतिरिक्त आदिवासी विकास आयुक्त, नाशिक / नागपुर - अध्यक्ष, २.संबंधित योजनेच्या अंमलबजावणीचे प्रादेशिक किंवा जिल्हा परिषद विभागप्रमुख - सभासद ३.प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प - सभासद सचिव ४. आदिवासी कार्यकर्ता - अशासकीय सदस्य. सदर समितीने योजना मंजूर केल्यानंतर संबंधित लाभधारकांना आवश्यक ती मदत दिली जाते.

**अनुदान देण्याची पध्दत :**

या योजनेअंतर्गत प्रामुख्याने वैयक्तिक व कुटुंबानुवर्ती योजना हाती घेतल्या जातात व राबविल्या जातात. प्रकल्प कार्यालयामार्फत या योजना राबविल्या जातात. या योजनांवर १००%, ८०%, ५०% या प्रमाणात अनुदान दिले जाते. अनुदान हे रोख रकमेच्या स्वरुपात दिले जात नाही तर ते वस्तू किंवा प्रशिक्षणाच्या स्वरुपात दिले जाते. उदा. बँकेतून कर्ज घेऊन शिवणयंत्र, गाई म्हशी इ.साठी पंचायत समितीतर्फे व संबंधित अधिकाऱ्याकडून कर्ज प्रकरण तयार करुन घेण्यात येतात.

**लाभधारक निवडण्याची पध्दत :**

केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत ज्यांना लाभ घ्यायचा आहे त्या आदिवासी लाभार्थींची निवड पुढील पध्दतीने केली जाते. १. प्रकल्प अधिकारी, प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ, गट विकास अधिकारी, तहसिलदार यांना कळविण्यात येते. २. त्यांच्यापासून लाभधारकांच्या याद्या, अर्ज, आवश्यक ते दाखले घेण्यात येतात. ३.लाभधारकांच्या आर्थिक प्राप्तीच्या दृष्टीकोनातून छाननी करुन अंतिम निवड प्रकल्प कार्यालयामार्फत केली जाते. ४. नियमानुसार लाभधारकांची निवड केल्यानंतर योजनांचा लाभ वस्तुरुपाने व प्रशिक्षणाच्या रुपात दिला जातो.

**केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेचे गटनिहाय स्पष्टीकरण :**

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प ह्यांचे मार्फत आणि उच्च आयुक्त, आदिवासी विकास यांचे नियंत्रणाखाली राबविण्यात येणाऱ्या केंद्रवर्ती अर्थसंकल्पातील योजनांमध्ये लाभार्थींना कर्ज देणे अपेक्षित नाही. केंद्रवर्ती अर्थसंकल्पातील योजनांमध्ये फार मोठया प्रमाणात मुभा असली तरी, या योजनांचा खरा उद्देश लक्षात घेऊन या योजनांचे चार गट पाडण्यात येतात. १) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना, २) प्रशिक्षणाच्या योजना, ३) मानवी साधनसंपत्ती विकासाच्या योजना आणि ४) आदिवासी कल्याणात्मक योजना यांचे गटनिहाय स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे.

१) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना:

या स्वरुपाच्या योजनांमध्ये सर्वसाधारण शेती उत्पन्न वाढवणे, लहान लहान सिंचन योजना, इनवेल बोअर, सिंचनासाठी कुपनलिका, भाताच्या शेतात बोड्या बंधने, सिंचनासाठी पी.व्ही.सी. किंवा तत्सम पाईप पुरविणे, शासनामार्फत आदिवासींना पुरविलेले पंपसंच नादुरुस्त होऊन निकामी पडले असल्यास आणि संबंधित आदिवासी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती पंपसंच दुरुस्त करण्यास खरोखरच सक्षम नसेल तर सिंचनाची सोय उपलब्ध व्हावी म्हणून या

दृष्टीने आवश्यक ते आर्थिक सहाय्य करणे, दुग्धव्यवसाय संवर्धन, पशुविकास, फळबाग विकास, मत्स्यव्यवसाय विकास, कुटीर उद्योग व हस्तकला व्यवसाय, रेशीम तथा कोळसा उत्पादन उद्योग, मधुमक्षिका पालन इ.विकास शिर्षातील वैयक्तिक लाभाच्या अशा प्रकारच्या योजनांचे पुरेसे ज्ञान आणि कौशल्य प्राप्त व्हावे यासाठी आवश्यक त्या प्रशिक्षणाचा आणि प्रात्यक्षिकाचाही समावेश अशा योजनांमध्ये होतो. परंतु ज्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात आहे अशा योजना केंद्रवर्ती अर्थसंकल्प या योजनेतंर्गत घेतल्या जात नाही. तसेच उत्पन्न निर्मितीच्या योजनात लाभार्थीचा काही आर्थिक सहभाग असणे आवश्यक असते. या गटांतर्गत पुढील योजनांचा समावेश होतो. १.अनुदानावर संकरीत गायी, म्हशी, शेळी पुरविणे, २.अनुदानावर पी.व्ही.सी.पाईप पुरविणे, ३.अनुदानावर लाउडस्पीकर व मंडप पुरविणे, ४.किराणा दुकान व पानपट्टीसाठी अनुदान पुरविणे, ५.फोटोग्राफी व्यवसायाकरिता अनुदान पुरविणे, ६.दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांना जैविक व किटकनाशके असे संयुक्त पॅकेज देणे, ७.आदिवासी तरुणांना स्वयंरोजगाराकरिता हॉटेल-चालविणे, सुतारकाम, हस्तकला, सायकल दुरुस्ती, गवंडीकाम अशा विविध व्यवसायांसाठी अनुदान पुरविणे.

२) प्रशिक्षणाच्या योजनाः

ज्या योजनांमधून आदिवासी व्यक्तींना रोजगार मिळविण्यासाठी किंवा नोकरी मिळविण्यासाठी संधी उपलब्ध होतील अशा विविध स्पर्धात्मक परिक्षांच्या तयारीसाठी प्रशिक्षण व उद्‌बोधन वर्ग आयोजित करणे, कॉम्प्यूटर प्रशिक्षण, टंकलेखन / लघुलेखन, शिवणकामाचे प्रशिक्षण, सुतार, वायरमन, रेडीओ/ टी.व्ही. दुरुस्ती व वाहनचालक प्रशिक्षण, सशस्त्र दल, राज्य राखीव दल किंवा केंद्र / राज्य शासनाच्या निमलष्करी दलात भरतीपूर्व प्रशिक्षण व इतर नोकरी मिळविण्यासाठी उपयुक्त प्रशिक्षण इ. योजनांचा समावेश होतो. प्रशिक्षण योजनेला मंजुरी देण्यापूर्वी निर्देश समितीने अनुसूचीत जमातीच्या उमेदवारीसाठी कोणत्या नोकरी/ रोजगारांमध्ये किती जागा नजीकच्या भविष्यात अपेक्षित आहेत त्याचा अंदाज घेऊन नंतर त्यानुसार मान्यता देण्यात येते. प्रशिक्षण देणाऱ्या व्यक्ती / संस्था आणि अभ्यासक्रम मान्यता प्राप्त आहे हे पडताळून पाहिले जाते. या गटांतर्गत पुढील योजनांचा समावेश होतो. वाहक प्रशिक्षण (मुले) हलके व अवजड वाहन चालक प्रशिक्षण, आदिवासी महिलांना पर्स व पिशव्या बनविण्याचे प्रशिक्षण, टायपिंग व कॉम्प्युटर ऑपरेटरचे प्रशिक्षण, पंप दुरुस्तीचे प्रशिक्षण इत्यादी प्रशिक्षण वर्ग आदिवासी लाभार्थीसाठी भरविले जातात.

३) मानवी साधनसंपत्तीच्या विकासाच्या योजनाः

मानवी साधनसंपत्तीच्या विकासामध्ये सर्वसाधारणपणे शिक्षण, प्रशिक्षण योजना, कला, क्रीडा, साहित्य व संस्कृती यांची जोपासना तसेच संवर्धन यांचा समावेश होतो. आदिवासींची गुणवत्ता आणि व्यक्तिमत्व विकासाच्या योजना, विविध योजना कार्यान्वित करुन त्यांना सुविद्य, सुदृढ आणि समृध्द नागरिक बनविणे हा या सर्व उपक्रमांचा अंतिम उद्देश आहे. या दृष्टीने विचार करता निवडक प्रमाणावर महत्वाच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करणे, आदिवासींच्या परंपरागत हस्तकलेचे प्रदर्शन आयोजित करणे तसेच नृत्य केलेचे जतन व संवर्धन करणे, उद्‌बोधक आणि

ज्ञानवर्धक शिबिरे व मेळावे भरविणे, आश्रम शाळेतील शिक्षकांसाठी कार्यशाळा/उद्बोधक वर्ग आयोजित करणे, संस्कार मंडळांना प्रोत्साहीत करणे, युवा आणि महिला मंडळाच्या रचनात्मक उपक्रमांना सहाय्य देणे, सामुहिक विवाह आयोजित करणे अशा प्रकारच्या योजना, स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन कार्यान्वित केल्या जातात. या गटांतर्गत पुढील योजनांचा समावेश होतो. आदिवासी मुलां मुलींकरीता सायकल वाटप, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना चष्मे देण्यासाठी अनुदान, कृषी प्रदर्शन आयोजित करणे, कुटुंब कल्याण योजनेंतर्गत चादरी वाटप करणे, अंधश्रध्दा निर्मुलन कार्यक्रमासाठी अनुदान इत्यादी.

४)आदिवासी कल्याणात्मक योजना:

आदिवासींच्या त्या त्या भागातील गरजांवरील समस्यांवर आधारित अशा वैयक्तिक व सामुहिक कल्याणाच्या दृष्टीने अत्यावश्यक ठरणाऱ्या काही योजना या गटांतर्गत राबविण्यात येतात. अशा योजनांमध्ये घराचे विद्युतीकरण, बाल व महिला कल्याणासाठी अभिनव उपक्रम, आदिवासींवरील आपातकालीन किंवा अत्याचार प्रकरणी, अपवादात्मक विशेष परिस्थितीत तातडीने सहाय्य देणे इत्यादीचा समावेश होतो. या योजनांचा फायदा घेण्यासाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींसाठी) यांच्याकडे अर्जाचे नमुने उपलब्ध असतात. प्रकल्प अधिकारी स्वत: प्रयत्न करुन गरजू आदिवासींना महामंडळाकडून किंवा राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. या गटांतर्गत पुढील योजनांचा समावेश होतो. १. आपद्ग्रस्त आदिवासींना अर्थसाहाय्य २. घर जळाल्यामुळे अर्थसहाय्य. ३. मेळावे आयोजित करणे. ४. आदिवासी नृत्य पथकातील कलाकारांना नृत्याच्या पोशाख साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य. ५. आश्रम शाळेतील अपंग विद्यार्थ्यांना कृत्रिम अवयव पुरविणे.

वरील चार गटांतर्गत केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेचे कार्य चालते. गरजू आदिवासींची निकड लक्षात घेऊन चारपैकी एका गटांतर्गत प्रकल्प स्तरावर योजना तयार करुन राबवली जाते.

### केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेचे नियम व अटी:

१. या निधीतून कर्ज पुरविठा करता येत नाही. २. मूलभूत सोयींवर अत्यंत निकडीच्या प्रसंगी एकूण खर्चाच्या १०% खर्च या योजनेतून भागविता येऊ शकतो. ३. सेवाभावी संस्थेकडून राबविल्या जाणाऱ्या आदिवासी कल्याणाच्या प्रकल्पासाठी, प्रकल्पाच्या भांडवली खर्चाच्या १५% निधी केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत मंजुर करता येतो. ४. नियमित योजने सारखीच समांतरीत योजना, काही विशिष्ट परिस्थितीत घेणे अपरिहार्य होत असेल तर संबंधित विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असते.

### केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेवर २००७-०८ ते २०१२-१३ पर्यंत झालेला खर्च व लाभार्थी:

आदिवासी विकास विभागामार्फत दरवर्षी विविध योजना राबविण्यात येतात व या योजनांसाठी राज्य सरकारकडून दरवर्षी भांडवली तरतूद केली जाते. सन २००७-०८ या आर्थिक वर्षापासून सन २०१२-१३ या वर्षापर्यंत दरवर्षी तरतूद रक्कम वाढत असलेली दिसते आहे. २००७-०८ साली ३००४.१३ हजार इतकी तरतूद केंद्रवर्ती अर्थसंकल्प या योजनेसाठी करण्यात आली. २०१२-१३ मध्ये ४५००.०० हजार तरतूद

करण्यात आली म्हणजेच, ही रक्कम ३३% नी वाढलेली दिसते. प्रत्यक्ष खर्च दरवर्षी वाढत असल्याने तरतूद रकमेत वाढ होते. लाभार्थींची संख्येत मात्र चढउतार दिसून येतो. सन २००७-०८ साली १७००८७ इतकी लाभार्थी संख्या होती. ती २०१०-११ मध्ये ८९४०७ म्हणजेच कमी झालेली दिसते. २०१२-१३ मध्ये हि लाभार्थी संख्या ३३९८७० झालेली म्हणजेच परत वाढ झालेली आढळून येते. लाभार्थींच्या संख्येत होणारी वाढ किंवा घट होण्यामागे केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेचे अपयश नसून आदिवासी लाभार्थींची निकड कारणीभूत असल्याचे आढळून येते.

**सारांश:**

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास आदिवासी समाजाकरिता राज्य व केंद्र सरकारकडून अनेक योजना राबविल्या जातात. त्यापैकी काही योजना या आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी उपयुक्त ठरतात. त्यापैकी एक योजना म्हणजे केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना, या योजनेतील विविध गटनिहाय योजना लाभार्थींच्या गरजा विचारात घेऊन बनविल्या जातात. योजनेपासून मिळणारा लाभ हा प्रत्यक्ष पैशाच्या स्वरुपात न मिळता प्रशिक्षणाच्या किंवा वस्तूच्या स्वरुपात मिळतो. त्यामुळे योजना रकमेत तफावत राहण्यासाठी भ्रष्टाचार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. या योजनेचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत लगेचच पोहचतो त्यामुळे लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास सुरुवात होते. प्रशिक्षणाच्या व उत्पन्न वाढीच्या योजनांमुळे उत्पन्नाची पातळी उंचावते तसेच कल्याणात्मक योजनांमुळे सामाजिक परिस्थिती व राहणीमान सुधारण्यास मदत होते. या सर्वांचा परिणाम म्हणून शासनामार्फत देखील दरवर्षी या योजनेसाठीची आर्थिक तरतूद वाढविली जाते. असे मिळालेल्या आकडेवारीवरुन दिसून येते. थोडक्यात केंद्रवर्ती अर्थसंकल्प ही योजना आदिवासी समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी महत्वाची व उपयुक्त अशी योजना आहे.

**संदर्भसूची:**

१) गारे गोविंद, *आदिवासी विकास योजना,* आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे.

२) *अनुसूचीत जमातीच्या विकासाच्या योजना.* माहिती पुस्तिका, आदिवासी विकास आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, नाशिक.

३) आदिवासी विकास विभाग माहिती पुस्तिका सन २०११-१२ नाशिक

४) आदिवासी विकास परिचय पुस्तिका, आदिवासी विकास विभाग, सन २००३-२००४ मुंबई.

५) वार्षिक आदिवासी उपयोजना, महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, सन २००७-०८ ते २०१२-१३.

# सुधारीत राष्ट्रीय कृषी विमा योजना - एक वरदान

बापुसाहेब निवृत्ती शिंगाडे, संगमनेर,
अर्थशास्त्र विभाग,
संगमनेर महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४०४८१०३६०.
e-mail : bapushingade 79@gmail.com

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात कृषी उत्पादनवाढीच्या दरात सलग चौथ्या वर्षी लक्षणीय घट आल्यामुळे भारतीय शेती संकटात असल्याच्या अगोदरच्या संकेतांची प्रचिती येत आहे. गेल्या तीन वर्षांपासुन निसर्गाने चालू ठेवलेले तांडवनृत्य हे या अस्थिरतेचे मुख्य कारण आहे. जसे गेल्या वर्षी देशात पर्जन्याचे सरासरी प्रमाण ८८% एवढे राहिले. महाराष्ट्राचाच विचार केला तर मराठवाडा आणि विदर्भात पर्जन्यमान कमी राहिल्याने तीन वर्षे खरीपाची पेरणी वाया गेली. नंतरच्या रब्बी हंगामातही अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळाने रब्बीचे अतोनात नुकसान झाले. या सर्वांचा परिणाम म्हणजे धान्योत्पादनात ५% पेक्षा जास्त प्रमाणात घट होते आहे. देशातील संपुर्ण शेतीक्षेत्र आणि विशेषत: कोरडवाहु शेतकऱ्यांना संकटाशी मुकाबला करावा लागत आहे. निसर्गाच्या प्रकोपामुळे सन २०११-१२ मध्ये राज्यातील १०० तालुके अवर्षणग्रस्त होते. सन २०१२-१३ मध्ये ही संख्या १३६ पर्यंत वाढली. सन २०१३-१४ मध्ये अवकाळी पाऊस आणि गारपीटीने शेती उत्पादन घटले. गेल्या वर्षात म्हणजे २०१४-१५ मध्ये २२६ तालुके अवर्षणग्रस्त होते आणि यावर्षीच्या रब्बी हंगामात गारपीट आणि अवकाळी पावसाने पुन्हा उभ्या पिकांना झोडपले. तात्पर्य गेल्या चार वर्षात निसर्गाच्या प्रकोपाचे बळी ठरलेल्या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अतिशय बिकट झाली आहे. चालु वर्षात पुन्हा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेती क्षेत्राची स्थिती आणखी भयावह होणार हे नक्की.

### शेती उत्पादनातील धोके आणि अनिश्चितता:

इतर क्षेत्रांपेक्षा शेती उत्पादनाचे एक वेगळेपण म्हणजे या क्षेत्राच्या

उत्पादन प्रक्रीयेत निसर्गाची भुमिका अत्यंत महत्वाची असते. नैसर्गिक किंवा हवामानविषयक स्थिती व त्यात होणाऱ्या बदलांचा शेती उत्पादनावर तात्काळ आणि प्रत्यक्ष परिणाम होतो, शिवाय तो दीर्घकाळ टिकतोही. उद्योग अथवा सेवा क्षेत्रावर नैसर्गिक आणि हवामान बदलाचा होणारा परिणाम तितका तात्काळ आणि प्रत्यक्ष नसतो. यामुळेच शेती उत्पादनातील धोके आणि अनिश्चितता सुद्धा वेगळ्या स्वरुपाच्या आहेत. नैसर्गिक किंवा हवामानविषयक स्थिती, त्यात होणारे बदल आणि त्याचे संभाव्य परिणाम याचे १००% अचुक पुर्व अंदाज करता येत नाहीत. परिणामी बरोबरच ठरतील असे निर्णय घेता येत नाहीत.

धोके आणि अनिश्चितता - एक विरोध:

भविष्यातील घटना आणि परीणामांचे अपुर्ण ज्ञान हे धोके आणि अनिश्चितता या दोन गटात वर्गीकृत करता येतात. शेती क्षेत्रात ह्या घटना नेहमीच्याच आहेत.

सुरूवातीला फार पुर्वी अर्थशास्त्रीय विश्लेषणात अर्थतज्ज्ञ या दोन संकल्पनामध्ये भेद करत नव्हते. साधारणपणे चार दशकांपासुन या दोहोंत भेद केला जात आहे. अलिकडील अर्थशास्त्रीय दृष्टीकोनानुसार धोके हे मोजता येतात, त्यांचे पुर्व अंदाज करता येतात. मात्र अनिश्चिततेचे मोजमाप करता येत नाही.

धोका:

शेती उत्पादनातील धोका म्हणजे अशी स्थिती की जेंव्हा शेती उत्पादनाविषयी घेतलेल्या निर्णयाच्या होणाऱ्या परीणामांची माहिती असते. काही ठराविक संकल्पना आणि व्यक्तीनिष्ठ शक्यतांवरुन धोके मोजता येतात. मात्र घेतलेल्या निर्णयाचे होणारे परीणाम जेव्हा अजीबात माहित नसतात तेव्हा अनिश्चितता उद्भवते. उदा. पावसाची शक्यता, हवामानविषयक पुर्वअंदाज, बाजारभाव-विषयक अंदाज इ. अगोदरच्या अनुभवांवरुन या धोक्यांचा व होणाऱ्या परीणामांचा ठोबळ अंदाज बांधता येतो. शक्यतांवरुन धोके मोजता येतात. मात्र पुर्णपणे अथवा शुद्ध धोक्याची स्थिती वास्तव जगात कोठेही दिसुन येत नाही, कारण होणाऱ्या घटनेच्या सर्व शक्यतांचा बिनचुक अंदाज केव्हाही करता येत नाही.

अनिश्चितता:

धोक्याच्या अगदी उलट जेव्हा शेती उत्पादनाविषयी घेतलेल्या निर्णयाच्या होणाऱ्या परीणामांची कोणतीही शक्यता माहित नसते. तेव्हा अशा स्थितीला शेती क्षेत्रातील अनिश्चितता असे म्हणतात.

अनिश्चिततेच्या स्थितीत घेतलेल्या एखाद्या निर्णयाच्या परीणामांचा कोणताही पुर्वअंदाज बांधता येत नाही. अनिश्चितताही पुर्णपणे व्यक्तीनिष्ठ स्वरुपाची असते. धोक्याप्रमाणे अनिश्चिततेचे मोजमाप करता येत नाही अथवा त्याचा विमा घेता येत नाही. धोक्यासारखा अनिश्चिततेचा प्रभाव कमी करता येत नाही. बाजारातील मागणी आणि पुरवठ्याच्या दोघांच्या आधारे आपण एखाद्या शेती उत्पादनाच्या भविष्यातील किंमतीचा अंदाज घेऊ शकतो. सरकारने त्या पिकाच्या आयात-निर्यातीच्या धोरणात बदल केला तर अगोदरचे अनुभव व शक्यतांच्या सहाय्याने निर्माण होणारे धोके लक्षात घेता येतात मोजता येतात. मात्र तंत्रज्ञानातील बदलामुळे एखाद्या पिकाच्या

उत्पादनात नेमके काय बदल होतील याचा अंदाज करता येत नाही, मोजमापही करता येत नाही ही अनिश्चितता.

धोक्याचे प्रकार:

नैसर्गिक घटक, किंमतीतील चढ-उतार, उत्पादन घटकांची उपलब्धता त्याबरोरच इतरही अनेक घटकांचा परीणाम म्हणजे धोका होय. यावरुन धोक्यांचे काही ठळक प्रकार पडतात.

अ) उत्पादन पातळीचा धोका: सामान्य उत्पादन पातळीपेक्षा कमी उत्पादन होऊन उत्पादन पातळी संदर्भात धोका निर्माण होऊ शकतो. पर्जन्यमान, तापमान, हवेतील आर्द्रता, वादळ, गारपीट, इत्यादी घटकांत बदल होऊन त्याचा परीणाम उत्पादन पातळीवर होतो. याबरोबरच किड, टोळधाड, उत्पादन घटक वेळेवर उपलब्ध न होणे, बी-बियाणे, खते, औषधे, सिंचन सोई योग्य वेळी व योग्य संख्येने उपलब्ध न होणे या कारणांनी सुद्धा उत्पादन पातळीत घट होण्याचा धोका संभवतो. शिवाय उत्पादन तंत्रातील बदलही पुन्हा उत्पादन पातळीसंदर्भात धोका आणि अनिश्चितता निर्माण करतो. उदा. तांदळापेक्षा कापुस उत्पादनात अधिक चढ-उतार होतात.

ब) उत्पादनाच्या बाजार किंमती घटण्याचा धोका: निर्माण झालेले शेती उत्पादन एका विशिष्ट किंमतीला विकले जाणे अपेक्षित असते. मात्र उत्पादन तयार झाल्यानंतर विक्री वेळेला त्याची किंमत घटू शकते. बाजारातील विक्री किंमती ह्या मागणी व पुरवठ्याच्या दाबातुन निर्धारित होत असल्याने मागणी आणि पुरवठ्यावर परीणाम करणाऱ्या घटकांत बदल झाल्याने बाजारात किंमती घटीचा धोका संभवतो. याशिवाय सरकारच्या हमी किंमती, आधारभूत किंमती, उच्चतम विक्री किंमती या शासनाकडुन वेळोवेळी घोषित केल्या जातात. यातुनही किंमत घटीचा धोका संभवतो. याशिवाय सरकारच्या हमी किंमती आधारभुत किंमत, उच्चतम विक्री किंमती या शासनाकडुन वेळोवेळी घोषित केल्या जातात. यातुही किंमत घटीचा धोका संभावतो. याशिवाय शेती उत्पादनांच्या आयात-निर्यातीच्या निर्णय देखील किंमत पातळीत चढ-उतार घडून आणतो.

क) वास्तव परताव्यात घट होण्याचा धोका: फळ पिकासारख्या शेती उत्पादनाचा फलधारणा कालावधी मोठा असतो व अशी शेती करणाऱ्या उत्पादकांची संख्याही मोठी असते. आंबे, बोर यासारख्या पिकांच्या बाबतीत हा काळ २५ वर्षापेक्षा जास्त असतो. या पिकांसाठी उत्पादन खर्च आज केला तरी परतावा मात्र दीर्घ काळानंतर मिळत असतो. भविष्यात चलनवाढ अथवा इतर कारणांमुळे जर पैशाचे मुल्य कमी झाले तर आज केलेल्या खर्चावर भविष्यात मिळणारा वास्तव परताव्याचा दर घटण्याचा धोका संभवतो. शेती उत्पादनांची भविष्यातील किंमतवाढ आणि चलनवाढीचा दर यात समानता राहिलच असे नाही.

ड) उत्पादन घटकांच्या अनुपलब्धतेचा धोका: उत्पादन घटकांची वेळेवर न होणारी उपलब्धता देखील शेती क्षेत्रात अनेक धोके निर्माण करते. उदा. लागवड, आंतर-मशागत अथवा पिक काढणीसाठी वेळेवर मजुर उपलब्ध न होणे. पिकांसाठी आवश्यक ती खते, औषधे, किटननाशके योग्य प्रमाणात व वेळेवर उपलब्ध न झाल्याने त्यासाठीचा खर्च वाढुन उत्पादन खर्चात वाढ घडुन येऊ शकते व नफा कमी होऊ शकतो. या आदानांच्या संख्यात्मक पुरवठ्यात

बदल झाल्याने देखील धोका निर्माण होतो.

इ) तंत्रज्ञानाबाबतची अनिश्चितता: दीर्घकाळात शेतीच्या उत्पादन तंत्राची भुमिका अनिश्चित स्वरुपाची असते. शिवाय नैसर्गिक घटक देखील उत्पादन घटकांतील अंतर्गत सहसंबंधावर परिणाम करतात. तांत्रिक बदल कृषी क्षेत्रात सर्वात जास्त अनिश्चितता निर्माण करतात. म्हणून नवीन उत्पादन घटक संयोग, शेती उत्पादनाच्या नवीन व लवचिक पद्धती, किड, रोग नियंत्रणाच्या नवीन पद्धती विकसीत करणे व त्यांचा वापर वाढवणे आवश्यक आहे.

ई)संख्यात्मक वित्त पुरवठ्याची अनिश्चितता: संख्यात्मक वित्त पुरवठ्यातील बदल देखील शेती क्षेत्रात अनिश्चितता निर्माण करतो. संख्यात्मक कर्ज पुरवठ्याबाबतचा कोणताही धोरणात्मक निर्णय कर्ज पुरवठ्यात आणि शेती व्यवस्थापनात अनपेक्षित बदल घडवुन आणतो. आधुनिक शेतीही प्रामुख्याने तंत्रज्ञानाचे फलीत असल्याने या तंत्रज्ञानासाठी मोठी भांडवल गुंतवणूक करावी लागते. यासाठी वेळेवर व योग्य प्रमाणात वित्त पुरवठा होणे तितकेच आवश्यक असते. वरील सर्व धोके लक्षात घेऊन त्यासाठी शेतकरी काही उपाय-योजनाही करत असतो.

### धोके व अनिश्चितता कमी करण्याचे उपाय:

प्रत्येक शेतकरी वेळोवेळी शेतीतील धोके आणि अनिश्चिततेपासुन बचावासाठी वेगवेगळी पावले उचलत असतो. यामध्ये कमी धोक्याचे पीक निवडणे, पर्याप्त उत्पादन तंत्राची निवड करणे, शेती उत्पादनांच्या व आदानांच्या किंमत बदलाचा अंदाज घेणे, उत्पादन विक्रीचे वायदे व्यवहार करणे, शेतीचे विविधीकरण करणे, लवचिक उत्पादन पद्धतीची निवड आदी उपायांबरोबरच पिक विमा या साधनांचाही वापर करतो.

कोणत्याही व्यवसायात अनिश्चितता जेवढी जास्त तेवढी जोखिमही जास्त असते. शेती व्यवसायात ह्या दोन्ही बाबी जास्त असल्याने याक्षेत्रात पिक विमा घेण्याची पद्धत अंमलात येण्यास बराच काळ लागला. दुष्काळ, महापुर, चक्रीवादळ, गारपीट, किड, हवामान बदल, इ. नैसर्गिक संकटे शेती उत्पादनाला नेहमीच प्रभावीत करतात. ही संकटे नैसर्गिक असल्याने प्रत्येक वेळी खबरदारी घेणे शक्य होईलच असे नाही. या परीस्थितीत 'पिक विमा' खऱ्या अर्थाने गरजेचा ठरतो. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात नमुद केल्या प्रमाणे नैसर्गिक आपत्तीमुळे येणारी विपन्नावस्था दुर करण्याचा एक महत्वाचा मार्ग म्हणजे पिक विमा होय.

### विदेशातील पिक विम्याचा अनुभव:

रशिया, जपान, अमेरिका, इंग्लंड आदि देशांचे नाव पिक विम्याच्या बाबतीत प्रथमत: घेतले जाते. या देशांबरोबरच आज कॅनडा, फ्रान्स, श्रीलंका, चीन, रुमानिया, मेक्सिको, इस्त्रायल इ. विकसीत व विकसनशील देशांनीसुद्धा पिक-विम्याचा स्विकार केला आहे.

१९४७ साली जपानमध्ये शेतीविषयक नुकसान भरपाईचा कायदा संमत झाला, त्यावरच पिक विमा योजना आधारीत आहे. कोणत्याही प्रदेशाच्या राज्याच्या सर्व भागांमध्ये एकाचवेळी नैसर्गिक संकटे येत नसल्याने सर्वांच्या पिक विम्याच्या हप्त्याची जी रक्कम गोळा होते, त्यातुन प्रभावीत क्षेत्रांना मदत करता येते. जपानमध्ये सुरुवातीला पिक विम्याची भरपाई रक्कम आणि अल्पकालीन कर्ज पुरवठ्याची रक्कम यांची सांगड

घातली गेल्याने ही पद्धत यशस्वी झाली, लोकप्रियही ठरली. इतर देशांपैकी रशियात ही योजना १९२३ पासुन सुरू होती. पुढे ती व्यापक स्वरुपात अंमलात आली. फ्रान्समध्ये शेतकऱ्यांचे नैसर्गिक आपत्तीपासुन होणारे नुकसान कमी करण्यासाठी १९६४ साली ही योजना लागू करण्यात आली. कॅनडामध्ये पिक विमा योजना १९५९ पासुन तर श्रीलंकेत ती १९७४ पासून सुरू आहे.

### भारतातील पिक विमा योजना:

भारतात ही योजना लागु करण्याची सुचना स्वातंत्र्यपुर्व काळापासुन करण्यात येत आहे. अमेरिकेतील संघीय पिक-विमायोजनेच्या आधारावरच भारतात पीक आणि पशु-विमा सुरू करावा असे डॉ. नायडु समीतीने मद्रास प्रांतातील अभ्यासात सुचवले होते. याशिवाय सरैया समिती, प्रियोळकर समिती व इतरही काही संस्थांनी पिक विम्याचे आग्रही प्रतीपादन केले होते. यासंदर्भात केंद्रानेही काही योजना तयार करुन राज्यांना पाठवल्या होत्या. आर्थिक कारणामुळे या योजना प्रत्यक्षात येऊ शकल्या नाहीत. १९६९ मध्ये पंजाबच्या काही भागात गहु, हरभरा, कापुस आणि ऊस या पिकांसाठी विम्याचा प्रयोग करण्यात आला. या प्रयोगाला फारसे यश मिळू शकले नाही. धारणा क्षेत्रांच्या लहान-लहान आकारामुळे वैयक्तिक आधारावर पिक विमा योजना लागू करणे कठीण असल्याची जाणीव यावेळी झाली. त्यातुनच क्षेत्राधारीत किंवा गट आधारावर विमा काढण्याची कल्पना पुढे आली.

१९७९ पासुन राज्यांच्या सहयोगाने क्षेत्राधारीत विमा योजना लागू करण्याचे काम जनरल इन्शुरन्स कंपनी ही विमा कंपनी करते आहे. वेगवेगळ्या वित्त संस्थांनी दिलेल्या पिक कर्जाशी या योजनेचा संबंध जोडण्यात आला आहे. एका समान भौगोलिक क्षेत्रात पिकांचे उत्पादन हमी दिलेल्या पातळीच्या खाली झाले तर त्या भागातील शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचा लाभ मिळतो.

### पिक विम्याची व्यापक योजना:

१९८५-८६ च्या अंदाज पत्रकात सरकारने पिक विम्याची व्यापक योजना घोषित केली व १९८५ च्या खरीप हंगामापासुन ती लागुही झाली. सुरूवातीला राज्य सरकारे व जनरल इन्सुरन्स कॉर्पोरेशन्स यांच्यामार्फत ही योजना राबविली जात असे. व्यापारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व सहकारी संस्थांनी दिलेले पिक कर्ज आणि विमा भरपाई यांची सांगड या योजनेत घातलेली आहे. तांदुळ, गहु, तेलबिया, डाळी, तृणधान्य या पिकासांठी ज्या राज्यांनी पिक-कर्ज योजना सुरु केली आहे तेथे पिक विमा योजना लागु होते. युद्ध व आण्विक संकट वगळता पिकांच्या बाबतीत असणारी इतर सर्व जोखीम या अंर्तगत संरक्षित होते. व्यापक पिक विमा योजना लागू केलेल्या राज्यातील सर्व भाग सर्व पिकांसाठी योजनेखाली येत नाही. विशिष्ट पिकांसाठी ठराविक तालुके निश्चित करण्यात येतात व त्यांनाच भरपाई मिळते.

### सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना:

नैसर्गिक आपत्ती, किडी आणि रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास नुकसानीच्या प्रमाणात शेतकऱ्याला विमा संरक्षण मिळावे, पिकांच्या नुकसानीच्या परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित रहावे यासाठी राज्यात सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना सुरु करण्यात आली

आहे.

**योजनेचा उद्देश:**

नैसर्गिक आपत्ती, किडी आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास नुकसानीच्या प्रमाणात शेतकऱ्याला विमा संरक्षण मिळावे, पिकांच्या नुकसानीच्या प्रमाणात शेतकऱ्याला विमा संरक्षण मिळावे, पिकांच्या नुकसानीच्या परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित रहावे यासाठी राज्यात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीय कृषी विमा योजना रब्बी १९९९-२००० पासून अधिसूचित क्षेत्र हा घटक धरुन सुरू करण्यात आली आहे. खरीप हंगाम २०१४ पासून राज्यात राष्ट्रीय पीक विमा कार्यक्रमांतर्गत सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना राबविण्यात येत आहे.

**विमा संरक्षणाच्या बाबी:**

सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजनेअंतर्गत नैसर्गिक आग, वीज कोसळणे, वादळ, गारपीट, चक्रीवादळ, पूर भूस्खलन, दुष्काळ, किड व रोग या शेतकऱ्यांना टाळता न येण्याजोग्या कारणांमुळे झालेल्या नुकसानीस विमा संरक्षण देण्यात येणार आहे. युद्ध आणि अणुयुद्धाचे दुष्परिणाम, हेतुपुरस्सर केलेले व इतर टाळता येण्याजोगे धोके यामुळे होणाऱ्या नुकसानीस विमा संरक्षण मिळणार नाही.

**योजनेची वैशिष्ट्ये:**

ही योजना बिग कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक स्वरुपाची असून कर्जदार शेतकऱ्यांना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी सक्तीची आहे.

कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत भाग घेण्याची कार्यपद्धती राष्ट्रीय कृषी विमा योजनेप्रमाणेच आहे. या योजनेत विमा हप्ता दर खरीप हंगामासाठी ११ टक्के, रब्बी हंगामासाठी ९ टक्के व नगदी पिकांसाठी १३ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे. या योजनेसाठी पिकाचा जोखीमस्तर ८० टक्के ठेवण्यात आला, असून वास्तवदर्शी दराने विमा हप्ता आकाण्यात येणार असल्याने नुकसान भरपाईची रक्कम संबंधित विमा कंपनीकडून अदा केली जाणार आहे. उंबरठा उत्पन्न निश्चित करण्यासाठी मागील सात वर्षांतील नैसर्गिक आपत्ती आदींची दोन वर्षे वगळून किमान पाच वर्षांच्या पिकाचे सरासरी उत्पन्न विचारात घेतले जाणार आहे. गारपीट, भूस्खलन यासारख्या स्थानिक आपत्तीमुळे होणाऱ्या पीक नुकसानीस वैयक्तिस्तरावर विमा संरक्षण दिले जाणार आहे. हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत शेतकऱ्यांच्या अपेक्षित उत्पन्नामध्ये सरासरी उत्पन्नाच्या ५० % पेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर हवामान घटकांची आकडेवारी किंवा उपग्रहाद्वारे प्राप्त होणाऱ्या छायाचित्रांना अनुसरून किंवा राज्य शासनाकडील बाधित क्षेत्राचा अहवाल या प्रातिनिधिक निर्देशांकाच्या आधारे अपेक्षित नुकसान भरपाई रकमेच्या २५ टक्के रक्कम आगाऊ देण्यात येणार आहे. ती अंतिम नुकसान भरपाईतून समायोजित करण्यात येणार आहे. किनारपट्टीच्या प्रदेशात चक्रीवादळामुळे शेतात कापलेल्या पिकांना (कापणीनंतर दोन आठवड्यांपर्यंत) विमा संरक्षण देय आहे. हवामान आधारित पीक विमा योजनेसाठी निवडण्यात आलेले जिल्हे व पिके या योजनेतून वगळ्यात आले आहेत.

**योजनेत समाविष्ट पिके व शेतकरी:**

सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजनेअंतर्गत अन्नधान्य पिके (कडधान्य, तृणधान्य), तेलबिया,

कांदा, कापूस या पिकांना विमा संरक्षण देण्यात येणार आहे. ही योजना राज्यात खरीप हंगामासाठी अधिसूचित केलेल्या ग्रामपंचायत स्तरावर किंवा महसूल मंडल / मंडलगट स्तरावर किंवा तालुका / तालुकागट स्तरावर अधिसूचित पिकांसाठी राबविण्यात येणार आहे. अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित पिके घेणारी कुळे अगर भाडेपटट्याने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसह सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत.

**योजना कार्यान्वित करणारी यंत्रणा:**

सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना राज्यात भारतीय कृषी विमा कंपनीबरोबरच केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या व निवडण्यात आलेल्या इतर खासगी विमा कंपन्यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार आहे.

कोकण महसूल विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग; नाशिक महसूल विभागातील नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबार, अहमदनगर; पुणे महसूल विभागातील पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर; औरंगाबाद महसूल विभागातील औरंगाबाद, जालना, लातूर नांदेड, परभणी; अमरावती महसूल विभागातील अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम; नागपूर महसूल विभागातील वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्यांत भारतीय कृषी विमा कंपनी मुंबईद्वारे ही योजना कार्यान्वित करण्यात येणार आहे. सुधारित राष्ट्रीय विमा योजना शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त असून त्यामुळे प्रतिकूल परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य कायम राखण्यास निश्चितच मदत होणार आहे. शेतकऱ्यांनी उच्च प्रतीचे आधुनिक तंत्रज्ञान आणि सामुग्री वापरावी यासाठी त्यांना या योजनेद्वारे प्रोत्साहन मिळणार आहे. या योजनेचा राज्यातील अधिकांश शेतकऱ्यांनी लाभ घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची:**


1) R.Dutt & KPM Sundharam, *Indian Economy*, 59*th* Edition, 2009, S. Chand Publication, Delhi- pp- 495-498.
2) S. Subha Reddy, *Agricultural Eco.*, Ist Edition - 2005, Oxford - IBH Publishing Co.Pvt. Ltd. pp-360-366.
3) Lekhi R. K. Sing - Agricultural Eco., 4th Edition - 2004, Kalyani Pub. New Delhi, 100-111.
4) डॉ. कविमंडन विजय, *कृषी अर्थशास्त्र*, द्वितीय आवृत्ती, २००२, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ.२३९
5) पाटील सुभाष, अर्थसंवाद खंड ३९, जुलै सप्टें. २०१५, पृ. १३७-१४१.
6) पाध्ये रमेश, *कृषी क्षेत्रासाठी मेक इन इंडिया*, दैनिक लोकसत्ता, २८ मे २०१५, पृ. ७.
7) डॉ. आदिक अविनाश, *पीक विमा योजना*, दैनिक सार्वमत, १२ ऑगस्ट २०१४, पृ. ७.
8) पाध्ये रमेश, *संकटातील शेती आणि शेतकरी*, दैनिक लोकसत्ता, ८ ऑगस्ट २०१५, पृ. ७.
9) डॉ. भुसारे दिपक, *कृषी प्रधान भारतात स्वतंत्र कृषी अर्थसंकल्पाची गरज*, योजना, मार्च २०१५, पृ. ६९.
10) डॉ. देशपांडे सागर, *शेती-आपण जागे कधी होणार*, साप्ताहिक स्वतंत्र नागरिक, २० ते २६ जुलै २०१४, पृ.७.

# ग्रंथ परीक्षण

## थकित कर्ज वसुलीचे धोरण व पध्दत

मंजूषा मुसमाडे, पुणे,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
नौरोसजी वाडिया महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९८८१३४०७२५

(ग्रंथ: थकित कर्ज वसुलीचे धोरण व पध्दत - Recovery of Non-Performing Assets-Policies and Procedures. लेखक : अ‍ॅड. सरीता भाकरे, डॉ. गजानन भाकरे; अक्षर दालन प्रकाशन, कोल्हापूर)

बँकांची नॉन-परफॉर्मिंग अ‍ॅसेट्स अर्थात थकित कर्जे यासारख्या अतिशय महत्त्वाच्या विषयावरील पीएच्.डी. संशोधनावर प्रस्तुत पुस्तक आधारित आहे. एकूण नऊ प्रकरणांमध्ये विषयाचा सविस्तर आढावा घेतलेला आहे.

प्रस्तावनेमध्ये बँकिंग क्षेत्राचा धावता आढावा घेताना टंडन समिति (१९७५), पैंढारकर समिती (१९८१), नरसिंहम समिती, (१९९१) आणि रिझर्व्ह बँकेच्या आरोग्य संहिता (Health code 1994) यांच्या शिफारशी नमूद केल्या आहेत.

१९९२ पासून बँकिंग क्षेत्रात झालेले बदल आणि त्यामुळे निर्माण झालेली आव्हाने आणि समस्या, विशद करताना लेखकाने त्यांचे स्वरूप 4Cs च्या रूपात मांडले आहे. हे 4Cs म्हणजे पत (Credit) ग्राहक (Customer), संगणक (Computer) आणि भांडवल पुनर्रचना (Capital restructuring) होत. या आव्हानांना तोंड देत भारतीय बँकिंग क्षेत्राने गेल्या दोन दशकांत चांगली प्रगती केल्याचे मत लेखकाने सुरूवातीलाच मांडले आहे.

त्यानंतर एनपीए म्हणजे बँकांची थकित कर्जे ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी लेखकाने विविध तज्ज्ञांची मते आणि व्याख्या दिल्या आहेत. यात तिरूतानी मुनिवेलू (२०००) बी. आर. रेड्डी (२००१), जोसेफ सिंर्की, पी. एन. जोशी, भास्कर राव (१९९२) यांच्या मतांचा प्रामुख्याने विचार केलेला आहे. या सर्वांचा थोडक्यात मथितार्थ असा की, एनपीए म्हणजे बँकांची

अशी कर्जे की ज्याचे व्याज व मुद्दलाची परतफेड होत नाही. याचे विनोदी शैलीत स्पष्टीकरण देताना लेखकाने म्हटले आहे की, P.A. म्हणजे, *पैसा आया* आणि NPA म्हणजे *पैसा नहीं आया!* शिवाय लेखक टी. पी. मिश्रा (२००३) यांच्या मताधारे असेही म्हणतात की, एनपीए संकल्पना वस्तुनिष्ठ नसून लवचिक आहे आणि प्रत्येक बँकेच्या शाखेचा व्यवस्थापक परिस्थितीजन्य घटकांवरून याची निश्चिती करत असतो.

एनपीए चे वर्गीकरण व वसुली कृती हे आकृतीद्वारे स्पष्ट करून प्रत्येक प्रकारचे सविस्तर वर्णन आहे. दुसऱ्या प्रकरणात विविध समित्या आणि तज्ज्ञांच्या लेखांचा विश्लेषणात्मक आढावा घेतलेला आहे. लेखकाच्या मते, एनपीए ही बँकांची वैयक्तिक जबाबदारी आहे. बँकांनी आपल्या कर्जाची गुणवत्ता सांभाळणे हे त्यांचे कर्तव्य आहे. कारण योग्य कर्जदाराची निवड करणे हे बँकांच्याच हातात असते.

बँकांच्या समस्यांचा सविस्तर आढावा घेताना सी. रंगराजन, माधवराव, भट्टाचार्य अशा सुप्रसिद्ध समित्यांच्या शिफारशीबरोबरच मराठी अर्थशास्त्र क्षेत्राला सुपरिचित असणाऱ्या डॉ. यशवंत रारावीकर (१९९९) यांचाही लेख लेखकाने विचारात घेतल्याचे दिसते. डॉ. रारावीकरांच्या मते भारतीय बँकांनी ठेवी व कर्जांच्या बाबतीत संख्यात्मकदृष्ट्या प्रगती केली असली, तरी गुणात्मकदृष्ट्या म्हणजे प्राधान्य क्षेत्रांना कर्जे, पुरेशी भांडवल उपलब्धता व नफाप्रदता या बाबतीत बँकांची कामगिरी प्रभावी झालेली नाही.

तिसऱ्या प्रकरणात कर्जवसुलीबाबत चर्चा केली आहे. अर्थात वसुलीची कायदेशीर यंत्रणा असली, तरी बँकांकडे कोणतीही एकसमान पद्धत नसते हे लक्षात घेतले आहे. लेखकाने थकित कर्जांच्या वसुलीपेक्षा मुळात थकित कर्जे निर्माण न होण्यावरच बँकांनी भर द्यावा अशी बहुमोल सूचनाही केली आहे. त्यासाठी थकित कर्जे कपातीचे काही मंत्र ही दिले आहेत. यात बँकांनी ग्राहकांशी संबंध सुधारणे, संभाव्य थकित कर्जे ओळखून काळजीपूर्वक वसुलीसंबंधी पावले उचलणे, लोक अदालत, तडजोड, कर्जमाफी इ. उपाय सुचवले आहेत.

पुढील संपूर्ण प्रकरण तडजोडी व कर्ज समायोजन (Compromise and Settlement) यासाठी आहे. यात तडजोडीबाबतच्या पद्धतींचे मार्गदर्शन आहे. शिवाय, महत्त्वाचे म्हणजे बँकांच्या थकित कर्जांच्या मूल्यनिश्चितीसाठीचे एक प्रारुपही लेखकाने दिलेले आहे.

या प्रारुपात कर्जदार व्यावसायिकाशी निगडित बाबींना भारित मूल्य देऊन त्यांची कर्जफेडीची क्षमता निश्चित करण्याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. उदा. थकित कर्जदाराचा व्यवसाय पूर्णतः चालू अवस्थेत असेल तर दोन गुण, अंशतः चालू असेल तर एक गुण व बंद अवस्थेत असेल तर शून्य गुण अशा रीतीने मूल्यांकन करावयाचे आहे. शिवाय, थकित कर्जाचा कालावधी, रोख्यांचे बाजारमूल्य व पत अशा घटकांचाही विचार या प्रारुपात केलेला आहे. यावरून प्रत्येक थकित कर्ज वसुलीबाबत निश्चित धोरण बँकांना आखता येऊ शकेल. मात्र, या प्रारुपाची उपयुक्तता कितपत सिद्ध झाली आहे, याचे विवेचन मात्र लेखकाने दिलेले नाही.

पुढील प्रकरणांत अनुक्रमे लोकअदालत, रोखेविक्री, बँकांजवळील हमी कागदपत्रे आणि एनपीए कमी करण्याविषयीची चर्चा केलेली आहे.

यात निव्वळ थकित कर्जे-गुणोत्तर, ठेवी-धोका गुणोत्तर अशा विविध तांत्रिक संकल्पनांचा उहापोह केलेला आहे.

एकंदरीत, आधुनिक बँकांच्या एनपीए म्हणजेच थकित कर्ज समस्येवर तात्त्विक व तांत्रिक पद्धतीने विवेचन करणारे हे पुस्तक आहे. पुस्तकातील माहिती उपयुक्त आहे, यात शंका नाही. मात्र, लेखन पाठ्यपुस्तक पद्धतीचे असल्याने त्यात रोचकता व प्रत्यक्ष व्यावहारिक उदाहरणे यांचा अभाव जाणवतो. शिवाय, पुस्तकाची मांडणी करताना प्रकरणाचे शीर्षक, क्रमांक आदि बाबी अधिक ठळक असायला हव्या होत्या. तसेच, पुस्तकाच्या प्रकाशनाचे वर्षही नमूद केलेले नाही. अशा काही त्रुटी वगळल्या, तर प्रस्तुत पुस्तक बँकिंग क्षेत्रातील अभ्यासकाला वाचनीय ठरेल.

---

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा
## अर्थतज्ज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेषांक

***अर्थसंवाद: एप्रिल-जून २०१६*** हा **अर्थतज्ज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेषांक** प्रकाशित करावयाचा आहे. या विशेषांकासाठी आजीव सदस्यांनी सामान्यपणे ६ ते १० पृष्ठांचा लेख प्रमुख संपादकाकडे **दि.२० एप्रिल २०१६** पर्यंत पाठवावा. या विश्लेषणात्मक लेखांमध्ये शक्यतो तक्ता घेऊ नये. अगदीच आवश्यक असेल तर लहान आकाराचा तक्ता घ्यावा. या विशेषांकात जास्तीत जास्त संशोधनपर लेख प्रकाशित करता यावेत यासाठीच हे सूचित करण्यात आले आहे. विशेषांकासाठी लेखांचे विषय याप्रमाणे आहेत-

१) अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार, २) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन, ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्थशास्त्रीय ग्रंथांचा अभ्यास, ४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार, ५)डॉ. बाबासाहेब आंबेडकर: सहकारी शेतीचे पुरस्कर्ते, ६) रुपयाच्या प्रश्नाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, ७) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची वर्तमान काळातील उपयुक्तता, ८) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चलनविषयक विचार, ९) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आर्थिक विचारक्रांती, १०) महिला सक्षमीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान. ११) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारासंबंधीचे कार्य व विचार, १२) तत्कालीन आर्थिक समस्यांबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, १३) देशाला गरज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची.

शोधनिबंध पाठविताना कृपया लेखकांनी फॉण्ट व इतर बाबींसंबंधी या अंकातील **पृष्ठ क्र.३३०** वरील चौकट पहावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# अर्थ शब्दांची वाट पाहे

## प्रदेश-प्रवेश

## (Penetration)

**ज. फा. पाटील, कोल्हापूर,**
माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९४२२०४६३८२

प्रदेश-प्रवेश/प्रदेश-विस्तार (Penetration):

विपणन क्षेत्रात एक शब्द इंग्रजीत सध्या मोठ्या वारंवारितेने वापरला जातो. तो म्हणजे Penetration मूळ क्रियापदाचा अर्थ लक्षात घेतला तर म्हणजे Penetration म्हणजे प्रवेश करणे. एखादी वस्तू वेगवेगळ्या विभागात वा प्रदेशात ग्राहक किती वापरतात, किती ग्राहकांना त्या वस्तूची माहीती आहे, किती विक्री केंद्रात-दुकानात ती ठेवली जाते-त्याचे कमी अधिक प्रमाण व्यक्त करण्यासाठी सध्या विपणन क्षेत्रात Penetration हा शब्द वापरतात. प्रस्तुत लेखकाच्या मते उपरोक्त सर्व अर्थासाठी मराठी प्रदेश-विस्तार किंवा प्रदेश-प्रवेश असे शब्द सूचविता येतील. त्यापैकी प्रदेश-प्रवेश हा शब्द अधिक सूचक व अर्थपूर्ण वाटतो.

हे त्रैमासिक प्रकाशक डॉ.आर.बी.भांडवलकर (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिध्द केले.

## भावपूर्ण श्रध्दांजली

### डॉ. सर्वोत्तम न. कुलकर्णी

डॉ. सर्वोत्तम न. कुलकर्णी यांचे १७ नोव्हेंबर २०१५ रोजी दु:खद निधन झाले. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ते ज्येष्ठ आजीव सदस्य होते. डॉ.कुलकर्णी यांनी नाशिकच्या एन.डी.एम.व्ही.पी. संस्थेच्या विविध महाविद्यालयांमध्ये २८ वर्षे नोकरी केली. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी तीन वर्षे नाशिकरोड येथील महिला महाविद्यालयात प्राचार्यपद भूषविले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे ते माजी अध्यक्ष होते. विविध परिषदांमध्ये त्यांनी बीजभाषक, सूत्रसंचालक तसेच तांत्रिक सत्रांचे अध्यक्षपदही भूषविले. मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

प्रमुख संपादक, अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषद

## भावपूर्ण श्रध्दांजली

### डॉ.भिमा नामदेव सापनर

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य व पिंपळगांव(ब.) येथील क.का. वाघ महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.भिमा नामदेव सापनर यांचे १० जानेवारी २०१६ रोजी सिन्नरजवळ कार अपघातात निधन झाले. अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक अर्थसंवादचे ते सन्माननीय लेखक होते. विविध परिषदांमध्ये त्यांनी सूत्रसंचालक तसेच तांत्रिक सत्रांचे अध्यक्षपदही भूषविले. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांची अपरिमित हानी झाली असून मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे त्यांना विनम्र श्रध्दांजली.

प्रमुख संपादक, अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषद

## भावपूर्ण श्रध्दांजली

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य व मालेगाव येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ.राजेंद्र माधवराव शिरसाठ यांचे वयाच्या ४९ व्या वर्षी १ डिसेंबर २०१५ रोजी पुणे येथील रुग्णालयात आकस्मिक निधन झाले. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम करताना शेतीचे व विकासाचे अर्थशास्त्र या विषयांवर त्यांचे विशेष प्रभुत्त्व होते मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

प्रमुख संपादक, अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषद

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा
## शेतीआधारित उद्योग विशेषांक

***अर्थसंवादः जानेवारी-मार्च २०१६*** हा **शेतीआधारित उद्योग विशेषांक** प्रकाशित करावयाचा आहे. या विशेषांकासाठी आजीव सदस्यांनी सामान्यपणे ६ ते १० पृष्ठांचा लेख प्रमुख संपादकाकडे **दि.२९ फेब्रुवारी २०१६** पर्यंत पाठवावा. या विश्लेषणात्मक लेखांमध्ये शक्यतो तक्ता घेऊ नये. अगदीच आवश्यक असेल तर लहान आकाराचा तक्ता घ्यावा. या विशेषांकात जास्तीत जास्त संशोधनपर लेख प्रकाशित करता यावेत यासाठीच हे सूचित करण्यात आले आहे. विशेषांकासाठी लेखांचे विषय याप्रमाणे आहेत-

१) भारतातील शेतीआधारित उद्योगः सद्यस्थिती व भवितव्य, २) महाराष्ट्रातील शेतीआधारित उद्योगः सद्यस्थिती व भवितव्य, ३) मराठवाड्यातील शेतीआधारित उद्योगः सद्यस्थिती व भवितव्य, ४) विदर्भातील शेतीआधारित उद्योगः सद्यस्थिती व भवितव्य, ५)पश्चिम महाराष्ट्रातील शेतीआधारित उद्योगः सद्यस्थिती व भवितव्य, ६) उत्तर महाराष्ट्र/खान्देशातील शेतीआधारित उद्योगः सद्यस्थिती व भवितव्य, ७) भारतीय व विदेशी शेतीआधारित उद्योग, ८) इस्त्राईलमधील शेती आधारित उद्योगाची स्थिती, ९) भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीआधारित उद्योगांचे स्थान, १०) महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत शेतीआधारित उद्योगांचे स्थान, ११) शेतीआधारित उद्योग व ग्रामीण विकास, १२) शेतमाल बाजारपेठ व शेतीआधारित उद्योग, १३) जिल्ह्यातील शेतीआधारित उद्योग, १४) शेतीआधारित उद्योग व सहकार.

**शोधनिबंध पाठविताना कृपया लेखकांनी फॉण्ट व इतर बाबींसंबंधी या अंकातील पृष्ठ क्र.३३० वरील चौकट पहावी.**

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

## निवेदन

### अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र शहाद्याच्या पत्त्यावर पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा. मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा

### जुलै - सप्टेंबर २०१६ अंकासाठी लेख पाठवा

*आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... 'अर्थसंवाद' च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

फक्त एवढंच् करा....

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 अथवा PageMaker 7 सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा तक्ता घ्यावा. लेखातील तक्त्याचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा. तक्त्याची रुंदी १३ सें.मी.पेक्षा जास्त नसावी.
- PageMaker 6.5 किंवा 7 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word किंवा PDF मध्ये लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्डकॉपीज् व एक सॉफ्टकॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठवणे आवश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.
- संदर्भ सूची देताना पुढील पध्दतीने देणे आवश्यक आहे: कुरुलकर र. पु., *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती, २००६, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१०.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

जिल्हा:.................................

विद्यापीठ क्षेत्र: ..........................

# मराठी अर्थशास्त्र परिषद

सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये नोंदविलेली नोंदणी क्र.एफ-४६१५ मुंबई.

## आजीव / साधारण सभासदत्वासाठीचा अर्ज

(कृपया अर्ज मराठीतून भरावा)

फोटो

१. संपूर्ण नाव : ..............................................................

२. महाविद्यालय/संस्थेचे नाव: ..............................................................

३. शैक्षणिक पात्रता : ..............................................................

..............................................................

४. पत्रव्यवहारासाठी पत्ता : ..............................................................

..............................................................

५. दूरध्वनी क्र.(कोड सह) :

महाविद्यालयाचा / संस्था:.................... निवास: .................................

भ्रमणध्वनी क्र.: ............................ ई-मेल: .................................

६. वर्गणी:

आजीव सभासद रु.३०००+ इमारत निधी रु.२०००+ सभासद सूची रु.१००= **रु.५१००/-**

(साधारण सभासद रु.३००/-)

अर्जदाराची स्वाक्षरी

श्री/श्रीमती.......................................... यांचेकडून परिषदेची आजीव/साधारण सभासद वर्गणी रुपये:............. आज दि................. रोजी रोख/मनी ऑर्डर / डीडी ने मिळाली.

कार्यवाह - खजिनदार

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.आर.बी.भांडवलकर, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.आर.बी.भांडवलकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी आर.बी.भांडवलकर असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.आर.बी.भांडवलकर,
मुद्रक व प्रकाशक

International Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

# अर्थसंवाद

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.६,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

डॉ. सुहास आव्हाड,
अध्यक्ष
ज्ञानदीप, गोल्डन सिटी,
अकोले बायपास रोड, संगमनेर,
जिल्हा अहमदनगर, ४२२ ६०५
भ्रमणध्वनी: ९९२२४३५८७१

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष
प्लॉट नं.१०, प्रोफेसर कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे,
जळगाव, जिल्हा-जळगाव-४२५००१,
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह खजिनदार
गजानन नगर, पिंपळगावरोड,
यवतमाळ-४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४८८६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९, जिल्हा नंदुरबार,
भ्रमणध्वनी:९८२२६६५१४१

|| सिध्दिरनेकान्तात् ||

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

ता. बारामती -४१३१०२, जि. पुणे

(कला, विज्ञान व वाणिज्य)

जैन धार्मिक अल्पसंख्यांक संस्था

नॅक पुर्नःमूल्यांकित B दर्जा प्राप्त

ISO - CERTIFIED - 9001 - 2008

☎ (02112) 222405, Fax : (02112) 222728

## * महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये *

* अल्पसंख्याक दर्जा प्राप्त महाविद्यालय
* पुर्नमूल्यांकनात 'बी' ग्रेड प्राप्त झालेले महाविद्यालय,
* आय.एस.ओ. ९००१-२००८ मानांकन प्राप्त महाविद्यालय
* ११ वी पासून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विविध विषयांच्या अध्यापनाची सोय
* विषयांची विविधता आणि त्यामुळे विषय निवडीला अधिक वाव
* अनुभवसंपन्न, व्यासंगी प्राध्यापक वर्ग
* एच.एस.सी बोर्ड आणि विद्यापीठ परीक्षांच्या उत्कृष्ठ निकालाची दीर्घ परंपरा
* पदवी तसेच पदव्युत्तर परीक्षेसाठी कला शाखेस १०, वाणिज्य शाखेत १, विज्ञान शाखेत ९ स्पेशल विषयांची सोय
* कला शाखेत फंक्शनल इंग्लिश या अभ्यासक्रमाची सोय
* कॉमर्स प्रयोगशाळा
* साडे आठ हजार विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रवेश
* एक लाखापेक्षा अधिक ग्रंथ आणि १५० पेक्षा अधिक नियतकालिकांनी सुसज्ज ग्रंथालय, क्रमिक पुस्तक विभागात विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश
* संगणक लॅबसह ११ विषयांच्या भव्य आणि अद्ययावत प्रयोगशाळा
* भाषा विज्ञान प्रयोगशाळा
* एम.बी.ए.प्रवेश पूर्व तयारी परीक्षा
* बारामती नगरपालिकेच्या हद्दीत ४० एकरांचा शांत, स्वच्छ परिसर
* प्रशस्त क्रिडांगण, ४०० मी. रनिंग ट्रॅक आणि विविध खेळांचा नियमित सराव.
* अद्ययावत व्यायामशाळा
* मुलांची व मुलींची स्वतंत्र वसतीगृहे
* योगाभ्यास केंद्र
* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र
* राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.)
* राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.)
* कमवा आणि शिका योजना
* बहि:शाल शिक्षण केंद्र
* कविवर्य मोरोपंत वाद विवाद वक्तृत्व स्पर्धेचे दरवर्षी आयोजन.
* "अनेकांत राष्ट्रीय वाद व वक्तृत्व स्पर्धा" व अनेकांत व्याख्यानमाला
* सामान्यज्ञान परीक्षांचे आयोजन आणि स्पर्धात्मक परीक्षांची पूर्वतयारी
* विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन
* विद्यार्थी ग्राहक भांडार
* रात्र अभ्यासिकेची सोय
* विद्यार्थी व विद्यार्थिनी विश्रामिका
* कॅन्टीन
* परिसरात बँकेची सुविधा
* अनेकांत मुद्रणालय
* विज्ञान प्रयोगशाळा
* बोटॅनिकल गार्डन, ग्रीन हाउस, नर्सरी
* सुसज्ज सेमिनार हॉल
* भव्य व सुसज्ज सभागृह (जीवराज हॉल)
* गुणी विद्यार्थ्यांना विविध पारितोषिके
* विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती आणि फ्रिशिप्स
* बॉटनी पी.जी.रिसर्च सेंटर
* व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम व यु.जी.सी.पुरस्कृत करिअर ओरिएंटेड प्रोग्रॅम्स
* इंटरनेट कॅफे
* ई. जरनल्स, ई बुक्स व डाटा बेसेस



प्राचार्य
डॉ. चंद्रशेखर वसंतराव मुरुमकर

सचिव
श्री. जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर)

(जाहिरात सहकार्य : डॉ. रामभाऊ खाडे, स्थानिक कार्यवाह, म.अ.प.)

Registration No.31918/77 अर्थसंवाद, डिसेंबर २०१५/खंड ३९,अंक ३, मूल्य रु.२०